# हिंदुबोध

॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

संपादक : रविकांत कळंबकर

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ७ ■ ऑक्टोंबर २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/– ■ पृष्ठ संख्या ४४
■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 7 ■ Octomber 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44



!! नमस्ते सदा वत्सले मातृभूमे.....
.....भारत माता की जय !!


घर असो वा गाडी, शिक्षण अथवा व्यवसायवृद्धी...
तुमचे स्वप्नं साकार करायला मदत जनता बँकेची!
जनता
गृहकर्ज
योजना
व्याजदर 7.75%* च्या पुढे | ₹3 कोटींपर्यंत अर्थसहाय्य
शिक्षण व वसतिगृह शुल्क, शैक्षणिक साहित्य, इ.साठी कर्ज
जनता
एज्युफ्लेक्स
कर्ज योजना
देशांतर्गत शिक्षणासाठी
₹ 50* लाख
परदेशी शिक्षणासाठी
₹ 1* कोटी
आकर्षक व्याजदर
जनता
वाहनकर्ज
कर्ज योजना
सुलभ प्रक्रिया । त्वरित कर्जवितरण
आकर्षक व्याजदर
आता प्रत्येक व्यवहार करा 'कॅशलेस'...
कारण जनता बँक सदैव तुमच्याबरोबर!
सुरक्षित, सोपी व गतिमान
इंटरनेट बँकिंग सुविधा
व्यापारी वर्गासाठी
कार्ड स्वाईप मशिन
रोजच्या व्यवहारांसाठी
जनता रुपे डेबिट कार्ड
तुमच्या सर्वप्रकारच्या बँकिंग व्यवहारासाठी
मोबाईल बँकिंग सेवा
JetPay
we proudly supporting... Digital India
BHARAT BILLPAY
*अटी व नियम लागू
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com

मासिक

**हिंदुबोध**

**वर्ष - पंचवीस : अंक ७ वा**

शके १९४७

**ऑक्टोबर २०२५**



संपादक

**श्री. रविकांत कळंबकर**

ravi.kalambkar@gmail.com

निवास

एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४


[redacted]


संपादक मंडळ

श्री. किशोर चव्हाण - प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे - प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक - प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी - प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. संजय गोडबोले - प्रांत प्रचार-प्रसार सहप्रमुख
श्री. अनिल सांबरे - नागपूर
श्री. विजयकुमार पिसे - सोलापूर

संपादक मंडळ सदस्य

श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी



पत्र व्यवहार

व्यवस्थापक

मनोज शेलार

मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ

संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे - ३०.

दूरभाष : २४४८ ५६ ३२

sanwadpvt@gmail.com


# अनुक्रमणिका


- संपादकीय.... मोगरा फुलला
  रविकांत कळंबकर ................................ ०५
- संघ वाटचाल
  दिलीप क्षीरसागर ................................ ०७
- संघकार्याचा विस्तार
  ॲड. आनंद कुलकर्णी ............................ १२
- कुटुंब प्रबोधन
  प्रकाश क्षीरसागर ................................ १४
- सामाजिक समरसता व हिंदू संघटन
  ॲड. संतोष गुरव ................................ १७
- कथ्य (narrative) चे प्रयोग आणि विमर्शा ची आवश्यकता
  रवींद्र मुळे ........................................ १९
- पर्यावरण संरक्षण - सामाजिक परिवर्तनाची गरज
  डॉ. राहूल मुंगीकर ................................ २१
- 'स्व'चा शोध : आत्मजाणिवेतून समाज - राष्ट्रनिर्मिती
  प्रदीप बिलूरकर .................................. २४
- नागरी शिष्टाचार
  निलेश क्षीरसागर ................................ २६
- सज्जनशक्ती संपर्क
  पंकज जयस्वाल .................................. ३०
- संघ शताब्दीनिमित्त सरसंघचालकांची व्याख्याने
  वार्तांकन : विजयकुमार पिसे .................... ३३
- चांगल्या बातम्या
  कुमार आठवले .................................... ३६
- वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ............................................ ३८



प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी - ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

## ॥ श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ॥

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : **EXABX No.** ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : **smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com**

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० **MW** क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० **TCD** ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० **KLPD** क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा **CNG** प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ **KLPD** क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती **(2G R & D)** प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

## संपादकीय

# मोगरा फुलला...!



२ ऑक्टोबर २०२५ या दिवशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शंभर वर्षे पूर्ण करून पुढील वाटचाल सुरु करणार आहे. एका अर्थी पुढील वर्ष हे शताब्दी महोत्सवी वर्ष असणार आहे. साधारणपणे रौप्य, सुवर्ण, हिरक, अमृत असे टप्पे साजरे करण्याची पद्धती आहे. परंतु, संघाने मात्र ही पद्धती कधी आचरणात आणली नाही. संघात कार्यरत असलेले आत्ताचे विशीतील स्वयंसेवक हे संघाच्या पाचव्या पिढीचे कार्यकर्ते आहेत. तर, सरसंघचालक हे सहावे आहेत. एखाद्या संघटनेला शंभर वर्षे पूर्ण होणं आणि त्यावेळी सुद्धा संघटना आचार, विचार, उच्चार आणि विस्ताराने टवटवीत असणं हा अभिमानाचाच भाग आहे.

संघाची स्थापना डॉ. हेडगेवारांनी केली. डॉक्टरांचे संपूर्ण जीवनच बीज स्वरुपात या भारत भूमीत रुजल गेलेलं आहे आणि म्हणूनच १९४० साली ज्यावेळी डॉक्टरांचे निधन झाले त्यावेळी देशातील प्रत्येक भागात संघाची वाढ कमी जास्त प्रमाणात पण, सर्व ठिकाणी उगवत होती. पायाचा विस्तार सर्व देशभर झाला होता. पूजनीय गुरुजींच्या तेहतीस वर्षांच्या कालखंडात हाच पाया (विचार) जसा खोलवर जात होता तसाच वरती पण उभा रहात होता आणि आता शताब्दी वर्षात तर हा विचार केवळ गर्वसे कहो हम हिंदू है असा मर्यादित राहिला नाही तर, देशातील हिंदू समाज आपल्या धर्मासाठी, संस्कृतीसाठी संरक्षणासाठी व संवर्धनासाठी कार्यसिद्धी करण्यास आत्मविश्वासाने सज्ज झाला आहे.

वास्तविक संघाची शंभर वर्षांची वाटचाल हा मोठा प्रबंध लिहिण्याचा विषय आहे. तसे विपुल लेखन व संशोधनपण अनेकांनी केलेले आहे. या वाटचालीत संघावर तीन वेळा बंदी घातली गेली. पहिली बंदी ही परीक्षाच ठरली. म. गांधींचे वधाचे निमित्य केले गेले. संघाची खरोखरीच अग्नीपरीक्षा झाली. दुसऱ्या बंदीचे वर्णन सत्व परीक्षा का तत्त्व परीक्षा असेच करावे लागेल. संपूर्ण देशाचीच आणीबाणी ही अग्नीपरीक्षा ठरली. पहिल्या बंदीनंतर काहीसा सावरत व दबावात रहात संघ वाटचाल करत होता तर, दुसऱ्या बंदीनंतर हा चेंडू उफाळून वरती आला व संघाचा विस्तार गतीने होत गेला. तिसरी बंदी ही बाबरी ढांचा पाडून हिंदू समाजाने जो कलंक पुसला त्याचे कारण करुन सरकारने स्वतःचीच परीक्षा करून घेतली होती.

''अडथळ्यांना सामोरे जात रहा त्यातून तुमचीच उर्जा प्रज्वलीत होत असते. त्या अडथळ्यांनाच वाटू द्यात की, हाच आपल्याला अडथळा आहे'' अशा स्वरुपाची एक चारोळी आहे. अगदी अशीच संघाची वाटचाल चालू आहे. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर संघाने कधीच सरकारला अडथळा मानले नाही तर, सर्व समाज हा आपलाच आहे त्यामुळे कधी राग द्वेष धरला नाही आणि म्हणूनच दुसऱ्या बंदीनंतर विसरा आणि माफ करा ही भूमिका अंगीकारली होती. एका संगीत नाटकात एक वाक्य प्रसिद्ध आहे की, ''त्याच्या आवाजाची जी उंची आहे तिथे तुझी नजर तरी पोहचते आहे का'' अगदी तसेच म्हणावेसे वाटते की, हिंदुत्वाची म्हणजे संघाच्या विचारांची उंची ही सामान्यतः केल्या जाणाऱ्या विचारांच्या फार वरची आहे. उदाहरणार्थ, संघात बौद्धिक किंवा भाषणानंतर टाळ्या वाजवल्या जात नाहीत कां तर, घरात वडीलधाऱ्या व्यक्तींनी काही बोध दिला तर आपण टाळ्या वाजवतो का? नाही. इतका साधा विचार!

संघाला हिंदू समाजात संघटन तर करावयाचेच आहे परंतु, ते सर्व स्तरावरील सुसंघटन असले पाहिजे. म्हणजेच, समाजात समरसता असावी, कुटुंब व्यवस्थेतून आगामी पिढीला योग्य मार्गदर्शन मिळावे. पर्यावरण जीवनशैलीचा अंगीकार करत देशाप्रती सन्मान व व्यवहारी जीवनात प्रत्येक ठिकाणी कर्तव्याची जाणीव असावी अश्या जागृत हिंदू समाजाचे संघटन अपेक्षित आहे. संघ त्यासाठी कार्यरत आहे, कुटुंब प्रमुख जसा कुटुंबाच्या सर्व घटकांचा सर्वांगीण विकास व्हावा असा विचार करत असतो आणि एकत्र वाटचालीचा आनंद व अनुभव घेत असतो तसाच हिंदू समाज आपल्या भरत भूमीला धर्म व संस्कृती रक्षण करत वाढतो आहे. हाच विश्वानंद मानव जातीसाठी समाधानाचा रहाणार आहे.

संघाच्या शंभर वर्षांच्या वाटचालीचा पहिला टप्पा संघटनात्मक रचनेचा होता नंतर संघटनात्मक अधिक

विस्तारात्मक होत गेला. नंतर संघटना + विस्तार + जागृती असा झाला. शंभरीत पदार्पण करताना संघटना + विस्तार + जागृती करत विचारात्मक संघर्षांना तोंड देत आहे. हिंदू समाजात धर्मासाठीचे व संस्कृतीसाठीचे वैचारिक प्रदूषण देशांतर्गत तर होत आहेच आणि विदेशातील शक्ती पण देशातील व्यवहारात व विचारात अराजकता माजवत आहे आणि म्हणूनच संघ समाजाला उत्तिष्ठत जागृत करण्याचे आवाहन करतो आहे.

संघाचा विचार व विस्तार खरोखरीच वटवृक्षाप्रमाणे झाला आहे. सर्वच क्षेत्रात संघ अग्रेसर राहून कार्य करत आहे. सर्वव्यापी व सर्वस्पर्शी संघाचे कार्य वृद्धींगत होत आहे. मागे वळून बघताना झालेला विस्तार हा खरोखरीच अभिमानास्पद आहे पण हजारो वर्षांपासून झेलत आलेल्या मानसिकतेला शिवरायांच्या कालखंडाने उभारी दिली होती. पुन्हा ब्रिटिशांच्या राजवटीने गुलामगिरी अनुभवावी लागली कारण एकच, संघटीत भावनाही आणि त्याचसाठी संघ कार्य करत आहे.

संघाचा विचार व विस्तार हा अक्षय वटवृक्षासारखा झाला आहे, होतो आहे हे जरी खरे असले तरी, या ठिकाणी माऊलींच्या एका अभंगाचे स्मरण होते.

‘मोगरा फुलला, मोगरा फुलला,
फुले वेचिता बहरू कळियासी आला,
इवलेसे रोप लावियले द्वारी,
तयाचा वेलु गेला गगनावरी.
याचा अनुभव आपण सर्वजण घेत आहोतच,
मनाचीये गुंती गुंफियेला शेला,
बाप रखुमां देविवरी विठ्ठले अर्पिला.

जसा जसा विचार विस्तारत गेला तसा तसा संघटनेचा विस्तार रुपी शेला गुंफला गेला. आता भारतमातेच्या चरणी हा शेला अर्पण करत असल्याचा नम्र भाव मनात आहे, विश्व मंदिरात विराजमान झालेली भारतमाता पहाण्यासाठी आपण सर्वजण केवळ कार्य सिद्ध नाहीतर, कार्यरत राहूया. शताब्दी वर्षाचे हेच सिमोल्लंघन असणार आहे. विजयादशमी व दीपावली च्या सर्व बंधू, भगिनींना मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**

◈ ◈ ◈

# प्रार्थना

**नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखवं वर्धितोऽहम्।
महामङ्गले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते।।१।।**

**प्रभो शक्तिमन् हिन्दुराष्ट्राङ्गभूता
इमे सादरं त्वां नमामो वयम्
त्वदीयाय कार्याय बद्धा कटीयम्
शुभामाशिषं देहि तत्पूर्तये।
अजय्यां च विश्वस्य देहीश शक्तिम्
सुशीलं जगद्येन नम्रं भवेत्
श्रुतं चैव यत्कण्टकाकीर्णमार्गम्
स्वयं स्वीकृतं नः सुगंकारयेत्।।२।।**

**समुत्कर्ष निःश्रेयसस्यैकमुग्रम्
परं साधनं नाम वीरव्रतम्
तदन्तः स्फुरत्वक्षया ध्येयनिष्ठा
हृदन्तः प्रजागर्तु तीव्राऽनिशम्।
विजेत्री च नः संहता कार्यशक्तिर्
विधायास्य धर्मस्य संरक्षणम्
परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्रम्
समर्था भवत्वाशिषा ते भृशम्।।३।।**

**।।भारत माता की जय।।**

# संघ वाटचाल

## ● रा.स्व. संघाची शतकी वाटचाल

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांचे बालपण स्वातंत्र्य आंदोलनाच्या भारावलेल्या कालखंडात गेले. त्यामुळे शालेय वयापासून पारतंत्र्याविषयीची चीड बालपणातील घटनांमध्ये प्रकट झालेला दिसतो. नागपूर हे स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनाचे मोठे केंद्र असल्यामुळे सतत विविध नेत्यांचे प्रवास, भाषणे होत असत. लोकमान्य टिळकांचा प्रभाव, डॉक्टर मुंजे यांचा सहवास यातून नागपूरचा केशव हेडगेवार वैद्यकीय पदवी मिळवण्यासाठी कलकत्ता येथे रवाना होतो. परंतु स्वातंत्र्य आंदोलनात क्रांतिकार्याची भूमी असलेल्या बंगालमध्ये जाण्यासाठी हे निमित्त होते. अर्थातच वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेत असताना अनुशीलन समितीचे सदस्य होऊन सर्व प्रकारच्या क्रांतिकार्याचा अनुभव त्यांनी घेतला. वैद्यकीय पदवी घेऊन नागपूरला परत आल्यावर तत्कालीन वऱ्हाड प्रांतात वैद्यकीय व्यवसाय करून सुस्थितीत आपले आयुष्य व्यतीत करण्याची अनुकूलता होती. परंतु पारतंत्र्याविषयी असलेली वेदना व मातृभूमीला स्वतंत्र करण्याचे उराशी बाळगलेले ध्येय यामुळे स्वतःचे वैयक्तिक आयुष्य हे त्यासाठी समर्पित करणे हा निश्चय पक्का होता. त्यावेळी चाललेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकुन दिले. वऱ्हाड प्रांतातील राष्ट्रीय काँग्रेसच्या सभा, बैठका यांच्या आयोजनामध्ये त्यांचा सहभाग असे. ते वऱ्हाड प्रांताचे राष्ट्रीय काँग्रेसचे सहसचिव बनले. १९२० मधील नागपूर येथील काँग्रेसच्या राष्ट्रीय अधिवेशनातील स्वयंसेवक दलाचे ते प्रमुख होते.

## ● डॉ हेडगेवार यांचे चिंतन

स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतिकार्य व राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीतील सहभाग यातून. या देशावरील परकीय आक्रमणाची मालिका आणि देशातील हिंदू समाजाचा चाललेला त्यांच्याशी सततचा संघर्ष याविषयी चिंतन सुरू होते. हिंदू समाजातील असंघटितपणा हे केलेले निदान होते. स्वामी विवेकानंद आणि तत्कालीन अनेक विचारवंतांनी हिंदू समाज संघटनेची आवश्यकता प्रतिपादन केलेली होती. होमिओपथी पदवीधर असलेले डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्राला झालेल्या या आजाराचे निदान तर इतिहास व स्वतःच्या अनुभवाने निश्चित केले. आता या आजारावर उपचार करणे देखील आवश्यक होते. म्हणून त्या मार्गाचा विचार करताना या समाजाला संघटित करण्यासाठी अनेकांशी केलेल्या विचार मंथनातून संघटित होण्यासाठी दैनंदिन एकत्रीकरणातून शाखा नावाचे तंत्र त्यांनी १९२५ च्या विजयादशमीला सुरू केले. हिंदू समाजातील दोष दूर करायचे असतील तर त्यांना अनुशासित व चारित्र्यसंपन्न बनवावे लागेल. सामूहिक अनुशासनाची सवय लावावी लागेल. अशी सवय लागण्यासाठी त्याचा अनुभव द्यावा लागतो. शाखा तंत्रामध्ये प्रतिदिनी किमान एक तास एकत्र येण्याच्या तंत्रातून शारीरिक, बौद्धिक, मानसिक विकास घडवणे तसेच समाजभान – देश भान याविषयी जाणीव निर्माण करणे. त्यासाठी इतिहासाचे चिंतन, वर्तमान समस्येची उकल व भविष्यातील वेध घेण्यासाठी समाजाला तयार करण्याची ही प्रक्रिया होती.

## ● शाखा तंत्र

अर्थातच संस्कारक्षम किशोरवयीन तरुणांना घेऊन सुरू केलेल्या अशा शाखा तंत्राचा समाजाकडून प्रारंभी उपहास, उपेक्षा, चेष्टा मस्करी होणे हे अपेक्षितच होते. डॉक्टर हेडगेवार यांनी या सर्वांकडून ही अपेक्षा गृहीत धरलेली होती. त्यामुळे त्याविषयी तक्रार न करता या कामात समाजाचा जेवढा सहभाग मिळेल तेवढा घेऊन पुढे जाणे हे त्यांनी सुरू ठेवले. हळूहळू या तंत्रातून विकसित झालेली तरुणांची शक्ती नागपूरमध्ये अनुभवास येऊ लागली. अनुशासित तरुणांचे कार्यक्रम, उपक्रम, संचलन (परेड) मध्ये चालणे हे सर्व तत्कालीन हिंदू समाजाला अनोखे होते. त्यामुळे हळूहळू उपेक्षेकडून कुतूहलाने समाज बघू लागला. शाखा तंत्रातील दैनंदिन एकत्रिकरण, यातून चढणारी खेळ

शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी संचलन सराव विविध उपक्रम सहली वनभोजन साप्ताहिक शारीरिक वर्ग लाठीकाठी चालवण्याचे प्रशिक्षण अशा वैविध्यपूर्ण कार्यपद्धतीचा समावेश होता केवळ खांद्याखाली सुदृढ असलेले युवक ही अपेक्षा नव्हती तर या तरुणांच्या मन आणि मस्तिष्कमध्ये स्वातंत्र्यप्रेमाची भूक, पारतंत्र्याविषयीची चीड आणि सहोदर असलेल्या समाज बांधवांना स्नेहाने जोडत जाण्याचे कौशल्य संक्रमित करण्याचे हे विशेष तंत्र यशस्वी होत होते.

### ● संघ विस्तार

नागपुरात पेरलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा तंत्राचा विकास-विस्तार हळूहळू मध्य भारतात झाला. या तंत्राचा देशव्यापी विस्तार करावयाचा असेल तर या तंत्रातून विकसित झालेले तरुण हेच आधार असू शकतात याचा त्यांना विश्वास होता. म्हणून त्यांनी पदवीचे शिक्षण घेऊ शकणाऱ्या व पदवी प्राप्त झालेल्या तरुणांना आपल्या पुढील शिक्षणासाठी नागपूर बाहेर विविध प्रांतात योजनापूर्वक पाठवले. राष्ट्रीय काँग्रेसच्या चळवळीत असलेल्या सहभागामुळे देशभरातील असे संपर्क सूत्र त्यांना कामी आले. या तरुणांनी देखील डॉ. हेडगेवार यांचा विश्वास सार्थ ठरवला. पंधरा वर्षांच्या वाटचालीत १९४० च्या संघ शिक्षा वर्गात देशातील सर्व प्रांतांच्या स्वयंसेवकांचे प्रतिनिधित्व झाले. याचा अर्थ शाखा तंत्राचे प्रत्यक्ष अनुभव घेतलेले तरुण या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी आले.

महिलांमध्ये देखील असे राष्ट्रीय विचारांचे संघटन उभे करावे अशी कल्पना वंदनीय लक्ष्मीबाई तथा मावशी केळकर यांनी मांडली डॉक्टर हेडगेवार यांनी त्यांना पूर्ण मार्गदर्शन व समर्थन दिले. त्यातून महिलांसाठी राष्ट्र सेविका समिती या संघटनेचा प्रारंभ झाला.

संघ कार्य विस्तारत असताना स्वातंत्र्य आंदोलनातील नेत्यांची असलेले स्नेहपूर्ण संबंध, क्रांतिकारकांची असलेला जुना ऋणानुबंध यातून जमेल तेवढा सहभाग सुरू होता. १९३० च्या जंगल सत्याग्रहात डॉ हेडगेवार यांना एक वर्षाची शिक्षा देखील झाली.

संघकार्य देशभर विस्तारण्यासाठी केलेली प्रवासाची प्रचंड धावपळ, घेतलेले कष्ट आणि मनाशी असलेला ध्यास या सर्वांचा परिणाम देहावर होणे स्वाभाविक होते त्यामुळे बलदंड असलेल्या शरीराची शक्ती कमी पडली.त्यामुळे एक्कावन्नाव्या (१९४०) त्यांचे देहावसान झाले.

### ● सरसंघचालक श्री गोळवलकर गुरुजी

उच्चशिक्षित (M.Sc.L.LB), विविध विषयांवर चौफेर वाचनाचा व्यासंग व अध्यात्मिक मार्गात स्वामी अखंडानंदांच्या आश्रमात सर्वसंग परित्याग करण्याची दृढ इच्छा धरून गेलेल्या माधव सदाशिव गोळवलकर(गुरुजी) या तरुणाकडे या संघटनेची धुरा सोपवण्याची इच्छा डॉ.हेडगेवार यांनी अंत्यसंमयीच्या पत्रात व्यक्त केली.

श्री गोळवलकर गुरुजी यांनी देखील डॉ. हेडगेवार यांच्या कल्पनेतील देशव्यापी संघटनेचे तंत्र सर्व जिल्हास्तरापर्यंत पोचवण्यासाठी अफाट परिश्रम घेतले. वर्षातून दोन वेळा संपूर्ण देशाचा प्रवास पूर्ण करण्यासाठी आगगाडीचा डबा हेच माझे घर अशा प्रत्यक्ष व्यवहाराने त्यांनी डॉक्टरांच्या मनातील संघटनेला खोल आशय व प्रचंड उंची प्राप्त करून दिली. विशेषतः संघविस्तारासाठी जीवनातील काही वर्षे अथवा पूर्ण वेळ जीवनव्रती म्हणून संघ प्रचारक निघण्याच्या प्रक्रियेला या काळात भरपूर गती मिळाली. अत्यंत प्रतिभावंत प्रचारक संघ विस्तारासाठी समर्पित झाले. ही परंपरा आज देखील सुरू आहे.त्याचबरोबर संघकामासाठी

सहस्त्रावधी गृहस्थी कार्यकर्ते सक्रीय झाले. संघ नेतृत्वाचा स्वयंसेवकांशी सहज संवाद,वेळ देण्याची आवश्यकता,शाखा तंत्रातून विकसित होणारी कार्यकर्त्यांची मांदियाळी याला भरपूर गती मिळाली.

१९४७ ला स्वातंत्र्याची प्राप्ती झाली. मात्र फाळणीमध्ये लक्षावधी हिंदूंची झालेली कत्तल, लक्षावधी विस्थापित हिंदू आणि खंडित झालेली मातृभूमी हे कोणत्याही देशभक्ताला अत्यंत वेदनादायी होते. परंतु झालेल्या निर्णयाला इलाज नव्हता. त्याचे परिणाम भोगणे क्रमप्राप्त होते. अशा वेळेस सीमावर्ती प्रांतातील हिंदू समाजाला आधार देणे, त्यांनी संघटित व सबळ राहणे यासाठी संघाने विशेष परिश्रम घेतले. सीमावर्ती भागातील हिंदूंना भारतात सुखरूप आणण्यासाठी संघ कार्यकर्त्यांनी स्वतःच्या वैयक्तिक कुटुंबाकडे देखील दुर्लक्ष केले. संघाच्या सामर्थ्याची जाणीव देशभरात होत होती. फाळणीच्या पृष्ठभूमीवर हिंदू संघटनेचा आग्रह देशाला लक्षात आला होता. त्यामुळे मिळणारे प्रचंड समर्थन हे तत्कालीन काँग्रेस सत्ताधीशांना अस्वस्थ करणारे होते. त्यामुळे स्वाभाविकच महात्मा गांधींच्या झालेल्या दुर्दैवी हत्येनंतर खोटा आरोप ठेवून संघावर बंदी घालण्यात आली.

महात्मा गांधींच्या सत्याग्रह तंत्राने स्वयंसेवकांनी आपला प्रखर विरोध नोंदवला. अखेर सरकारला संघावरील बंदी बिनशर्त मागे घ्यावे लागली.

## ● विविध क्षेत्रे विस्तार

याच कालावधीत संघाचा झालेला देशभर विस्ताराबरोबर पन्नास व साठच्या दशकात व्यवस्था परिवर्तनासाठी संघ स्वयंसेवकांच्या प्रयत्नातून विविध क्षेत्रांची उभारणी झाली. ज्यात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारतीय मजदूर संघ, जनसंघ, वनवासी(जनजाती) कल्याण आश्रम. विश्व हिंदू परिषद इत्यादी महत्त्वाच्या संघटनांची उभारणे झाली. या सर्व संघटना राष्ट्र जीवनाच्या विविध क्षेत्रात राष्ट्रीय विचारांनी व्यवस्था परिवर्तनासाठी कटीबद्ध असून आपापल्या क्षेत्रात क्रमांक एक वर आहेत. साठच्या दशकात गोहात्याविरोधी आंदोलन समर्थनार्थ पावणेदोन कोटीचा स्वाक्षरी संग्रह संघ स्वयंसेवकांनी संग्रहित करून राष्ट्रपतींना सादर केला. स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दी निमित्ताने कन्याकुमारी येथे त्यांचे भव्य स्मारक उभे करण्याच्या दृष्टीने तत्कालीन सरकार्यवाह एकनाथजी रानडे यांना संघ जबाबदारीतून मुक्त करून याच विषयाचे काम दिले. प्रत्येक कुटुंबातून एक रुपया असे सात कोटी रुपये संकलित झाले. सर्वपक्षीय खासदारांचे समर्थन देखील मिळवले.कन्याकुमारी येथे असलेले भव्य शीला स्मारक हे भारतीय प्रेरणांचे जागतिक केंद्र आहे.

## ● न हिंदू पतितो भवेत

श्रीगुरुजींच्या प्रयत्नातून हिंदू धर्मातील सर्व पंथांच्या धर्माचार्यांना एकत्र आणण्याचे ऐतिहासिक कार्य विश्व हिंदू परिषदेच्या स्थापनेच्या निमित्ताने झाले.अस्पृश्यता निवारणासाठी संत व समाज सुधारकांचे काही काम झालेले होते. त्याबरोबर सामान्य माणूस ज्या धर्माचार्यांपुढे नतमस्तक होतो त्यांच्या तोंडून हे येणे आवश्यक होते. श्री गुरुजींच्या विश्व हिंदू परिषदेच्या उडुपी येथील अधिवेशनात(१९६९) हिंदवा सोदरा सर्वे,न हिंदू पतितो भवेत, या मंत्राची उद्घोषणा धर्माचार्यांच्या मुखातून झाली हा एक ऐतिहासिक क्षण होता. हिंदू समाजातील काळाच्या ओघात रूढ झालेल्या अनिष्ट रुढीला संपवण्याच्या दृष्टीने हे एक ऐतिहासिक पाऊल होते. याच निमित्ताने अनेक धर्माचार्य हे तथाकथित दलित वस्तीत भ्रमण करू लागले, पाद्य पूजा करवून घेऊ लागले आणि भोजन देखील घेऊ लागले. सामाजिक परिवर्तनाचा हा एक यशस्वी टप्पा होता.

संघ विचारांच्या दैनिके, साप्ताहिके व मासिके अशा विविध नियतकालिकांचा प्रारंभ झाला. राष्ट्रीय विचारांच्या प्रबोधनासाठी या नियतकालिकांनी खूप महत्त्वाची जबाबदारी पार पाडली.. अनेक ठिकाणी विविध शैक्षणिक, सामाजिक, बँकांसारखे आर्थिक इत्यादी संस्थांची उभारणी स्वयंसेवकांनी केली. देशाच्या दृष्टीने मूलभूत आर्थिक, सामाजिक, राजकीय अशा विविध क्षेत्रातील विचारांचे मूलभूत चिंतन श्रीगुरुजींच्या मार्गदर्शनातून प्राप्त झाले.

## ● देश संरक्षण

१९६२ च्या चीन युद्धात स्वयंसेवकांनी दिल्लीत वाहतूक नियंत्रणाचे काम केले व देशभरात भारतीय सैन्याच्या समर्थनार्थ भरपूर काम केले. त्यामुळे दिल्लीतील पुढील प्रजासत्ताक दिनाच्या सरकारी कार्यक्रमात स्वयंसेवकांच्या एका तुकडीला संचलन करण्याची संधी मिळाली. १९६५ च्या पाकिस्तान युद्धात तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी बोलवलेल्या सर्व पक्षीय बैठकीत विशेष निमंत्रित म्हणून श्रीगुरुजी सहभागी झाले. याच बैठकीत एक विरोधी पक्ष नेते लालबहादूर शास्त्री यांना युवर आर्मी, युवर आर्मी.. असे म्हणून विषय मांडत होते. श्रीगुरुजींनी हस्तक्षेप करून इट इज अवर आर्मी असे म्हणण्यास बाध्य केले. वयम पंचधीकम शतम ही आपल्या देशातील परंपरा आहे. त्याचे उचित स्मरण त्यांनी करून दिले. १९७१ च्या युद्धात देखील रक्तदान,सीमावर्ती प्रांतात जनजागरण,तेथील लष्करास नागरी सहाय्य अशी कामे केली.

## ● हिंदू संघटन व समता

श्रीगुरुजींच्या निधनानंतर तृतीय सरसंघचालक म्हणून बाळासाहेब देवरस यांनी १९७३ मध्ये जबाबदारी घेतली. १९७४ च्या पुण्यातील वसंत व्याख्यानमालेत हिंदू संघटन व सामाजिक समता या विषयावर त्यांनी व्याख्यान दिले संघ म्हणून हिंदू संघटनेचा सामाजिक समतेचा विचार अधोरेखित करताना त्यांनी अस्पृश्यता वाईट नसेल तर जगात कोणतीच गोष्ट वाईट नसेल. It must go lock, stalk and barrel.. असे निःसंदिग्ध प्रतिपादन केले. पुढे १९८३ च्या तळजाई येथील महाशिबिराच्या समारोपात श्री देवरस यांनी विषमतारहित,शोषणमुक्त व समतायुक्त हिंदू समाज उभा करण्याची प्रखर भूमिका मांडली.त्यादृष्टीने वेगाने प्रयत्न सुरु आहेत. मनातील समरसता भाव जागृत

केल्याशिवाय मनातून समता प्रस्थापित होणार नाही. विद्यमान सरसंघचालक डॉ मोहन जी भागवत यांनी एक गाव:एक पाणवठा, एक मंदिर, एक स्मशान ही भूमिका स्पष्ट केली आहे.समरसता या संघटना म्हणून असलेल्या गतीविधी द्वारे अधिक गती देण्यासाठी स्वयंसेवक प्रयत्नशील आहेत.

## ● दुसऱ्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष

सत्तरच्या दशकात भारतीय राजकारणात भरपूर उलथापालथ सुरू झाली. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींच्या बांगलादेश युद्धात मिळवलेल्या विजयातून प्राप्त लोकप्रियता एककल्ली व हुकूमशाही वृत्तीकडे वेगाने गेली. पक्षांतर्गत व पक्षाबाहेर असंतोष वाढत होता. देशात महागाई, राजकीय भ्रष्टाचार या विरोधात मोठे जनआंदोलन उभे राहिले. जयप्रकाशजी नारायण यांच्या नेतृत्वात सुरू झालेल्या जनआंदोलनात संघ विचारांच्या अनेक संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला. या असंतोषाचा आपल्या निरंकुश सत्तेवर परिणाम होऊ नये म्हणून १९७५ ला आणीबाणी घोषित करण्यात आली. व्यक्ती व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच झाला. वृत्तपत्राचे नियंत्रण पोलीस अधिकाऱ्यांकडे गेले. राजकीय नेत्यांना अटकेत टाकण्यात आले संघावर देखील बंदी घालण्यात आली. देशभर तुरुंगात टाकलेल्या सव्वा लाख सामाजिक कार्यकर्त्यांपैकी जवळपास एक लाख कार्यकर्ते हे संघ विचारांचे होते. संघावर बंदी आल्याने संघाचे भूमिगत कार्य सुरू झाले. देशभर असलेल्या भितीयुक्त वातावरणात लोकशाही वाचवण्यासाठी संघ कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. तुरुंगात ठेवलेल्या अनेक स्वयंसेवकांना दीर्घकालीन आजार लागले, अनेकांचे व्यवसाय उध्वस्त झाले, अनेकांचे कौटुंबिक स्वास्थ्य उध्वस्त झाले. तरीदेखील संघ कार्यकर्ते डगमगले नाही. परिणामी १९७७ च्या निवडणुकीत आणीबाणी लादणाऱ्या इंदिरा गांधींचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार आले. संघावरील बंदी उठवण्यात आली. या सर्व परिवर्तनामध्ये संघ कार्यकर्त्यांनी प्रचंड मेहनत घेतली.

## ● सेवा है यज्ञ कर्म

या दुसऱ्या अग्निपरीक्षेतून संघ सुवर्णतेजाने तळपून निघाला. आता संघाच्या कामात समाजाचा सहभाग सुरू झाला. समर्थन वाढू लागले. संघ शाखांचा विस्तार तालुका स्तरापर्यंत झाला. विविध नैसर्गिक व मानवी आपत्तींच्या प्रसंगी स्वयंसेवक धावून जात. प्रचंड असे आपदा निवारणाचे कार्य करतात. परंतु त्याचबरोबर वंचित, शोषित बंधूंना समाजाच्या बरोबर आणण्यासाठी अनेक स्थिर सेवाकार्यांचा प्रारंभ झाला. जनजातीय क्षेत्र, पूर्वांचल, सीमावर्ती क्षेत्र सेवावस्ती अशा आरोग्य, शिक्षण, संस्कार, स्वावलंबन अशा जवळपास दीड लाख सेवा प्रकल्पांचा प्रचंड विस्तार झालेला आहे. सेवा हा संघटना म्हणून अविभाज्य भाग झाला आहे.

## ● हिंदू जागृती

ऐशीच्या दशकात मीनाक्षीपूरम येथे संपूर्ण गावाचे धर्मांतरण झाल्याने हिंदू समाज खडबडून जागा झाला. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देखील यावर चिंता व्यक्त केली. या सामाजिक आपत्तीचे जनजागृतीत रूपांतर करण्यासाठी जनजागरण अभियान सुरू झाले. तेथून सुरू झाला तो हिंदू जागृतीच्या दशकाचा उदय! जनजागरण अभियान, भारतमाता, गंगामाता यात्रा आणि पुढे श्रीराम जन्मभूमी मुक्त करण्यासाठी झालेली विविध अभियाने व आंदोलने यातून देश ढवळून निघाला. हिंदुत्वाची प्रखर जाणीव निर्माण करण्यासाठी प्रचंड परिश्रम घेतले गेले. हिंदू समाजालाही या संकटाची जाणीव होऊन या अभियानांना देशव्यापी समर्थन मिळाले. परिणामी ६ डिसेंबर १९९२ रोजी पाच शतकांचा अपमान सहन केलेला बाबरी ढाचा नामशेष झाला. हिंदू जागृतीच्या विजयाचा तो एक महत्वपूर्ण टप्पा होता. दीर्घ न्यायालयीन प्रक्रियेमध्ये हिंदू समाजाच्या बाजूने निकाल लागून अयोध्या येथील भव्य श्रीराम मंदिर उभे राहिले. संघाच्या शतकातील वाटचालीचा हा एक सुवर्ण अध्याय आहे.

## ● विस्तार व गतीविधी

कै.प्रा. राजेंद्रसिंहजी, कै. सुदर्शनजी यांच्यानंतर विद्यमान सरसंघचालक म्हणून डॉ. मोहनजी भागवत हे धुरा सांभाळत आहेत. ऐशीच्या दशकापासून सुरू झालेली हिंदू जागृती ही अधिकाधिक दृढ होत चाललेली आहे. परिणामी स्यूडो सेक्युलर राजकारणाच्या भ्रमातून हिंदू समाजाला बाहेर काढण्यात यश येत आहे. संघटन म्हणून देखील संघाचा देशभर विस्तार होत आहे. जवळपास एक लाख गावांमध्ये दैनंदिन व साप्ताहिक एकत्रिकरणे सुरू आहेत. अर्थात हे पुरेसे नाही याची संघाला जाणीव आहे. त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनासाठी सेवा, धर्मजागरण, ग्रामविकास, गोसेवा, समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण या गतीविधींच्याद्वारे समाजाचा थेट सहभाग या

विषयांमध्ये वाढतो आहे. समाज परिवर्तनासाठी या गतीविधींच्या उपक्रमांविषयी उत्सुकता व सहभाग वाढतो आहे.

संघटन म्हणून समाजातील विविध घटक संघाकडे आकृष्ट होत आहेत. जॉईन आरएसएस या इंटरनेट वरील माध्यमातून जवळपास प्रतिवर्षी एक लाखाच्यावर स्त्री-पुरुष संघ कार्याविषयी उत्सुकता दाखवून सहभागी होत आहेत. शिक्षण, सेवा, सुरक्षा, सामाजिक, वैचारिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील अखिल भारतीय संघटनांचा विस्तार देशाच्या कानाकोपऱ्यात होत आहे. स्वयंसेवकांद्वारे संचालित स्थानिक शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक संस्थांचे मोठे जाळे समाजपरिवर्तनासाठी सक्रिय आहे.

संघशताब्दीच्या पृष्ठभूमीवर परिवर्तनाची पंचसूत्री मांडण्यात येत आहे. ही पंचसूत्री व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनात आचरण्याचा हिंदू समाजाला आग्रह आहे. भारतगौरव- स्वदेशी- हिंदुत्व, स्व ची जाणीव यातून होणारा स्वबोध, समरसता युक्त व्यवहार, जल, जंगल, जमीन संरक्षण व प्लास्टिक मुक्ती यातून पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधनाद्वारे कुटुंब व्यवस्थेचे आधुनिक काळातील महत्त्वपूर्ण शक्तिस्थान पुन्हा स्थापित करणे, संविधानाने दिलेल्या हक्कांची जाणीव होते तथापि नागरी कर्तव्य पालन केल्याशिवाय सुसंघटीत राष्ट्राची उभारणी होत नसते. अशा या पंच परिवर्तनातून भारताचे जागतिक स्तरावरील कर्तव्य म्हणजे विश्वबंधुत्व स्थापित करणे व वैचारिक दृष्ट्या विश्वगुरूचे स्थान पुन्हा प्राप्त करणे या दिशेने पुढील वाटचाल गतीने करण्याची आवश्यकता संघशताब्दीच्या निमित्ताने अधोरेखित होत आहे. एका शाखेपासून सुरू झालेला हिंदू संघटनेचा प्रवास शताब्दीच्या टप्प्यापर्यंत प्रचंड वटवृक्षासारखा भक्कम व जमिनीत घट्ट मुळे रोवून मातृभूमीसाठी कटिबद्ध आहे.

**दिलीप क्षीरसागर, (नाशिक)**
**पश्चिम महाराष्ट्र प्रांत**
**मो. ९४२२२४५५८२**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

निःस्पृह भावनेने नाती जपा. मनुष्याचे जीवन हे स्वतःपुरते मर्यादित नसून इतरांसोबत जोडलेल्या, निर्माण झालेल्या नात्यांमुळे ते समृद्ध होत असते. मानव हा समूहप्रिय प्राणी आहे. एकट्याने जीवन जगणे त्याला आवडत नाही. आयुष्याच्या प्रवासात सोबतीची गरज भासते. सुखावह व सुरक्षित जीवन त्याला या सोबतीतूनच प्राप्त होत असते. यातूनच नात्यांचा जन्म होत असतो. खरेतर नात्यांचे वरदान लाभलेले आहे. नात्यांविना जीवन जगणे अवघड आहे. पण, या नात्यांची निर्मिती मात्र हातात नाही किंवा त्याचे आपण सूत्रधार देखील नाही. ती कर्मधर्मसंयोगाने आपल्याशी जोडली जातात. तरीही ही लाभलेली नाती कशी सांभाळतो, हे फार महत्त्वाचे आहे. आयुष्य कधीच परिपूर्ण नसते. प्रत्येक पावलावर आपल्याला मदतीची साहाय्यतेची गरज भासत असते. आपल्याला कधी कुणाच्या मदतीची गरज लागते तर कधी इतरांना आपल्या मदतीची अपेक्षा असते.

नाते कितीही जवळचे असले, तरी एखाद्याला मदत करताना त्याच्या परवानगीनेच ती मदत करायला हवी. कारण, कधी कधी ही मदत समोरच्याला मदतीपेक्षा उपकारांचे ओझे वाटू शकते. मदत करताना किंवा इतर कोणत्याही कामात परवानगी घेताना भाषा विनंतीवजा अथवा मृदू असावी. आपल्या अधिकारवाणीने बोलल्यामुळे एखाद्याचे व्यक्तिस्वातंत्र्य हरवणार नाही ना किंवा नात्यांमध्ये दबाव निर्माण होणार नाही ना, याची खबरदारी आपण घ्यायला हवी.

एकमेकांच्या वागण्या-बोलण्यात, मतांमध्ये मतभेद असू शकतात. एखाद्याला गुणदोषासह स्वीकारले, तर नात्यांची मुळे आणखी मजबूत होत असतात. नात्यांची ही मुळे आणखी मजबूत करण्यासाठी केलेली मदत व त्या मदतीची भावना निःस्पृह असावी. नात्यांमध्ये उपकाराची भाषा असण्यापेक्षा परोपकाराची भावना बाळगली तर नात्यांमधील प्रेम आणि आपुलकीची भावना अधिक वाढीस लागेल.

**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**
**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**

# संघकार्याचा विस्तार

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना १९२५ साली विजयादशमी दिवशी झाली. पू. डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार यांनी नागपूर मधील मोहिते वाडा येथे संघाची पहिली शाखा सुरु केली. हिंदु समाजाच्या अवनत स्थितीचे सखोल चिंतन केल्यावर पू. डॉक्टरांनी हिंदु समाज संघटीत करण्यासाठी एक देशव्यापी संघटना असावी असा विचार केला. त्यामधून संघाच्या शाखेचा जन्म झाला.

विजयादशमी २०२५ ला रा. स्व. संघाच्या कामाला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने संघ कामाचा विस्तार कसा झाला हे आपण समजून घेवू.

सुरुवातीला नागपूरच्या मोहित्यांच्या बागेत पहिली शाखा सुरू झाली. डॉ. हेडगेवार यांनी स्वतः गावोगावी फिरून कार्यकर्ते तयार केले आणि शाखा सुरु केल्या. या काळात त्यांनी महाराष्ट्रातील प्रमुख शहरांमध्ये, जसे पुणे, वर्धा, अकोला भंडारा व इतर ठिकाणी शाखा सुरू केल्या. पू. डॉक्टरांचे सहकरी श्री. भाऊजी कावरे, बाबासाहेब आपटे, भाऊराव देवरस, दत्तोपंत ठेंगडी, लक्ष्मणराव इनामदार आदी कार्यकर्त्यांनी अखंड भारतात शाखा सुरु केल्या. त्यामध्ये मध्य भारतातील जबलपूर, सागर, इंदोर , ग्वालेर, उत्तर प्रदेशात काशी, बनारस हिंदु विश्वविद्यालय या ठिकाणांचा समावेश होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात भारत अखंड होता आणि त्यावेळी आताच्या पाकिस्तानमध्येही संघाचे कार्य सुरू होते. लाहोर (पंजाब), कराची (सिंध), पेशावर (वायव्य सरहद्द प्रांत) आणि रावळपिंडी यांसारख्या शहरांमध्ये संघाच्या शाखा कार्यरत होत्या. फाळणीच्या वेळी या शाखांमधील स्वयंसेवकांनी हिंदू निर्वासितांना सुरक्षितपणे भारतात आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. फाळणीनंतर, या शाखांचे काम थांबले. मात्र, फाळणीमुळे विस्थापित झालेले अनेक स्वयंसेवक भारतात आले आणि त्यांनी येथे संघाचे कार्य पुढे नेले. याच काळात संघ शिक्षा वर्गांचे आयोजन करून स्वयंसेवकांना संघटना वाढवण्यासाठी प्रशिक्षण दिले जाऊ लागले. पू. डॉक्टर स्वतः अशा संघ शिक्षा वर्गात जातीने लक्ष देत.

१९४० मध्ये पू. डॉ. हेडगेवार यांच्या निधनानंतर, पू. श्री. माधव सदाशिव गोळवलकर (गुरुजी) सरसंघचालक झाले. त्यांच्या नेतृत्वाखाली संघाच्या कार्याला देशभरात गती मिळाली. पू. श्री. गुरुजींनी भारतभर प्रवास करून अनेक प्रांतांमध्ये संघाच्या कार्यकर्त्यांची फळी तयार केली.

पू. श्री. गुरुजी यांच्या कार्यकाळात (१९४० ते १९७३) राष्ट्रजीवनाच्या सर्व क्षेत्रात देशभक्तीचे विचार पोहोचावे व देशभक्ती प्रत्यक्षात व्यवहारात यावी यासाठी अनेक संघटनांचा जन्म झाला. यामध्ये देशभक्त, चारित्र्यवान व सक्रिय विद्यार्थी तयार करण्यासाठी अखिल भारतीय विद्याथी परिषद, हिंदू समाजात एकात्मता, धार्मिक व सांस्कृतिक अभिमान जागृत करण्यासाठी विश्व हिंदु परिषद, राष्ट्रवादावर आधारित राजकीय पक्ष म्हणून भारतीय जनसंघ, शेतकऱ्यांचा विकास, स्वावलंबन होण्यासाठी भारतीय किसान संघ, वनवासी समाजाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जनजाती (वनवासी) कल्याण आश्रम, कामगार वर्गाला राष्ट्रवादी दृष्टी, उद्योगात सहकार्य व सामंजस्य राखण्यासाठी कामगार संघटना म्हणून भारतीय मजदूर संघ, भारतीय संस्कृतीप्रधान शिक्षण व चरित्रनिर्मितीसाठी विद्याभारती, इत्यादी संघटना सुरु झाल्या.

नंतरच्या काळात समाज जीवनाची आवश्यकता लक्षात घेवून अनेक क्षेत्रात स्वयंसेवकानी काम सुरु केले. अखिल भारतीय स्तरावर सध्या अशा ३६ संघटना कार्यरत आहेत. त्यापैकी ठळक :

हिंदु जागरण मंच, पूर्व सैनिक परिषद, सीमा जागरण मंच, भारत विकास परिषद, राष्ट्रीय सेवा भारती, सहकार भारती, NMO (National Medicos Organisation), दीनदयाळ संशोधन संस्था, प्रज्ञा प्रवाह, अखिल भारतीय साहित्य परिषद, विज्ञान भारती, संस्कार भारती, अधिवक्ता परिषद, विश्व हिंदू परिषद, जनजाती कल्याण आश्रम, भारतीय स्त्री शक्ती, राष्ट्रीय शीख संगत, क्रीडा भारती, भारतीय जनता पार्टी, सहकार भारती, ग्राहक पंचायत, लघु उद्योग भारती, भारतीय किसान संघ, भारतीय मजदूर संघ, स्वदेशी जागरण मंच, विद्या भारती,

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP), शैक्षिक महासंघ, भारतीय शिक्षण मंडळ, राष्ट्रीय शिक्षा व संस्कृती उत्थान, संस्कृत भारती इत्यादी

१९७३ नंतर १९९४ पर्यंत पू. बाळासाहेब देवरस यांच्या सरसंघचालक कार्यकाळात त्यांनी समाजातील विविध घटकांशी संवाद व सहयोग वाढवला. १९७५ च्या आणीबाणी काळात संघावर बंदी आली होती. मा. बाळासाहेब देवरस व त्यानंतरच्या सर्व पू. सरसंघचालाकांच्या कार्यकाळात संघाच्या शाखांची संख्या आणि स्वयंसेवकांची व्याप्ती प्रचंड वाढली.

● **संघाची संघटनात्मक रचना :**

अखिल भारतीय स्तर (केंद्र) – क्षेत्र (Kshetra/झोन) – प्रांत (Prant/राज्य) विभाग (Vibhag) – जिल्हा/भाग (District) – तालुका/नगर (Tahsil)/खंड (Khand / Taluka) – मंडल (Mandal) – ग्राम/वस्त्या (Village level) – शाखा (Shakha)

सध्या संघाच्या रचनेत भौगोलिक भारतात ११ क्षेत्र आहेत, संघ दृष्टीने ४६ प्रांत आहेत (जसे की शासकीय महाराष्ट्राचे ४ प्रांत आहेत १) कोकण, २) विदर्भ, ३) देविगरी, ४) पश्चिम महाराष्ट्र) भारत भरात संघाच्या दृष्टीने ९२४ जिल्हे, ६६१८ तालुके म्हणजेच खंड (Khands), २५५६ नगरे व एकूण सुमारे ५८९६४ मण्डले आहेत – प्रत्येक मण्डलात सुमारे १२ ते १५ गावांचा समावेश होतो. शहरी क्षेत्रात १०,००० लोकसंख्येची एक वस्ती अशा ४४,०५५ वस्त्या देशभरात आहेत. संघ काम वाढीचे मोजमाप म्हणून संघाच्या शाखा, साप्ताहिक मिलन, संघ मंडळी यांची मोजदाद होते. त्यासाठी काही संकल्पना आपण स्पष्ट करून घेवू.

● **दैनंदिन शाखा :** संघाच्या संघटनेचा पाया म्हणजे 'शाखा'. शाखा हे असे ठिकाण आहे जिथे रोज सकाळी किंवा संध्याकाळी स्वयंसेवक एकत्र येतात. येथे शारीरिक आणि बौद्धिक कार्यक्रम घेतले जातात, ज्यामुळे स्वयंसेवकांमध्ये राष्ट्रभक्ती, शिस्त आणि सेवाभाव रुजवला जातो. प्रत्येक स्वयंसेवक शाखेशी जोडलेला असतो आणि हेच संघटन मजबूत करते.

● **साप्ताहिक मिलन :** संघाच्या कार्यपद्धतीमध्ये कालानुरूप बदल होत गेले त्याप्रमाणे आठवड्यातून एकदा शाखेप्रमाणेच एकत्र येवून कार्यक्रम करण्याला साप्ताहिक मिलन असे म्हणतात.

● **संघ मंडळी** : गावातील किंवा शहरी भागातील वस्तीमधील हिंदु हितैर्षी लोकांना महिन्यातून एकत्र करून देव, देश, धर्म याचा विचार करणे व भजन, प्रवचन, विचारविनिमय या कार्यक्रमांच्या माध्यमातून महिन्यातून एकदा एकत्र येणे याला संघ मंडळी म्हणतात.

अशा प्रकारे संघाचे प्रत्यक्ष काम सर्व वयोगटासाठी वेगवेगळ्या शाखांच्या माध्यमातून चालते. यामध्ये प्रौढ, व्यावसायिक, महाविद्यालयीन तरुण, शालेय विद्यार्थी यांच्यासाठी शाखा व साप्ताहिक मिलन देशभर चालतात.

मार्च २०२५ च्या प्रतिनिधी सभेच्या वृत्ताप्रमाणे भारतात सध्या ५१७१० स्थानी ८३१२९ शाखा, ३२१४७ साप्ताहिक मिलन १२,०९१, संघ मंडळी सुरु आहेत.

● **विदेशातील संघकाम :** १९४० साली केनिया मध्ये पहिली शाखा सुरु झाली. सध्या हिंदू स्वयंसेवक संघ नावाने अमेरिका, इग्लंड, ऑस्ट्रेलिया, आफ्रिका आदि ५३ देशात १६०४ शाखा लागतात तर ७ देशात साप्ताहिक मिलने चालतात असे एकूण ६० देशात काम चालते. म्यानमार (बर्मा) देशात ६५ ठिकाणी संस्कार वर्ग चालतात. अमेरिकेत ८४ शिक्षण संकुलात Hindu Cultural Club नावाने काम चालते.

अशा रीतीने संघाच्या शताब्दी वर्षात या संघटनात्मक कामाच्या आधारे संघाने अजून काही मंडलस्थानी, शहरी क्षेत्रातील सर्व वस्ती स्तरावर शाखा सुरु करण्याचा संकल्प केला आहे. मा. सरकार्यवाह दत्तात्रयजी होसबळे यांनी त्याबाबतीत दिशा स्पष्ट करताना अशा सुमारे ५८९६४ मण्डले व शहरी क्षेत्रात ४४,०५५ वस्तीच्या ठिकाणी गृहसवांद अभियान हिंदू संमेलने होतील याद्वारे आगामी विजयादशमी २०२६ पर्यंत संघकार्याचा विस्तार हा काही लाख गावांपर्यंत होईल असे म्हंटले आहे.

संघ सरितेचा वाहणारा प्रवास अनेक कार्यकर्त्यांनी अनेक जीवने अर्पित करून हा अखंड ठेवला आहे. अजूनही यासाठी काहीशे कार्यकर्ते आपल्या व्यक्तिगत आयुष्याचा होम करून आपले प्रचारकी जीवन जगत आहेत. अनेक गृहस्थी कार्यकर्ते जास्तीत जास्त वेळ देवून अनेक ठिकाणी कार्यवाढ व कार्यकर्ता घडविण्यासाठी आयुष्य खर्च करीत आहेत.

**दाही दिशांना जाऊ फिरू, मेघासम आकाश भरू**
**अथक निरंतर परिश्रमाने या भूमीचा स्वर्ग करू....**

भारतमाता की जय

**ॲड. आनंद कुलकर्णी**

◈ ◈ ◈

# कुटुंब प्रबोधन

'कुटुंब' या संस्कृत शब्दाचा व्याकरणिक/भाषाशास्त्रीय अर्थ काय? 'कुटुंबते असौ इति कुटुंबः।' ज्यामध्ये धारण, पोषण, तोषण होते. असा परिवार म्हणजे कुटुंब होय. किंवा 'कुटुंबते अनेन इति कुटुंबः'। म्हणजे असा जो ....परिवार असतो, उदा. संतती, बांधव, स्नेहीजन, वंशवेल म्हणजेही कुटुंब होय. पहिल्या व्याख्येत प्रेरकता आहे, तर दुसऱ्या व्याख्येत फलश्रुती/परिणाम स्वरुपता आहे. मात्र दोन्ही व्याख्या कुटुंब म्हणजे 'नांदते गोकुळ' हेच आपल्या लक्षात आणून देतात आणि असे प्रेम, जिव्हाळा, नाते, बांधिलकी, दायित्व, सहयोग आणि आध्यात्मिकता यांची अमृतवेल किंवा सुवर्णखाण म्हणजे भारतीय संस्कृतीतील, वेदकाळापासून आज अणु-युगापर्यंत, चालत आलेली भारतीय कुटुंबव्यवस्था होय. अशी कुटुंबे संस्कृती निर्माण करतात आणि अशी संस्कृती कुटुंबाचा मुलाधार असते.

अशा आपल्या या कुटुंब व्यवस्थेचे, भारतीय समाज-जीवनाच्या आत्मिक समरसतेसाठी, संरक्षण आणि संवर्धन करणे, नितांत गरजेचे आहे. त्यासाठी कुटुंब प्रबोधनाचे, जन-आंदोलन उभे राहिले पाहिजे. आपल्या स्वराज्याचे, सुराज्य करण्याची हिच गुरुकिल्ली आहे. इंग्रजी भाषेत एक म्हण आहे Charity begins at home. यातही मान्य केले आहे की, 'सद्वर्तनाची आणि सहकार्याची शिकवण', घरच आपणाला देते. कुटुंब पद्धतीच प्रत्येक व्यक्तिमत्वाला, सुसंस्कृत आणि सुजाण नागरिक घडविते. मातेची ममताच, आपल्या मुलाला, साऱ्या विश्वाप्रती भूतदया शिकविते. गीतोक्त 'ध्रुवा ती ती' (१८-७८) आणि गीताप्रणीत देवमाणसाची गुणसंपदा (१६ - १ ते ३) ही मुलालेकरांच्या मनीमानसी ठसविण्याचे काम, घरातील माता पिताच करु शकतात आणि करतात.

अशा कुटुंब व्यवस्थेची योग्यता फार मोठी आहे. म्हणूनच एका उत्तम, अर्थवाही कवितेत म्हटले आहे की,

**''घर असावे घरासारखे, नकोत नुसत्या भिंती।**
**तिथे असावा प्रेम जिव्हाळा, नकोत नुसती नाती।**
**या घरट्यातून पिलू उडावे, दिव्य घेऊनि शक्ती।**
**आकांक्षांचे पंख असावे, उंबरठ्यावर भक्ती।।**

इथे आपण एक विशेष गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, आपली सनातन आणि उदात्त भारतीय संस्कृती, इतिहास-काळातील विविध आक्रमणांच्या, जीवघेण्या माऱ्यातही टिकू शकली याला कारण गावोगावी अस्तित्वात असणारी आपली कुटुंब व्यवस्थाच आहे. ती पूर्वी विशाल होती, सद्यःस्थितीत मर्यादित असेल, पण आपल्या कुटुंब व्यवस्थेचे आत्मीय स्थान, व्यक्तिजीवनात आणि समाजजीवनात आहे तसे कायम आहे. कुटुंबातील माया, ममता, हसू-आसू, भांडण, दिल-जमाई, रुसणे-समजावणे, तसेच रागावणे आणि शाबासकी हे सारे अवर्णनीय असते आणि ही सारी संस्काराची खाण असते. अशी आपली संस्कारशील कुटुंबव्यवस्था, हाच आपल्या उदात्त, उन्नत, संस्कारयुक्त आणि मानवतावादी भारतीय संस्कृतीचा मूलाधार आहे.

तो आपण जपला पाहिजे आणि सतत वाढविला पाहिजे. कारण कुटुंब हेच, सुसंस्कारांचे विद्यापीठ असते. तेथे 'कुटुंब-समाज-राष्ट्र' अशा चढत्या क्रमाने, परिवर्तन साधण्याची, उत्कृष्ट मनोभूमिका तयार करून घेता येते. भारतीय संस्कृतीला प्रिय असणारी विचार धारा, ही अखंड मंडलाकृती आहे. इथे 'व्यक्ती-कुटुंब-समाज-राष्ट्र-सृष्टी-ब्रह्मांड-परमात्मा' अशी प्रत्येक वर्तुळाची कक्षा रुंदावत जाते. पहिल्या वर्तुळाला पोटात घेऊन, मग दुसरे वर्तुळ निर्माण होते. ही वर्तुळे अनेक दिसतात, पण मुळात ती एकमेकांपासून वेगळी नसतात. एका अंतसूत्राने ही वर्तुळे अनेक दिसतात, पण मुळात ती एकमेकापासून वेगळी नसतात. एका अंतःसूत्राने ही वर्तुळे, परस्परांना जोडलेली असतात. यामुळे इथे एकत्वाची आपलेपणाची, तन्मयतेची भावना निर्माण होते. 'मी' हा 'आम्ही' मध्ये विकसित होतो. असा 'एकात्म' भाव भारतीय संस्कृतीला प्रिय आहे आणि तिचा पहिला संस्कार, व्यक्तिमात्रावर जो होतो तो आपल्या भारतीय कुटुंब पद्धतीतच!

मुळात आपली हिंदू संस्कृती ही सनातन आणि पुरातन आहे. सनातन म्हणजे शाश्वत, चिरकाल टिकणारे, तसेच नित्य-नूतन असणारे! ही परमात्म्याची वैशिष्ट्ये आहेत आणि तीच परमात्मा सर्वोच्च मानणाऱ्या, भारतीय संस्कृतीची आहेत! याचा

अर्थ असा की, हिंदू संस्कृतीचे वेगळेपण आहे ते, तिच्या लवचिकतेमुळे आणि सदाबहार प्रवृत्तीमुळे! यामुळेच अत्यंत प्राचीनतम असूनही, या नाविन्याच्या स्वीकार करण्याच्या गुणधर्मामुळे, भारतीय संस्कृती कधी कालबाह्य झाली नाही.

या यशस्वीतेसाठी अनेक कारणे आहेत, पण त्यात एक महत्त्वाचे कारण आपली कुटुंब व्यवस्था आहे. आपल्याकडे आदर्श कुटुंब व्यवस्थेला 'धन्यो गृहस्थाश्रमः।' म्हटले आहे. कसे कुटुंब आपणास हवे आहे? तर जेथे परमेश्वराचे स्मरणपूर्वक अधिष्ठान आहे, सदा सर्वदा आणि सर्वत्र आनंद भरला आहे, अन्नपूर्णा अशी पत्नी आहे, बुद्धिमान असणारी आणि विवेकपूर्ण वर्तन करणारी संतती आहे, सन्मित्रांचा सहवास आहे, आदर आणि कृतज्ञता बाळगणारी नातेवाईक मंडळी आहेत, जेथे सतत आदरातिथ्य होते आणि मृदूभाषा व प्रेमळ वागणूक, ही वरदाने वास करतात तो गृहस्थाश्रम धन्य होय.

**''सानन्दं सदनं सुताश्च सुधियः कान्ता मनोहारिणी।**
**सन्मित्रं सुहृदं तथा वंधवजतो आज्ञापरा सेवकाः।**
**पाण्डित्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्नपातं गृहे।**
**साधोः संगमुपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः।।''**

खरे सांगायचे तर आपली हिंदू कुटुंबपद्धती म्हणजे एका अर्थाने, उदात्त आणि उन्नत भारतीय संस्कृतीचे संवर्धन, वहन आणि संक्रमण व्हावे, यासाठी निर्माण केलेली सुजाण व्यवस्थाच आहे! माणसाच्या प्राथमिक गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा. शिक्षण आरोग्य या कुटुंबातच पूर्ण होतात. पण भावनिक, वैचारिक, बैद्धिक आणि सामाजिक विकासासाठी, आवश्यक असणारी, मनोभूमिकाही भारतीय कुटुंब पद्धतीतच निर्माण केली जाते.

इथेच परस्पर नातेसंबंधांची घट्ट बांधणी होते. एकमेकांत बळकट दृढ नाते निर्माण होते. परस्परांसाठी झीज सोसण्यात आनंद वाटतो. कर्तव्य सेवा, सहयोग, दायित्व, देवमाणसाचे गुण आणि मानवी जीवनाची खरी सार्थकता, इथेच कळते. त्याच बरोबर 'स्व' च्या बाहेर जाऊन, लोककल्याणाच्या किंवा इतरेजनांच्या सौख्याच्या संकल्पना, मनावर घट्ट बिंबवण्याचे श्रेय, कुटुंब व्यवस्थेकडेच जाते. जसे मनुष्य धर्म, मानवता यांच्यासाठी जे जे करायचे, ते 'पुण्य' आणि ज्यात मानवमात्राचे अहित होईल, ते 'पाप' – ही शिकवण, ही श्रद्धा, आपल्या कुटुंब पद्धतीत सहजपणे शिकविली जाते, आत्मसात करुन घेतली जाते! थोडक्यात आदर्श मानवी जीवनासाठी, सुखी – समाधानी समाज जीवनासाठी उदात्त, उन्नत जगण्यासाठी जी जी जीवनमूल्ये, पायाभरणीचे काम करतात, त्यांचे प्रकटीकरण आणि दृढीकरण करण्याची व्यवस्था म्हणजे कुटुंब होय.

आपण असे पाहतो की, काळ बदलतो म्हणजे सर्वार्थाने परिवर्तन होत असते. परिवर्तन हा जीवनाचा, साऱ्या विश्वाचा स्थायीभाव आहे. पण याचा अर्थ असा नाही की, बदलत्या काळाप्रमाणे, मूळची चिरंतन मूल्ये, शाश्वत मूल्ये टाकून द्यावीत आणि तकलादू, उथळ, हीन मूल्यांनाच नव्याच्या हव्यासापोटी आधुनिकता म्हणून मिरवावे! कदाचित् आधुनिकतेमुळे आपल्या जीवनशैलीत, बदल होऊ शकेल, पण मूळची शाश्वत मूल्ये कधी बदलत नाहीत! सुख, समाधान, प्रेम, करुणा, दयाभाव, स्वावलंबन, परोपरकार, विश्वास, सत्य, त्याग, क्षमाशीलता आणि उदात्तता या गोष्टी कधीच कालबाह्य होत नाहीत. आपले कुटुंब आणि समाज, शिक्षणपद्धती आणि सामाजिक व्यवस्था या माध्यमांतून, याच श्रद्धांचे आणि याच आस्थांचे परिपालन आणि संवर्धन, होत राहिले पाहिजे.

पण आज दुर्दैवाने उलटीच परिस्थिती दिसते. आज आपल्या समाजात आपमतलबी आणि विखारी प्रवृत्तीचेच प्रमाण वाढत चालले आहे. दुभंगलेली मने, विखुरलेला समाज, ध्येयहीन तरुणाई, अविचारी प्रवृत्ती आणि एक प्रकारचे कंटाळलेपण, पराकोटीची अस्वस्थता याच गोष्टी प्रत्यही वाढत चालल्या आहेत. या सर्वांवर एकच उपाय आहे तो म्हणजे सुदृढ मनोबल निर्माण करणारी संस्कार केंद्रे म्हणून संस्कारक्षम आणि सशक्त अशा कुटुंब व्यवस्थेचे पुनरुज्जीवन व्हायला पाहिजे. कितीही कष्ट, संकटे, वेदना, झेलाव्या लागल्या तरी, चांगले तेच आचरणात आणणार अशी जिद्द असणारे, संस्कार केंद्र म्हणजे आपली आत्मियतेने भरलेली आणि भारलेली कुटुंब व्यवस्था तीच आपण अधिकाधिक बळकट केली पाहिजे.

- यासाठी काही महत्वाचे मुद्दे/काही परिचय बिंदू आपण लक्षात ठेवले पाहिजे ते असे –

१) संपूर्ण विश्वामध्ये कुटुंब व्यवस्थेची प्रथम निर्मिती आणि तिचा आदर्शवत् विकास, आपल्या भरतखंडातच झालेला आहे.

२) कुटुंबातील परस्पर जिव्हाळ्याचे नाते संबंध आणि त्या त्या नात्यानुसार निर्माण होणारे उत्कट भावबंध यांची सहज, स्वाभाविक रचना, भारतीय कुटुंब पद्धतीतच घडत गेली आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत राहिली.

३) कुटुंबातील सर्वासर्वांना, भावनिक दृष्टीने सतत जोडत रहाणारी कुलाचार परंपरा, विविध सण आणि वैशिष्ट्यपूर्ण उत्सव हे भारतीय कुटुंब पद्धतीचे अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे.

४) स्वतःचा विकास करीत असताना, आपल्या कुटुंबाच्या सौख्य, समाधान आणि समृद्धीचा विचार करणे आणि

त्यापुढे जाऊन कुटुंबाची प्रगती साधत असताना, सामाजिक भान सुटू न देणे आणि राष्ट्रधर्माची नाळ तुटू न देणे, हे भारतीय कुटुंब पद्धतीचे सहज–स्वाभाविक लक्षण आहे.

५) सुसंस्कृत सत्त्वशील आणि उदार हृदयी कुटुंबे म्हणजे काय? याचे उदाहरण थेट रामायण, महाभारत काळापासून आजपर्यंत आपल्या भरतखंडात प्रत्यही दृष्टोत्पत्तीस येतात.

६) कुटुंबातील ज्येष्ठांनी, कुटुंबाला यथायोग्य मार्गदर्शन करावे, सुयोग्य वळण लावावे आणि लहानांनी, त्याचा आदरपूर्वक स्विकार आणि अंगीकार करावा, हा संस्कार प्रत्येक पिढीत संक्रमित होत जातो हे आपल्या भारतीय संस्कृतीचे त्यातील कुटुंब पद्धतीचे वैशिष्ट्य आहे.

अशी आपली ही भारतीय कुटुंब व्यवस्था, अधिक शक्तिमय, अधिक भक्तिमय आणि अधिक आनंदमय व्हावी म्हणून आपल्या पूर्वीच्या संत महंतांनी आपणास यथायोग्य मार्गदर्शन केलेले आहे. जसे संत म्हणतात, काळाच्या ओघात, आज कुटुंबामध्ये कलह, तणाव, भोगवादी प्रवृत्ती आणि अनेक भ्रम दिसून येत आहेत. जसे 'वाघे उपदेशिला कोल्हा.... गाठ पडली ठकाठका।' अशी स्थिती झाली आहे. 'जन्मा आलिया गेलिया। परि भक्ति नाही केली। माझे माझे म्हणोनिया। गुंतलीया मेली।' असेच चित्र कितीतरी कुटुंबात दिसत आहे. या स्थितीत 'मन माझे चपळ। न राही निश्चला' ही स्थिती बदलली पाहिजे. म्हणून आपण घरोघरी भक्तिमय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

'आवडे हे रुप। गोजिरे सगुण। पाहता लोचन। सुखावले।।' अशी श्रीविठ्ठल – भक्तीची गोडी, आपल्या तरुण पिढीला लागली तर, किती बरे होईल? 'एवं कामावाचूनि कांही। जगा मूळचि आन नाही। ऐसी बोलती पाही। असुर गा ते।' अशा आजच्या दुर्दैवाने प्रतिष्ठा प्राप्त आसुरी। राक्षसी हे विचारांना बदलण्याचा निकराने प्रयत्न आपण केला पाहिजे. आपले घर हे शक्तिमय ही असले पाहिजे. 'आळस उदास नागवणा। आळस प्रयत्न बुडवणा। आळसे करंटेपणा। – खुणाच प्रकटती हे कधीच विसरुन चालणार नाही. म्हणूनच 'झिजल्यावाचून कीर्ती कैची। मान्यता नव्हे की फुकाची।' हे आपल्या वर्तनातून, ज्येष्ठांनी कनिष्ठांना पटवून दिले पाहिजे. घरातील माता भगिनींना अन्नपूर्णा, लक्ष्मी, सरस्वती आणि दुर्गा चा रुपांमध्ये पाहण्याची शिकवण, आपण मोठ्यांनी, लहानांना कटाक्षपूर्वक दिली पाहिजे.

'जोडोनिया धन। उत्तम विचारे। उदास विचारे। वेल करी।' असा विश्वात्मकतेचा अंश आपल्या घरातील व्यवहारात जोपासला गेला पाहिजे. 'अणुरणिया थोकडा। तुका आकाशाएवढा।' ही आत्मशक्तीची जाणीव, आपल्या कुटुंबात प्रयत्नपूर्वक वाढविली पाहिजे. याच बरोबर 'सुख पाहता जवापाडे। दुःख पर्वताएवढे।' याची ही जाणीव दैनंदिन व्यवहारात, प्रत्यही येत असली तरी 'मन करावे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण।' ही जाणीवही आपण पुढच्या पिढीला दिली पाहिजे. त्यासाठी 'असाध्य ते साध्य। करिता सायास। कारण अभ्यास। तुका म्हणे।' ही संतोक्ती आणि 'चल तो देव जाणावा। अंतरी धरिती बरे।' 'वन्हि तो चेतवावा रे। चेतविताचि चेतते। विवेक जाणिजे तैसा। वाढविताचि वाढतो।।' ही समर्थोक्ती, सदैव लक्षात ठेवली पाहिजे. आणि कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे। हा जगद्गुरु तुकोबारायांचा विचार आणि संस्कारही लक्षात ठेवला पाहिजे.

## ● करणीय गोष्टी

१. आपले कुटुंब सुखी, समाधानी, सात्त्विक आणि समृद्ध होण्यासाठी सूर्यनारायण भास्कराने दिलेला 'भ' अक्षरयुक्त षड्योग, आपण कटाक्षाने आचरणात आणला पाहिजे. त्या सहा गोष्टी म्हणजे भाषा, भूषा, भजन, भोजन, भवन आणि भ्रमण. म्हणजे असे की मातृभाषेचाच अंगीकार, अभिरुची संपन्न वेषभूषा, सदोदित मंगल भजन, सात्विक व आनंदमयी भोजन, अतिथ्यशील असे आपले भवन आणि कुटुंबातील सर्वांचे, अनुरुप भ्रमण (तीर्थक्षेत्रे, कुल दैवते, ऐतिहासिक स्थळे यांचे दर्शन घेण्यासाठी, जाणीवपूर्वक वेळोवेळी केलेले भ्रमण) हा षड्योग सुखाची गुरुकिल्ली आहे. २. महिन्यातून दोन, तीन वेळा सर्वांनी एकत्र बसून काय नवीन पाहिलं, ऐकलं, वाचलं? या विषयावर गप्पा मारल्या पाहिजेत. ३. घरातील टी.व्ही. चा उपयोग सर्वांनी विचारपूर्वक केला पाहिजे. मनोरंजनाला मर्यादा आहे याचेही भान ठेवले पाहिजे. ४. जेवताना टी.व्ही. बघणे कटाक्षाने टाळले पाहिजे. ५. नवी पिढीही सतत मोबाईलमध्ये गुंतत आहे, त्यांना नीट समजावून सांगून, सावद केले पाहिजे. ६. घरात गीता, महाभारत, रामायण शिवभारत आणि भारतीय संविधान आणले पाहिजेत. त्याची ओळख सर्वांना हवी. ७. याचबरोबर ज्ञानेश्वरी, तुकोबांची गाथा आणि दासबोध कुटुंबाच्या वाचनात असावा. ८. वाढदिवस प्रसंगी सामाजिक संस्थाना दान करावे.

**प्रकाश क्षीरसागर, कुटुंब प्रबोधन सहप्रांत संयोजक**
**प. महाराष्ट्र प्रांत, संपर्क : ९८२२०७४११०**

◈ ◈ ◈

# सामाजिक समरसता व हिंदू संघटन

१) खरं तर, देश स्वतंत्र होऊन आज ८० व्या वर्षांत पदार्पण करत आहे, पण सामाजिक समरसते सारखा विषय आजही तितकाच ज्वलंत आहे. म्हणूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आपल्या शताब्दी वर्षात जे महत्त्वाचे पंच परिवर्तनाचे मुद्दे घेतले आहेत, त्यातील एक मुद्दा म्हणजे सामाजिक समरसता, ज्याचे अभिसरण पूर्ण देशभर होण्याची गरज आहे, आणि म्हणून पुढील वर्ष दीड वर्षात संघ हा विषय समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहे.

२) समरसता म्हणजे समाजामध्ये कोणत्याही प्रकारचा भेद न ठेवता सर्व लोकांनी एकत्र, समान आणि प्रेमाने राहणे. ही फक्त समानता नाही, तर त्याहून अधिक आहे, समानता ही कायद्याची किंवा नियमांची गोष्ट असते, तर समरसता ही भावनिक एकात्मता आणि सलोख्याची भावना आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, समरसता म्हणजे समाजातील सर्व घटकांनी, मग ते कोणत्याही जातीचे, पंथाचे किंवा आर्थिक स्तराचे असोत, एकमेकांना समान आणि आदराने वागवणे, एकमेकांच्या सुखःदुःखात सहभागी होणे, कोणी लहान अथवा मोठा नाही असा भाव ठेवणे, सर्वांना मान देणे, समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करणे, मदत करणे.

३) समरसतेचा विचार अनेक भारतीय संतांनी, संघटनानीं तसेच महापुरुष आणि समाजसुधारकांनी मांडला आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या योगदानाला विशेष महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीभेद आणि विषमतेविरुद्ध जो लढा दिला, त्याचा मुख्य उद्देश समाजात समरसता निर्माण करणे हाच होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वांना कायदेशीर समानता दिली, अस्पृश्यता नष्ट केली आणि कोणत्याही व्यक्तीला जात, धर्म किंवा लिंगाच्या आधारावर भेदभाव करता येणार नाही याची संविधानात तरतूद केली, काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन करून समाजातील सर्व घटकांना मंदिरात प्रवेश मिळावा यासाठी संघर्ष केला. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा असा मंत्र देऊन त्यांनी मागासलेल्यांना व वंचितांना समान न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले.

४) महात्मा ज्योतिबा फुले यांनी समरसतेच्या कार्याला सामाजिक क्रांतीची जोड दिली. शिक्षणाचे कार्य करताना त्यांनी पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या सहयोगाने मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली, शिक्षण हे सामाजिक भेदभावावर मात करण्याचे सर्वात मोठे साधन आहे हे त्यांनी ओळखले होते. सत्य शोधक समाज संघटनेच्या माध्यमातून त्यांनी जाती-भेदावर प्रहार केला होता, त्यांनी समानता आणि मानवाचे अधिकार या मूल्यांवर आधारित समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला, शेतकरी व कामगारांसाठी कार्य केले, त्यांच्या आर्थिक शोषणाविरुद्ध आवाज उठवला, त्यांच्या हक्कासाठी प्रदीर्घ लढा दिला ज्यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये एकोपा निर्माण झाला.

५) छत्रपती शाहू महाराजांचे तर याबाबतीतले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांनी खऱ्या अर्थाने आरक्षणाची सुरुवात केली. शासकीय नोकऱ्यांमध्ये वंचित व मागासलेल्या समाजाला आरक्षण लागू केले त्यामुळे मागासलेल्या वर्गाला प्रगतीची संधी मिळाली. व अशा समाजाचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केले. राज्यातील मुलामुलींसाठी शाळा सुरू केल्या आणि शिक्षणाची गंगा सर्वदूर पोहचवण्या साठी प्रयत्न केले.

६) संघटनेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे या बाबतीत फार मोठे योगदान आहे. मुळातच, संघाच्या स्थापनेसाठीचा मूळ विचार किंवा प. पू. डॉ. हेडगेवार यांचे अनेक वर्षांचे यावरील चिंतन याचा मूळ गाभाच हा होता की, आज ना उद्या आपल्याला स्वातंत्र्य मिळेल किंवा ते त्यांना द्यावेच लागेल, पण आपण ते घेण्यासाठी आणि ते चिरंतन टिकवण्यासाठी सक्षम आहोत का? भौगोलिक किंवा भौतिक गोष्टींचा हा विचार नव्हता, तर मुळापासून हिंदू समाज हा

संघटित नाही. भेदभाव आणि जातीभेदाने पोखरलेला असल्याने, एक इंग्रज जाईल पण दुसरा इंग्रज येऊन आपल्यावर अधिकार गाजवणार नाही कशावरून? हा मुख्य विचार होता. जोपर्यंत हिंदू समाज संघटित, जाती–पातीच्या पलिकडे जाऊन विचार करणारा, भेदभाव आणि जातीभेदाला गाडून टाकणारा हिंदू समाज निर्माण होत नाही, तोपर्यंत स्वातंत्र्याला खरा अर्थ नाही. म्हणूनच प. पू. डॉ. हेडगेवारांनी १९२५ साली रा. स्व. संघाची स्थापना केली.

७) पुढे संघाचे द्वितीय सरसंघचालक श्री. गुरुजींनी तर सामाजिक समरसतेसाठी अनेक चांगल्या गोष्टी संघविचाराच्या कार्यात घडवून आणल्या, अस्पृश्यतेची रूढी परंपरा श्रीगुरुजींना अजिबात मान्य नव्हती,ती त्यांना अत्यंत व्यथित करणारी होती. ही वाईट प्रथा आपल्या समाजातून मुळापासून कशी हद्दपार होईल, याची चिंता त्यांना सतत सतावत असे.

अस्पृश्यतेचे त्यांनी तीन भागांत वर्गीकरण केले होते: एक म्हणजे अस्पृश्यांना अस्पृश्य मानणारा सवर्ण समाज; दुसरा, अस्पृश्यतेचा बळी ठरलेला व स्वतःला अस्पृश्य मानणारा अस्पृश्य समाज; आणि तिसरा, या रूढीला धार्मिक मान्यता देणारा धर्माचार्यांचा वर्ग. श्रीगुरुजींनी या तिन्ही आघाड्यांवर ऐतिहासिक कार्य करून समाजात समरसता आणण्याचा जोरदार प्रयत्न केला.

८) यातील एक भाग म्हणजे, श्रीगुरुजींच्या प्रयत्नातून एक अभूतपूर्व ऐतिहासिक धर्मसंसद पार पडली. १९६९ मध्ये विश्व हिंदू परिषदेच्या माध्यमातून श्रीगुरुजींनी सर्व संप्रदायांचे धर्माचार्य, यात शैव, वीरशैव, मध्य, वैष्णव, जैन, बौद्ध इत्यादींना एकत्र आणून, एकाच व्यासपीठावर आणले व सर्वांच्या संमतीने एक प्रस्ताव पारित करून संपूर्ण हिंदू समाजाला आवाहन केले गेले की, त्यांनी श्रद्धेय सर्व धर्मगुरूंच्या निर्देशानुसार आपल्या सर्व धार्मिक व सामाजिक अनुष्ठानातून अस्पृश्यता बाहेर काढून टाकावी.

हिन्दवः सोदराः सर्वे, न हिंन्दुः न हिंन्दु पतितो भवेत अशी उदघोषणा करून कोणीही हिंदू दलित नाही वा कोणीही हिंदू पतित नाही, आपण सर्वजण बंधू आहोत, असे आवाहन हिंदू समाजाला करण्यात आले. त्यामध्ये पूज्य धर्माचार्यांचा ऐतिहासिक निर्देश असा होता – सर्व हिंदू समाजाला एका अविभाज्य एकात्मतेच्या सूत्रात गुंफून संघटित करण्यासाठी तसेच स्पृश्यास्पृश्यतेच्या भावनेने व प्रवृत्तीने प्रेरित विघटन रोखण्यासाठी. जगातील हिंदूंनी आपल्या परस्परातील व्यवहारात एकात्मता तसेच समानतेची भावना आपल्या मनात रुजवली पाहिजे. श्री. गुरुजींच्या मते, या प्रस्तावाचा स्वीकार हिंदू समाजाच्या इतिहासात एक क्रांतिकारक पाऊल मानले जाईल आणि एका विकृत परंपरेवर खऱ्या धर्म भावनेचा व एकात्मतेच्या विजयाचा सुवर्णक्षण ठरेल.

९) पुणे येथील वसंत व्याख्यानमालेत, दि. १६ मे १९७४ रोजी संघाचे तृतीय सरसंघचालक मा. श्री. बाळासाहेब देवरस यांनी सामाजिक समता व हिंदूसंघटन या विषयावर भाषण दिले. या भाषणात बाळासाहेबांनी अनेक सामाजिक प्रश्नांबाबत संघाची भूमिका स्पष्ट केली. अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, आरक्षण, आंतरजातीय विवाह इत्यादी बाबतीत अत्यंत स्पष्ट भूमिका या भाषणात मांडण्यात आली. त्याचबरोबर धर्माच्याऱ्यांनी जुन्या धर्म ग्रंथातील कालसापेक्ष व कालबाह्य मुद्दे ठरविले पाहिजेत व समाजात जाऊन त्याची पुर्नमांडणी करावी अशीही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. बाळासाहेबांनी अस्पृश्यतेवर बोलताना अब्राहम लिंकनच्या एका वाक्याचा संदर्भ देत असे म्हटले, ''जगात जर अस्पृश्यता वाईट नसेल तर दुसरी कोणतीही गोष्ट वाईट नाही.''

मा. बाळासाहेब देवरासांचे हे भाषण म्हणजेच संघाची खरी भूमिका मांडणारे होते. वसंत व्याख्यानमालेतील या भाषणानंतर सामाजिक विषयांबद्दलची विचार प्रक्रिया सुरू झाली आणि त्यानंतर, समरसता विषयासाठी या विचारप्रक्रियेतून, चिंतनानंतर अशा सामाजिक प्रश्नांबाबत स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी व तसेच समाजप्रबोधन करण्यासाठी, दि. १४ एप्रिल १९८३ रोजी वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तावर व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. हेडगेवार यांच्या जयंतीनिमित्त 'सामाजिक समरसता मंच' ची स्थापना करण्यात आली. पुढे गेली ४५ वर्षे 'समरसता मंच' च्या माध्यमातून व सध्या समरसता व सदभाव गतिविधींच्या माध्यमातून समाजात अनेक कार्यक्रम, उपक्रम व अभियानातून मोठ्या प्रमाणात या विषयाचे अभिसरण करून तळागाळापर्यंत विषय पोहोचवून समाजमन घडविण्याचा प्रयत्न केला व अशा अवघड विषयात सुद्धा रा. स्व. संघाने केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांना हिंदू समाज सुद्धा सकारात्मक प्रतिसाद देताना लक्षात येत आहे.

**ॲड. संतोष गुरव**
**पुणे विभाग संयोजक, सामाजिक सदभाव कार्य**

◈ ◈ ◈

# कथ्य (narrative) चे प्रयोग आणि विमर्शा ची आवश्यकता

गेल्या अनेक वर्षापासून एक शब्द आपण ऐकत आलो आहोत ज्याला की मराठीत कथ्य आणि इंग्रजी मध्ये परीरींळींश असे म्हटले जाते. एक व्याख्या ह्या बाबतीत अशी केली जाते की Narrative means false storey teliing for political or religious intentions. एका अर्थाने हा कथ्य किंवा narrative शब्द नकारात्मक आहे आणि त्याला पर्यायी शब्द म्हणून खूप वेळा वापरला जातो तो विमर्श हा शब्द पर्यायी वाचक शब्द नाही तर विमर्श ही एक सत्याची बाजू मांडणारी वस्तुस्थिती आहे.

भारतात विदेशी आक्रमणाची विविध रूपे होती. त्यातील इस्लामिक आक्रमण हे थेट तलवारीच्या, शस्त्राच्या आधारावर झालेले धार्मिक आणि राजकीय आक्रमण होते. जगातील सर्वश्रेष्ठ धर्मग्रंथ आणि धर्म आमचा आहे. तो स्वीकारा अथवा मरणास तयार व्हा असा त्यांचा थेट अजेंडा होता. त्यामुळे दुसरे धार्मिक स्थळे, धार्मिक श्रध्दा आणि धार्मिक ग्रंथ हे त्यांचे लक्ष होते. मोठ्या प्रमाणावर धर्मांतर घडवून आपली धार्मिक सत्ता तेथे प्रस्थापित करणे हा एकमेव उद्देश घेऊन ही आक्रमणे होत राहिली. त्यांनी निर्माण केलेली कथ्य ही तात्कालिक होती किंवा त्याचा पराभव हा मुखत्वे शक्तीच्या आधारावर होण्यासारखा होता, आहे.

पण त्यानंतर वसाहतवादी वृत्तीने व्यापारासाठी पाश्चात्य देशातून डच, पोर्तुगीज, फ्रेंच, ब्रिटिश हे भारतात आले. त्यातील ब्रिटिश हे भारतात आपले साम्राज्य प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले . पुढे त्यांना हे साम्राज्य दीर्घकाळ टिकवण्यासाठी काही डावपेच आखणे गरजेचे वाटले आणि मग त्यांनी भारतीय (हिंदू) सामाजिक व्यवस्थेतील दोष हेरण्यास सुरुवात केली. (Fault lines) हळुहळू हे दोष कसे आणखी वाढवता येतील असा प्रयत्न त्यांच्या कडून सुरुवात झाली. येथेच भारतातील कथ्य (narrative), पारी तंत्र (discourse आणि eco system ) ह्याचा जन्म झाला.

खोट्या गोष्टी किंवा कथ्य पसरवण्यासाठी मग सर्वप्रथम इतिहास लिहिण्याचे काम सुरू झाले. मग शिक्षण व्यवस्था लक्ष केली गेली. शिक्षणात इंग्रजी भाषेचा वापर सुरू झाला आणि बघता बघता आपला देश आत्मविस्मृतीच्या लाटेवर आरूढ होऊन आणखी अधःपतीत होत गेला. देशात स्वातंत्र्याची चळवळ उभी राहिली पण ह्या चळवळीची दिशा नेमकी काय असावी? ह्या बाबतीत संभ्रम अवस्था निर्माण झाली. राष्ट्र आणि राज्य तसेच धर्म आणि पंथ ह्या बाबतीत गोंधळ उडवून देण्यात ब्रिटिश यशस्वी झाले.

ह्यातून आर्य भारतात बाहेरून आले हा सिद्धांत पुढे आला. ह्या सिद्धांताच्या आधारावर आर्य आणि द्रविड हे द्वैत मांडले गेले. आदिवासी किंवा मूळ निवासी विरुद्ध शहरवासी हा सिद्धांत मांडला गेला. स्वातंत्र्याची चळवळ उभी करणारे जर आर्यांचे प्रतिनिधी असतील तर आम्ही म्हणजे ब्रिटिश, मुस्लिम आणि तुम्ही म्हणजे हिंदू हे सगळेच बाहेरून आले आहेत मग स्वातंत्र्य कसले मागता? असा प्रतिवाद केला जाऊ लागला. दुसरीकडे सर सय्यद अहमदखान ह्यांचा द्विराष्ट्र सिद्धांत वाद प्रोत्साहित केला गेला आणि ह्या चक्रव्युहात अडकलेल्या आमच्या नेत्यांनी हिंदी राष्ट्रवाद ह्या सिद्धांताच्या आधारावर Nation in making चा प्रचार सुरू केला. भारताच्या फाळणीची जी अनेक कारणे आहेत त्यात ह्या प्रकारची कथ्य पण कारणीभूत ठरली.

ह्या कथ्य (narrative) निर्मितीतून हिंदू – शीख, हिंदू – जैन, हिंदू – बौद्ध असे भेद होत गेले. त्यातून ह्या भेदाच्या आधारावर ब्रिटिश हे दीर्घकाळ राज्य करत राहिले. आत्मविस्मृतीतून आपला प्रवास आत्मनिंदेकडे सुरू झाला आणि जे, जे सनातन अथवा प्राचीन ते वाईट, चुकीचे, अवैज्ञानिक आणि पश्चिमेकडून येणारे सगळे प्रागतिक, योग्य आणि वैज्ञानिक असा आभास निर्माण करण्यासाठी, ब्रिटिशांच्या निर्माण झालेल्या शिक्षण पद्धतीतून विचारवंतांच्या टोळ्या निर्माण झाल्या.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर ह्या सगळ्या मध्ये बदल होणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने हीच कथ्ये (narrative) पुढे नेणारी आणि हीच नीती अंमलात आणणारे सरकार ह्या देशात स्वतंत्र भारतात अस्तित्वात आले. किंबहुना ही कथ्य (narrative)

अधिक गतीने पुढे नेण्याचा प्रयत्न केला गेला. शिक्षण, साहित्य आणि कलेच्या क्षेत्रातून विविध कथ्ये (narrative) समाजामध्ये प्रस्थापित केली गेली. खलिस्तानची चळवळ, दक्षिण/उत्तर वाद, भाषिक वाद, पूर्वांचल मधील फुटीर चळवळी, नक्षल आणि माओवादी चळवळ ही सगळी विषारी फळे ह्या कथ्यातून निर्माण झाली.

**ह्या बरोबरीने स्त्रीवादी चळवळ जी की खरे तर पाश्चात्य**

देशात बायबल मधील स्त्रियांच्या दुय्यम लेखण्यातून आणि अत्याचारातून निर्माण झाली होती त्या स्त्री वादी चळवळीची कथ्ये भारतीय समाज जीवनात अशा प्रकारे पुढे आणली गेली की त्यामुळे भारतीय कुटुंब व्यवस्थेवरच आघात सुरू झाले. जाहिरातींचे आणि दूर चित्रवाणीचे युग सुरू झाले आणि वैश्विक व्यापारी शक्ती

ह्यांनी ह्याचा खुबीने उपयोग सुरू केला. कोलंबिया विद्यापीठात सुरू झालेला सांस्कृतिक (?) मार्क्सवाद एव्हाना भारतात ही विश्व विद्यापीठे आणि विद्यार्थी जगतात शिरकाव करून प्रस्थापित झाला होता आणि त्याचे परिणाम म्हणून भारतात तुकडे तुकडे गँग, लुटियन्स मीडिया ह्यांचा जन्म झाला.

शत्रूबोध न समजल्यामुळे स्वतंत्र भारतात आत्मविस्मृतीची प्रक्रिया अखंड चालूच राहिली आणि त्यातून 'स्व' चा बोध आम्ही स्वातंत्र्य मिळूनही विसरून गेलो. पारतंत्र्यात निर्माण झालेल्या परकियांच्या खुणा पुसून टाकण्या ऐवजी त्या जपण्याची मानसिक गुलामगिरी ही स्वातंत्र्य हे केवळ सत्तांतर भासायला लागले. भारत की इंडिया? ह्या संदर्भात संभ्रम झाल्याने धोरणात्मक विषयात 'इंडिया' प्रभावी ठरू लागले.

'हिंदू' ह्या शब्दाची व्याख्या ब्रिटिशांनी जी केली त्याचेच अनुसरण करून सेक्युलॅरिझम किंवा धर्मनिरपेक्षता ह्या शब्दांच्या मायाजालात अडकून आम्ही हिंदू, हिंदुत्व हे शब्द शिवीसमान ठरवले आणि परिणाम स्वरूप स्वतंत्र भारतात बहुसंख्य हिंदू समाज एका न्यूनगंड झालेल्या मानसिकतेत वावरत होता.

ह्या कथ्याच्या विरोधात विमर्श प्रस्थापित करण्याची प्रक्रिया राष्ट्रभक्त आणि तपस्वी भारतीय चिंतनशील व्यक्ती, संघटना ह्यांनी सुरू केली होती. स्वामी विवेकानंद ह्यांचे शिकागो येथील भाषण हा त्यातील एक महत्वपूर्ण टप्पा होता. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वात, लाला लजपतराय आणि बिपिनचंद्र पाल ह्यांनी बंगालची फाळणी रद्द करून दाखवली होती ते त्यांना भारतीय समाज जीवनाची आणि सनातन राष्ट्र परंपरेची जाणीव होती म्हणून. पुढे योगी अरविंद ह्यांनी अध्यात्माच्या माध्यमातून आणि पूजनीय डॉक्टर हेडगेवार ह्यांनी संघटनेच्या रूपातून ही कथ्या च्या विरोधातील विमर्शची लढाई चालू ठेवली. (होय, हे हिंदू राष्ट्र आहे!) सावरकर संघटन उभे करू शकले नाही पण ह्या कथ्या च्या विरोधात वैचारिक मांडणी ते करत राहिले.

पूजनीय बाबासाहेब आंबेडकर, संत परंपरा आणि वारकरी संप्रदाय, संत गाडगे महाराज, संत तुकडोजी महाराज ह्या सर्वांना सरसगट डावे ठरवण्याचा प्रयत्न केला गेला. विद्रोही विचाराचे म्हणून प्रसार करण्यात आला.

इतिहासाची मोडतोड करताना स्वातंत्र्याचा इतिहास हा सुद्धा एका विचारसरणीला श्रेय देण्यासाठी लिहला गेला तर छत्रपती शिवराय, राणाप्रताप, पृथ्वीराज ह्यांचा लढा हा वेगळ्या पद्धतीने (तथाकथित धर्म निरपेक्ष पद्धतीने) मांडण्याचे पण प्रयत्न केले गेले.

ह्या सगळ्याला उत्तर देण्यापेक्षा, भारताला खऱ्या अर्थाने स्वतंत्र आणि सनातन पण नित्य नूतन राष्ट्र म्हणून उभे करण्यासाठी सकस राष्ट्रीय विचाराने परिपूर्ण असे विमर्श प्रस्थापित करण्याचा एक योजनाबद्ध प्रयत्न करण्याची गरज आहे. जसे कथ्य हे खोटे आणि नकारात्मक असतात तसे विमर्श हे सत्याची दुसरी बाजू असते आणि ते सकारात्मक असतात.

ब्रिटिशांनी १००/१५० वर्षे देशावर राज्य करताना जे कथ्या चे प्रयोग केले आणि पुढे ६०/७० स्वकियानी ते पुढे चालू ठेवले ते निष्प्रभ ठरवण्यासाठी राष्ट्रभक्त मंडळींना योजनाबद्ध प्रयत्न करावे लागतील. इतिहासाचे पुनर्लेखन करावे लागेल. मातृभाषेचा आग्रह धरताना भाषिक वाद निर्माण होणार नाही ह्याची काळजी घ्यावी लागेल. सरस्वती नदीचा शोध हा विषय इतिहास संकलन समिती ज्या पद्धतीने हाताळून यशस्वी होत आहे तसे अभ्यासाची केंद्र उभी करावी लागतील.

विद्यापीठातील अध्यासन केंद्रात अभ्यासाची दिशा बदलून ती भारत केंद्रित करून विमर्शची ही लढाई जिंकायची आहे. कथ्य पराभूत होणारच आहेत पण विमर्श प्रस्थापित करण्याचे आव्हान आपल्याला पेलायचे आहे.

**रवींद्र मुळे, अहिल्यानगर.**

# पर्यावरण संरक्षण - सामाजिक परिवर्तनाची गरज

भारतीय विचार तत्वामध्ये पर्यावरणास मोठे स्थान दिलेले आहे. अगदी प्राचीन काळापासूनच पर्यावरण हा आपल्या जगण्याचा एक महत्वाचा भाग म्हणून मानला गेला आहे. आज आपले साजरे होणारे सर्व सण जर लक्षात घेतले तर या सर्व सणांमागे पर्यावरणाची जोड कायमच दिसून येते. हे केवळ महाराष्ट्रातच आहे असे नव्हे तर संपूर्ण भारतात वेगवेगळ्या आचार पद्धतीत आणि संस्कृतीमध्ये दिसून येते. याचे महत्वाचे कारण म्हणजे पर्यावरणाप्रती प्रत्येक व्यक्तीची भावना हि अत्यंत कृतज्ञेची असली पाहिजे असा संस्कार विविध सणांमधून घालून दिलेला आहे. जीवनाची पंच तत्वे म्हणजेच जल, वायू, अग्नी, पृथ्वी आणि आकाश हे निसर्गाचे अविभाज्य अंग आहेत. आपल्याकडे भूमीला माता म्हणून संबोधले जाते तर जल हे प्रत्येक पूजेत प्रथम पूजले जाते. शुद्धतेचे प्रतिक म्हणजे जल असा भाव अगदी पुरातन काळापासून आपल्या संस्कृतीत दिसून येतो. अग्नीची प्रखरता म्हणजे वीरता हि प्रत्येक व्यक्तीच्या अंगी असली पाहिजे याकरिता सूर्योपासना नियमितपणे केली जाते तर वायू म्हणजे वातावरण हे सदोदित स्वच्छ व निर्मल राहावे या करिता घराघरात तुलसीचे पूजन दिसून येते. आकाश तत्व हे निर्मितीचा ध्यास दर्शिविते व ज्ञानाची दिशा समजून सांगते. या पंच महाभूतांच्या एवढा प्रचंड संस्कारक्षम गोष्टी असताना देखील गेल्या काही वर्षांमध्ये आपल्या निसर्गाप्रतीच्या भावनांमध्ये आपल्या समाजात बदल झालेला दिसून येतो. हा बदल हा जवळपास १५० वर्षे पारतंत्र्यात घालविल्यानंतर घडलेला आहे. पाश्चात्य विचारसरणीचा निर्माण झालेला प्रचंड पगडा हा भारतीयांना त्यांच्या इतिहासापासून दूर घेऊन गेल्याने अनेक संस्कार हे लोप पावले आहेत परिणामी निसर्गावरील त्याचा ताण जास्त दिसून येत आहे.

ब्रिटीश मंडळींनी भारतास ताब्यात घेण्यास अगदी १७ शतकापासूनच सुरुवात केली होती आणि यासाठी त्यांनी अत्यंत महत्वाच हत्यार वापरले ते म्हणजे भारताचा त्याच्या अत्यंत समृद्ध व वैज्ञानिक दृष्टीकोनाने भरलेला इतिहासच आपल्या समाजातील पुढील पिढीपासून तोडला. याचा परिणाम म्हणजे आपल्या संपूर्ण समाजाला जल–जंगल–जमीन–जानवर आणि जन यातील परस्परातील संबंध, अवलंबित्व याचे पूर्णपणे विस्मरण होऊन आपण केवळ विकास म्हणजे औद्योगिक वाढ, यंत्रवत जीवनाची वाढ, शहरीकरण यासारख्या बाबी म्हणजे विकास असा समज करून देण्यात आला.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापन सन १९२५ मध्ये झाली होती व त्यावेळी स्वातंत्र्याशिवाय दुसरा कोणताही मोठा विषय हा देशापुढे नव्हता. परंतु अगदी त्या वेळेपासून पूजनीय डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी समाजामध्ये काय स्वरूपाच्या सुधारणा केल्या पाहिजेत व कशाप्रकारे याचे दीर्घ चिंतन केले होते. यातूनच संघाची आणि त्याच्या एक तासाच्या शाखेची निर्मिती झाली. संपूर्ण भारतात देशाचा विचार प्रथम करतील अशा व्यक्ती निर्माणाचे कार्य करण्याचे निश्चित केले व याच व्यक्ती देशापुढे येणाऱ्या कोणात्याही समस्येला यथार्थपणे तोंड देऊ शकेल असा सक्षम, वैचारिक, दृढ, बलदंड समाज तसेच संस्था, संगठना व्यक्ती निर्माण करतील असे चिंतले होते.

स्वातंत्र्यापुर्वीची भारताची स्थिती व स्वातंत्र्यानंतरची स्थिती यात सुरवातीला जरी काही फरक फारसा दिसत नव्हता तरी सन १९६० नंतर मात्र यात अमुलाग्र बदल होत गेला. सुरुवातीच्या काळामध्ये आपल्या कृषीच उत्पन्न हे फारच मर्यादित होते. नापिकीचे प्रमाणही फार होते. औद्योगिक क्षेत्रेही हळू हळू वाढत चाललेली होती. सन १९७० नंतर जागतिक स्तरावर प्रचंड प्रमाणात औद्योगिक प्रगती पहावयास मिळते आणि त्याचबरोबर पर्यावरणाच्या समस्याही वाढीस लागल्या होत्या. याचाच अभ्यास करून शाश्वत विकास कसा साधता येईल याकरिता जागतिक स्तरावर ब्रटलॅन्ड कमिशन स्थापण्यात आले. परंतु असे अनेक प्रयत्न करून देखील २०२५ पर्यंत येता येता पर्यावारणाच्या संदर्भातील अनेक समस्या ह्या मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आहेत. याचे कारण आपल्या समाजाची पर्यावरणाबाबत बदलत गेलेली मानसिकता, विकासाच्या कल्पनेचा मुळ गाभाच समजून घेऊ शकली नाही. अर्थात पुढील पिढीसाठी शाश्वत विकास साधायचा असेल तर समाजाने किंवा त्यातील विविध घटकांनी यामध्ये मोठ्या प्रमाणात पुढे येऊन कार्य केले पाहिजे हे वारंवार जाणवत होते. या काळामध्ये प्रमाणात पर्यावरणास घातक

असलेल्या घटकांचा अमर्याद पद्धतीने वापर होत आहे व त्याची निर्मिती होऊ लागली; प्रचंड प्रमाणात वाढलेली वाहने, सूजत चाललेली शहरे आणि वाहतूक समस्या; वाढत्या विकासाबरोबर जंगलाचे घटत चाललेले प्रमाण व नैसर्गिक परीसंस्थावर वाढत चालले आघात, प्रदूषणात वेगाने होत असलेली वाढ, पाण्याचा अमर्याद पद्धतीने होत असलेला वापर; पाश्च्यात्य जीवन शैलीचा अविचारी पद्धतीने केलेला अंगीकार यामुळे मोठ्या प्रमाणात दैनदिन स्वरूपात निर्माण होत प्रचंड प्रमाणातील कचरा या सारख्या असंख्य समस्या ह्या पर्यावरणाच्या बाबतीत दिसून येत आहे. कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावायची पद्धत नसल्याने त्याचे प्रमाण सर्वच गावे व शहरांमध्ये वाढत आहे आणि काही ठिकाणी तर त्याचे अगदी डोंगर तयार झालेले आहेत. वास्तविक पाहता यातील सर्वच घटकांना ज्याप्रमाणे औद्यागिक कंपन्या जबाबदार आहेत त्याच प्रमाणात देशातील प्रत्येक व्यक्ती या समस्या वाढविण्यास हातभार लावत आहे. भारताच्या विकासाच्या पायवाटेवर चालताना अशा अनेक समस्या समोर येत आहे ज्या दुरुस्त करण्यासाठी सर्वच भारतीयाचा मन:पूर्वक सहभाग असणे आवश्यक आहे. या करिता या विषयांच्या मूळ प्रश्नांबाबत संपूर्ण समाजाचे मानस परिवर्तन होणे अत्यंत गरजेचे आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी पुर्तीनिमित्त सामाजिक परिवर्तनाचे मोठे कार्य समाजातील सज्जन् शक्तीच्या आधारेच निर्माण व्हावे असे संघास मनोमन वाटते. या वैचारीक दृष्टीने पंच परिवर्तनाचे सूत्र संघाने समोर ठेवून विविध सामाजिक संस्था – संगठना, सज्जन शक्ती, समाजातील प्रबुद्ध जन या सारख्या असंख्य मंडळीना समवेत घेऊन प्रत्यक्ष समाजामध्ये परिवर्तनाचे कार्य करण्याचे निश्चित केले आहे. या करिता सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण, स्व–बोध आणि नागरी शिष्टाचार असे पाच विषय निश्चित केले आहे. यालाच पंच परिवर्तन असे संबोधले आहे. पुढील येणाऱ्या काळामध्ये भारताची प्रगती हो निश्चितपणे होणार आहे परंतु हे होताना आपल्या समाजाचे अध:पतन न होता आपल्या हिंदु विचार दृष्टीतून समग्रपणे सर्व समाजाला बरोबर घेऊन राष्ट्रीयत्वाची भूमिका निर्माण करण्याकरिता या सर्वच बाबी ह्या अत्यंत आवश्यक असल्याचे दिसून येते. म्हणूनच या सर्वच विषयातील वाढत चाललेली दाहकता, त्यातून पुढील काळात निर्माण होणारी संकटे याची जाणीव करून देऊन यातील जातीभेद नष्ट करून समरस, चिंतनशील, राष्ट्रीय भावनेशी तादात्म्य अशा कृतीशील समाजाची निर्मिती करणे हे पंच परिवर्तनाचे मुळ उद्दिष्ट आहे.

पर्यावरणाच्या बाबतीत विचार करताना कोणतेही कार्य करताना सर्व समाजाला बरोबर घेऊन जाताना ते कार्य सर्व–व्यापी, सर्व–स्पर्शी, सर्व–ग्राही, सर्व–मान्य असले पाहिजे तसेच ती अविरोधी अशी भूमिका असली पाहिजे. या भूमिकेतून विचार करताना अत्यंत सोपे वाटणारे पण अत्यंत व्यापक परिणाम करणारे जल, वृक्ष आणि कचरा व्यवस्थापन असे तीन विषय पर्यावरण गतीविधीने निश्चित्त केले आहेत. या तीनही विषयाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्याकरिता या संबंधातील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

आपण पाण्याचा वापर करताना किती विचार करतो? त्याच्या सुयोग्य वापराबाबत काळजी घेण्याची मानसिकता अभावानेच दिसून येते. ज्याठिकाणी सतत पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे किंवा पाणी अत्यंत कमी स्वरूपात उपलब्ध आहे त्याठिकाणी मंडळींना याची जाणीव काही प्रमाणात का होईना आहे परंतु अन्य ठिकाणी मात्र याबाबत खूपच उदासीनता आहे. पाण्याच्या वापराबद्दलची काटकसर करण्याची मानसिकता विकसित करण्याची तीव्र आवश्यकता आहे. आपण आपल्या घरातील जरी विचार केला तरी आपण सकाळी उठल्यापासून ते झोपण्यापर्यंत कितीतरी पाणी वाया घालवत असतो. यामध्ये तोंड धुताना नळ चालु ठेवणे; आंघोळीसाठी दोन–तीन बदली पाणी घेणे किंवा शॉवर खाली आंघोळ करणे; घरातील कोणाला पाणी देताना पूर्ण ग्लास पाणी भरून देणे व त्यातील उरलेले अर्धे पाणी फेकून देणे; घरात भरलेले शिळे पाणी दररोज संपूर्णपणे फेकून देणे व पुन्हा नव्याने भरणे; घरातील वातानुकुलीत यंत्रणेचे किंवा RO पाणी वापरताना वाया गेलेले पाणी फेकून देणे; गाडी धुताना बादलीत पाणी न घेता थेट नळालाच नळी लावून पाणी वापरणे, आपल्या घर भोवतालचे रस्ते धुवून काढणे अशा नाना प्रकारे आपण पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात करीत असतो. वास्तविक यातील प्रत्येक कृतीमध्ये आपण जल संरक्षण करू शकतो जेणे करून पाणी भरण्यासाठीची विजेची बचत होते व पाण्याचे पुर्नवापर हे सहज शक्य होऊ शकते. परंतु लोकांमध्ये पाण्याची किंमत आजही लक्षात येत नाहीये. पाण्याच्या पुनर्वापरातून अनेक सोसायाटीचे पाण्याचे वीजबिल कमी झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या घरातील नळांना - Aerator जरी बसविले (यामुळे पाणी तुषार स्वरूपात बाहेत पडते) तरी ३० टक्के पाण्याची बचत होते. पाण्याचा पुनर्वापर हा केवळ औद्योगिक क्षेत्रातच पहावयास मिळत आहे. म्हणूनच पाण्याबाबत आपल्या समाजाची जल आणि त्याचा योग्य वापर या बाबतची मानसिकता बदलाची गरज मोठ्या प्रमाणात आहे.

याच प्रमाणे वृक्षांबाबतही विचार केला आहे. आजमितीस भारतामध्ये प्रत्येक व्यक्तीमागे ४२२ वृक्षांची आवश्यकता असताना

परंतु प्रत्यक्षात हि संख्या साधारण २८ एवढीच अशी आहे. परंतु केवळ वृक्ष लावून प्रदूषणाची समस्या दूर होणार नाही. वृक्षारोपण करून ते वृक्ष जगण्याचे प्रमाण फार कमी आहे. आजमितीस लक्षात येत आहे कि साधारण ३ वर्षांच्या कालावधीमध्ये ७० ते ८० टक्के वृक्षारोपण हे जगतच नाही. ते जगविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कष्ट घ्यावे लागणार आहेत हे सातत्याने लक्षात येत आहे. आजमितीस शहरातील किंवा अगदी ग्रामीण भागामधील अनेक घरांमध्ये किंवा त्यांच्या भोवतालच्या भागामध्ये एकही झाड आढळून येत नाही. याचे कारण आपले वृक्षांपासून दुरावलेले नाते होय. झाडांमुळे किती त्रास होतो हे सांगणारी मंडळी प्रचंड आहेत. परंतु याच झाडांमुळे आपल्याला पाणी मिळते, प्रदूषण कमी होते, वातावरण स्वच्छ राहते, तापमान कमी राहते अशा अनेक बाबी सहजगत्या विसरून जातात. म्हणूनच मानस परीवर्तनाकरिता प्रत्येक घरामध्ये काही प्रमाणात का होईना झाडे लावली गेली पाहिजे. वास्तविक पाहता आपल्या घरात किमान तुळशीचे तरी रोप असायचे. सद्य स्थितीत हे हि अत्यंत कमी झाल्याचे दिसत आहे. आपल्याला आपल्या घराच्या खिडकीमध्ये, मोकळ्या जागेत, गच्चीवर छोटी का होईना बाग तयार करता येऊ शकते. याचा उद्देश हा केवळ बाग करणे असा नसून आपल्या घरातील वाया जाणारे पाणी असेल किंवा ओला कचरा असेल याचा पूर्ण वापर हा या ठिकाणी करता येऊ शकतो. तसेच या प्रकारे काही प्रमाणात का होईना फळे किंवा भाज्या आपल्याला घरातल्या घरात उपलबद्ध होऊ शकतात. यासारख्या प्रयोगातूनच 'बीजारोपण से वृक्षारोपण तक' या प्रकारचे उपक्रम हे सहज सध्या करता येऊ शकतात. यातील मुळ मानस परिवर्तन हे झाडे सांभाळण्याची मानसिकता निर्माण करण्यामध्ये आहे. केवळ वृक्षांची संख्या वाढली तरी निसर्ग कोपाच्या अनेक गोष्टी ह्या कमी होऊ शकतात असे अनेक तज्ञांचे मत आहे.

गतीविधीच्या उपक्रमातील तिसरा उपक्रम म्हणजे कचरा व्यवस्थापन. आपल्या सर्वांनाच कल्पना आहे कि आपल्या घरातही दोन प्रकारचा कचरा निर्माण होतो ओला व सुका. पुण्यासारख्या शहरांमध्ये काय किंवा अगदी छोट्या ग्राम पंचायती मध्ये देखील या कचऱ्याचे व्यवस्थापन हि मोठी डोकेदुखी झालेली आहे. खरे पाहता आपण आपल्या घरातील ओल्या कचऱ्याचा पुनर्वापर सहजगत्या करू शकतो तसेच प्लास्टिक सारख्या वस्तूंचे पुनर्निर्मानाकरिता संकलन करू शकतो परंतु त्यावर कधी विचारच केला जात नाही. या उलट आपण सातत्याने प्लास्टिक पिशवीचा अतोनात वापर करीत आहोत. आपल्या पैकी अनेक जणांना ठावूक असेल कि निसर्गामध्ये प्लास्टिक हे सहजगत्या विघटीत होत नाही. ते साधारणपणे १००–२०० वर्षे तसेच पडून राहते. पाण्यामध्ये साचलेल्या प्लास्टिकचे अत्यंत सुक्ष्म कण हे सुटे होत राहतात व हेच सुक्ष्मकण (Microplastic) हे नदीच्या पाण्यावरील पिकांच्या माध्यमातून किंवा माशांच्या पोटातून आपल्या पर्यंत पोहचत आहे व कर्करोगासारख्या महाभयंकर रोगाला निमंत्रण देत आहे. आपल्या सणासुदीला किंवा दररोजच्या वापरातही सातत्याने प्लास्टिकची पिशवी हि सहजगत्या घरात येत राहते. कधी फुले आणताना तर कधी फळे आणताना. आपण आपली पारंपारिक कापडी पिशवीचा वापर बंद केल्यामुळे प्लास्टिकचे प्रमाण व्यापक प्रमाणात वाढला आहे. परंतु प्लास्टिकच्या वापरापेक्षाही अतिभयंकर आपदा म्हणजे ह्या वापरलेल्या प्लास्टिकचे पुनर्वापर किंवा पुनरुत्पादानामध्ये वापरण्या ऐवजी ते इतस्ततः सर्वत्र फेकून दिले जात आहे. आपल्याला वाढत्या लोकसंख्ये बरोबर आपणा निर्माण करणाऱ्या कचर्याचे योग्य ते व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठीच अनेक प्रकारचे प्रयोग हे घराघरात, सोसायट्यांमध्ये तसेच व्यावसयिक ठिकाणीसुद्धा होणे आवश्यक आहे.

वरील तीनही मुद्याच्या बाबतीत संपूर्ण भारतात अमुलाग्र जागरण करून त्याच्या मध्ये मोठ्या प्रमाणात मानस परिवर्तन घडून आणणे हि आजच्या काळाची गरज आहे. याकरिता नारीशक्ती; सामाजिक संस्था; शैक्षणिक संस्था; धार्मिक संस्था; प्रचार व प्रसार माध्यमे; संपर्क व्यवस्था अशा सहा आयामान्द्वारे पर्यावरण गतीविधीचे कार्य हे भारतभरात सुरु झाले आहे. एकंदरीतच पर्यावरण विषयात केवळ आतरराष्ट्रीय मुद्यांचा विचार करून भारत सरकार काय करीत आहे किंवा करणार आहे या पेक्षा मी, आम्ही व स्थानिक लोक मिळून पर्यावरणाकरिता काय करू शकतो याचा विचार करणे व त्याप्रमाणे कृती करणे हे आजच्या काळात फार महत्वाचे आहे. आपल्या पुढच्या पिढीला पर्यावरणाचे महत्व हे अगदी लहानपणापासून समजणे आवश्यक आहे तसेच त्यांच्यावर त्याप्रमाणे प्रत्येक घराघरामध्ये संस्कार होणेही गरजेचे आहे. म्हणूनच आपण सर्वांनी पर्यावरण गतीविधीमध्ये सहभागी होऊन विकसित भारताच्या वाटेवर पर्यावरणाचे संरक्षण होऊयात.

**समर्थ भारत – विकसित भारत**
**हरित भारत – समृद्ध भारत**

**डॉ राहूल मुंगीकर**
**प्राध्यापक, डी ई एस पुणे विद्यापीठ, पुणे**
**पश्चिम महाराष्ट्र प्रांत संयोजक**

◈ ◈ ◈

# ‘स्व’ चा शोध :
# आत्मजाणिवेतून समाज - राष्ट्रनिर्मिती

मानवाला प्राचीन काळापासून एक प्रश्न सतावत आला आहे – मी कोण? हा साधा वाटणारा पण अत्यंत गहन प्रश्नच प्रत्यक्षात मानवी जीवनाच्या प्रवासाचा केंद्रबिंदू आहे. या प्रश्नाचं उत्तर शोधण्यासाठीच मानवाने धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, साहित्य अशा असंख्य मार्गांचा अवलंब केला. आणि या सगळ्या प्रवासातून एक मूलभूत सत्य समोर आलं – ते म्हणजे ‘स्व’ची जाणीव.

‘स्व’ म्हणजे काय? केवळ शरीर? मन? बुद्धी? की आत्मा? विविध तत्त्ववेत्त्यांनी याबाबत आपापले दृष्टिकोन मांडलेत. पण एक गोष्ट स्पष्ट आहे – ‘स्व’चा शोध म्हणजे स्वतःला ओळखणं, आपली भूमिका आणि जबाबदारी समजून घेणं, आणि त्या आधारे जीवन जगणं.

हिंदू तत्त्वज्ञान या विचारावरच उभं आहे. स्वामी विवेकानंद म्हणतात, अध्यात्म हीच हिंदूंची खरी ओळख आहे. आणि अध्यात्म म्हणजे काय? तर स्वतःच्या अंतरात्म्याशी जोडणं, आपल्या स्वधर्माची जाणीव होणं आणि त्यातून जीवनाचा खरा अर्थ सापडणं. म्हणून बाह्य जग कितीही प्रभाव टाकू दे, पण जर आपण ‘स्व’ला ओळखलं, तर खरी शांती, सामंजस्य आणि प्रगती आपल्या हातात आहे.

‘स्व’चा उत्तम दृष्टांत आपल्याला महाभारतातील धर्मयुद्धाच्या प्रसंगातून दिसतो. कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर अर्जुन आपल्या समोर उभे असलेले बंधू, गुरू, आप्तस्वकीय पाहतो आणि त्याचं संपूर्ण धैर्य गळून जातं. त्याचं गाण्डीव हातातून निसटतं. मला युद्ध करायचं नाही असं श्रीकृष्णाला ठाम सांगतो. पण त्या निर्णायक क्षणी श्रीकृष्ण त्याला त्याच्या ‘स्वधर्मा’ची आठवण करून देतात. ते सांगतात – तू केवळ अर्जुन नाहीस, तू क्षत्रिय आहेस, आणि तुझा धर्म म्हणजे धर्मरक्षण. हे तुझं कर्तव्य आहे. हे युद्ध टाळणं म्हणजे अधर्माला शरण जाणं आहे. श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्यातील हा संवाद म्हणजे भग्वदगीतेचं मूळ बीजच आहे. अर्जुनाने जेव्हा स्वतःचा ‘स्व’ समजून घेतला, तेव्हा तो पुन्हा उभा राहिला, शंका–भीती दूर करून युद्धभूमीवर धर्मासाठी लढला. इथे ‘स्व’ची जाणीव त्याला केवळ आत्मविश्वासच नाही तर कर्तव्याची दिशा पण देते.

अर्जुनासारखंच आणखी एक तेजस्वी उदाहरण म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. स्वराज्याचं बाळकडू महाराजांना बालपणीच जिजाऊ आणि शहाजी महाराजांकडून मिळाले होते. लहानपणापासूनच त्यांना आपल्या जीवनाचं उद्दिष्ट काय आहे याची जाणीव झाली होती. ‘हिंदवी स्वराज्य व्हावं’ ही श्रींची इच्छा असं ते म्हणत. स्वराज्य स्थापनेचं स्वप्न त्यांच्या ‘स्व’मध्ये इतकं खोलवर रुजलं होतं की कोणत्याही अडचणीसमोर त्यांनी हार मानली नाही. शिवाजी महाराजांचा ‘स्व’ फक्त वैयक्तिक नव्हता, तो रयतेच्या जीवनाशी पण जोडलेला होता. शत्रू कितीही बलवान असले तरी त्यांनी धैर्य कधी खचू दिले नाही, स्वतःवरील विश्वास कायम ठेवत, मावळ्यांना प्रेरणा देत स्वराज्याची स्थापना केली.

रामायणातील हनुमानाचं उदाहरण या संदर्भात अतिशय प्रेरणादायी आहे. सीतेचा शोध घेण्यासाठी वानरांची मोठी फौज समुद्रकिनारी उभी होती. पण समोर होतं अथांग समुद्र – जणू एखादं अशक्य भासणारं आव्हान! संपूर्ण वानरसेना विचार करत होती, हा समुद्र आपण कसा पार करणार? हनुमानाकडे ते सामर्थ्य होतं, पण एका क्षणासाठी तो ते विसरला. जणू स्वतःवरचा विश्वासच हरवला. तेव्हा जांबुवंताने त्याला त्याची खरी ओळख दाखवून दिली – तू तोच हनुमान आहेस, ज्याच्या शक्तीला सीमा नाहीत. उठ! स्वतःला ओळख! तुझ्यातील अपार सामर्थ्य जागं कर! अशा प्रकारे हनुमंताला स्व चू जाणीव झाल्यावर, सुरवातीला अशक्य वाटणारे समुद्र लंघन त्याने सहज पार केले.

‘स्व’ हा केवळ व्यक्तिकेंद्रित नसतो. प्रत्येक कुटुंबाचाही एक ‘स्व’ असतो. त्या कुटुंबाची मूल्यं, परंपरा, एकोप्याची भावना, आणि आचारविचार – हे सगळं मिळून त्या कुटुंबाचा ‘स्व’ ठरतो. जर कुटुंबातील प्रत्येक सदस्याने हा ‘स्व’ ओळखला आणि त्याला जपलं, तर कुटुंब फुलतं. पण जर कुटुंबप्रमुखाला हा ‘स्व’ समजला नाही, तर मतभेद, तणाव, दुरावा यामुळे

कुटुंब विखुरलं जातं. म्हणूनच कुटुंबाच्या 'स्व'ची जाणीव ठेवणं ही कुटुंबातील प्रत्येक सदस्यांची जबाबदारी आहे, विशेषतः कुटुंब प्रमुखाची तर ती सर्वात मोठी आहे.

जसं प्रत्येक व्यक्तीचा आणि कुटुंबाचा 'स्व' असतो, तसंच राष्ट्राचाही स्वतःचा एक अद्वितीय 'स्व' असतं. तो म्हणजे त्या राष्ट्राची संस्कृती, भाषा, परंपरा, मूल्यसंस्था आणि सामूहिक आत्मा. आपण ज्या भूमीत जन्मतो, ज्या संस्कृतीत वाढतो, जी आपल्याला विचार, भाषा, वर्तन शिकवते – तीच आपली खरी ओळख ठरते. राष्ट्राचा 'स्व' समजून घेणं आणि त्याचं रक्षण करणं हे प्रत्येक नागरिकाचं आद्यकर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःचा स्व समजून घेतला की तिच्या जीवनात शांती आणि स्थैर्य येतं. अशा अनेक व्यक्ती एकत्र आल्यावर समाजात सकारात्मकता वाढते. समाज जेव्हा योग्य दिशेने चालतो आणि राष्ट्र सक्षम होतं. सक्षम राष्ट्रं एकत्र आल्यावर जगात शांती, समता आणि संतुलन येऊ शकतं. म्हणजेच, एका व्यक्तीचा 'स्व' समजणं ही प्रक्रिया अखेर विश्वपरिवर्तनाची पहिली पायरी ठरते.

स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, नेताजी सुभाषचंद्र बोस यांसारख्या क्रांतिकारकांनी आपला वैयक्तिक 'स्व' राष्ट्राच्या 'स्व'शी एकरूप केला. त्यांच्या बलिदानातूनच आपल्याला स्वातंत्र्य लाभलं. तेव्हा आपल्यावरही हे ऋण आहे की आपण हा राष्ट्रीय 'स्व' समजून घ्यावा आणि तो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवावा.

'स्व'चा शोध घेताना 'शत्रुबोध' हाही तितकाच महत्त्वाचा आहे. बाह्य शत्रूपेक्षा धोकादायक शत्रू हा आपल्या आतल्या मनात दडलेला असतो – अहंकार, मत्सर, लोभ, राग, आळस, मोह. हे अदृश्य शत्रू आपल्या 'स्व'वर पडदा टाकतात. जोपर्यंत आपण हे आंतरिक शत्रू ओळखत नाही, तोपर्यंत खरी आत्मजाणीव होऊ शकत नाही. शिवाजी महाराजांनी आपल्या कृतीतून दाखवून दिलं की बाह्य शत्रूंना हरवण्यासाठी मनातील भीती, संभ्रम आणि कमकुवतपणा यांवर विजय मिळवणं अत्यंत आवश्यक आहे. शत्रुबोधामुळे मन शुद्ध होतं, विचार स्थिर होतात आणि मग 'स्व'चा शोध अधिक सुलभ होतो. म्हणूनच शत्रुबोध ही आत्मजागरूकतेची अत्यावश्यक प्रक्रिया आहे.

अनेकांना वाटतं की 'स्व' हा फक्त तात्त्विक विषय आहे. पण प्रत्यक्षात तो आपल्या रोजच्या जीवनातही अत्यंत उपयुक्त ठरतो. 'स्व' बोध झाल्यावर आपल्याला काय हवंय, आपली मूल्यं काय आहेत, हे स्पष्ट होतं. त्यामुळे बाहेरच्या दबावाला बळी न पडता ठाम निर्णय घेता येतो. जेव्हा आपली किंमत बाह्य यश–अपयशावर अवलंबून राहत नाही, तेव्हा रोजच्या जगण्यातले तणाव कमी होतात. स्व बोध होणे म्हणजे एका अर्थी स्वतःला स्वीकारण्यासारखं आहे. स्वतःला स्वीकारणारा माणूस इतरांनाही स्वीकारतो आणि पर्यायाने नातेसंबंध देखील अधिक निरोगी होतात. तुलना आणि हीनभावना कमी होते आणि त्यामुळे आत्मविश्वास वाढतो, आपण आपल्या जीवन प्रवासावर लक्ष जास्त केंद्रित करू शकतो. समाजाने लादलेल्या खोट्या अपेक्षांपासून मुक्ती मिळते आणि खरी स्वातंत्र्याची जाणीव होते. थोडक्यात, 'स्व' म्हणजे आपलं खरं अस्तित्व ओळखणं आणि त्यावर आधारित जीवन जगणं. हे केवळ वैयक्तिक समाधानाचं साधन नाही, तर समाज व राष्ट्रनिर्मितीचा पाया आहे.

'स्व'चा शोध हा केवळ तात्त्विक किंवा आध्यात्मिक प्रवास नाही. तो प्रत्यक्षात जीवनदृष्टी घडवतो. जो माणूस स्वतःला ओळखतो, आपल्या अंतरात्म्याशी संवाद साधतो, तोच खऱ्या अर्थानं समाज आणि राष्ट्राच्या कल्याणासाठी योगदान देऊ शकतो. अर्जुनाने गीतेतून घेतलेला धडा, शिवाजी महाराजांनी प्रकट केलेला स्वराज्याचा 'स्व', क्रांतिकारकांनी केलेलं बलिदान – हे सारे आपल्याला एकच शिकवतात : स्वतःला ओळखा, आंतरिक शत्रूंचा पराभव करा, आणि आपल्या जीवनाला व्यापक समाजहिताशी जोडा. 'स्व'ची ही जाणीव केवळ वैयक्तिक मुक्ती नाही तर समाज, राष्ट्र आणि अखेरीस विश्वाच्या उत्कर्षाचा पाया आहे.

**प्रदीप बिलूरकर**

◈ ◈ ◈

**दिवा मातीचा आहे की सोन्याचा**
**हे महत्त्वाचं नसून**
**तो अंधारात प्रकाश किती देतो**
**हे महत्त्वाचं आहे.**

# नागरी शिष्टाचार

सध्या आपण रोज टेलिव्हिजनवर एक जाहिरात बघतो. एक सिग्नल तोडलेला नागरिक स्वतःहून पोलिसाकडे जातो आणि मी सिग्नल तोडला आहे, असं कबूल करून जो काही योग्य दंड आहे तो माझ्याकडून घ्या असे आवाहन करतो. तो हवालदार पोलिस त्याला विचारतो, तुला कोणी पाहिले का? की अजून कोणी पाहिले? तर तो म्हणतो नाही कुठल्याही पोलिसांनी पाहिलं नाही ना कोणी अडवले. पोलिस म्हणतो मग कशाला भरतो दंड, जा की तसाच निघून. तो म्हणतो माझ्या मुलानी पाहिले, मग तो म्हणतो, 'ते जो तो बघेल तेच तो शिकेल.'

आपण सारे हा देश माझा आहे, ही माती माझी आहे या भारतमातेचे सुपुत्र या नात्याने, विचाराने वावरत असतो. पण त्याच वेळेला सार्वजनिक व्यवहार, वर्तन याचा प्रश्न असतो. त्यावेळेला ही भावना कुठे जाते? या भारतात असंच चालतं ही भावना प्रबळ का होते याची उत्तर आपल्याला आता काढावी लागतील आणि आचरण बदलायला लागेल.

देशभक्ती आपल्या दैनंदिन वर्तनाचा भाग असायला हवी. ती रोजच्या आपल्या वर्तनातून वागण्यातून ही दिसली गेली पाहिजे. म्हणूनच या ठिकाणी एक विषय येतो 'नागरी शिष्टाचार' सार्वजननिक ठिकाणी करत असलेलं वर्तन याला आपण नागरी शिष्टाचार समजतो.

आपण कशाप्रकारे नागरी शिष्टाचार या माध्यमातून देशभक्ती दाखवू शकतो, त्या संदर्भात काही मुद्द्यांची आपण माहिती घेऊ या. आपल्या सगळ्यांना माहिती असलेले पोलीस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांनी सुद्धा काही प्रश्न स्वतःला विचारायला लावलेत. त्यातील काही प्रश्न इथे देत आहे.

१. माध्यामध्ये सकारात्मक बदल व्हावेत असे प्रयत्न मी करतो का?
२. सामाजिक संकेत आणि शिस्तीचे पालन करतो का?
३. पेहराव व प्रसंग याची वागणूक कशी असते?
४. व्हॉट्सॲप, ट्विटर, फेसबुक या ठिकाणी माझी भाषा आणि प्रतिसाद कसा असतो?
५. परिस्थिती हाताबाहेर गेली की मी तक्रारींचा पाढा वाचतो का?
६. जबाबदारीने वागतो का?

ह्या प्रश्नांची उत्तरे जर का आपल्या देशाला समजाला अपेक्षित असल्याप्रमाणे असतील तर आपण या देशाचे चांगले नागरिक आहोत असे म्हणू शकतो.

याशिवाय खालील मुद्द्यांचाही आपण या निमित्ताने विचार करू...

**१. अनुशासन :**

समाजातील नैतिक नियमांचे पालन मी माझ्या वर्तनातून करतो का? उदाहरणार्थ मंदिर, गुरुद्वारा जाताना योग्य तो पेहराव, पादत्राणे बाहेर काढणे, योग्य ठिकाणी ठेवणे सन्मान जनक आदरपूर्वक माझं वागणं असणे, वेळ पाळणे हा सामाजिक नियम म्हणून मी पाळतो का? ज्या वेळेला ज्या ठिकाणी मी अपेक्षित आहे त्या वेळेत मी जर का तिथे पोहोचत असेल तर हा खरंच एक चांगला संकेत आहे.

**२. सामाजिक संदर्भात**

आपल्या भारतीयांचा सामाजिक देशासंदर्भातल्या संवेदना या सार्वजनिक ठिकाणी खूप कमी मूल्याच्या ठरतात. याच भारतदेशाचा नागरिक ज्या वेळेला भारताबाहेर इतर देशात जातो तेव्हा मात्र तेथील अनुशासन पाळताना दिसतो. तोच व्यक्ती ज्यावेळेला भारतात येतो तेव्हा भारतातला नागरिक म्हणून त्यावेळेला हेच जे काही सामाजिक, सार्वजनिक अनुशासन आहे ते मात्र दुर्लक्ष करताना दिसतो. यातील काही उदाहरण ही नेहमी आपल्यासमोर घडत असतात. याचं कारण काय असा जर का विचार केला तर आपल्या लक्षात येईल की आपल्या नागरी कर्तव्याप्रती आणि त्या बाबतीत असलेलं वर्तन ह्याच्यामध्ये आपल्या मनात त्याबद्दल उदासीनता दिसते. म्हणून आपण

बऱ्याच वेळेला भारतात असंच चालायचं या वृत्तीने वागताना दिसतो. हे जर का कमी करायचं असेल, बदलायचं असेल तर स्वतःपासून सुरुवात करावी लागेल. मग त्यातील काही गोष्टींचं आपण रोजच्या आपल्या आयुष्यामध्ये, व्यवहारामध्ये जर का पालन केलं तर खऱ्या अर्थाने बदल घडताना दिसेल. उदा. ज्या वेळेला मी रस्त्यावर माझे वाहन चालवत असतो रस्त्यावर वाहतुकीसंदर्भात नियम कसे पाळतो? ज्या वेळेला सिग्नलला उभा राहतो, त्यावेळेला मी कुठे उभा राहतो, पादचाऱ्यांच्या मार्गावर का जिथे थांबा रेषा आहे त्याच्या अलीकडे उभा राहतो? लाल दिवा असताना सुद्धा तसंच चौकातून पुढे जातो का? का त्याचे पालन करतो? दुचाकी वर जाताना तिघेजण जातो? परवाना नसताना गाडी चालवतो किंवा चालवायला देतो? असे काही घडते का याबद्दल आपण विचार करायला हवा. या देशांमध्ये रस्ते अपघातात जे काही अपघात होतात त्यात सगळ्यात जास्त प्रामुख्याने अपघात या शिस्तीचे पालन न केल्यामुळे जास्त घडताना दिसतात. एका अर्थाने आपली जी लोकशक्ती किंवा युवाशक्ती आहे त्याच्यामध्ये आपल्याला मोठा तोटा होताना दिसतो.

सार्वजनिक ठिकाणी एक जबाबदार नागरिक या नात्याने कचरा कचराकुंडीत टाकतो. रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी थुंकत नाही, स्वच्छता ठेवतो. ज्या वेळेला रांगेत उभारण्याची वेळ येते त्यावेळेला मी योग्य ते अंतर राखतो, बसमध्ये किंवा रेल्वेमध्ये बसताना ज्येष्ठ नागरिक किंवा गरोदर महिला यांना बसायला प्राधान्य किंवा जागा देतो का? असे सुद्धा काही नागरिक शिष्टाचाराचे महत्त्वाचे भाग आहेत.

### ३. सामाजिक व्यवहार :

जिथे राहतो तेथील ग्रामपंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका तिथले स्थानिक विविध कर, पाणीपट्टी हे वेळेवर भरतो का? आता आपण पाहतो की बऱ्याच सरकारी योजना सुद्धा यातील पाणीपट्टी, घरपट्टी भरण्याच्या टक्केवारीवर योजनांची मंजुरी ही अवलंबून असते. त्यामुळे इथे सुद्धा आपला व्यवहार कसा आहे, योग्य ते कर योग्य त्या वेळेत भरणे हे सुद्धा चांगल्या नागरिक कर्तव्याचं लक्षण आहे.

### ४. निवडणूक प्रक्रिया :

भारताची लोकशाही हे जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून नावारुपाला आलेली आहे. या लोकशाहीच्या उत्सवात, मतदानामध्ये मतदार म्हणून जागरूकतेने भाग घेतो का? मतदान करताना मी माझ्या देशाचा, स्थानिक ठिकाणाच्या विकासाचा योग्य तो विचार करून मतदान करतो का? मतदानाच्या दिवशी सुट्टी आहे म्हणून मतदान टाळून अन्य ठिकाणी, वेगळं काहीतरी करायला, फिरायला मी जातो का? असे सुद्धा महत्त्वाचे आहे. या लोकशाहीच्या उत्सवात, मतदानात माझ्याबरोबर माझं कुटुंब, शेजारी, नातेवाईक यांना मतदानासाठी प्रोत्साहन करणे आणि हे प्रोत्साहन करताना समाजाचा विचार आधी करायचा का? आधी देशाचा विचार करायचा. यासाठी सुद्धा आपल्या बरोबर सर्वांना प्रवृत्त करणे हा सुद्धा महत्त्वाचा भाग आहे. मतदान करताना मी काही अमिषाला बळी पडत नाही ना? का प्रामाणिकपणे देशाच्या या सगळ्या लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये अधिकाधिक चांगल्या प्रकारे भाग घेणे हे महत्त्वाचे ठरते.

आपण फळे किंवा भाजीपाला खरेदी करताना निवडून चांगले घेतो, मग उमेदवार निवडताना देशाचा, भवितव्याचा विचार करून मतदान करणे ही प्रवृत्ती वाढविणे गरजेचे आहे.

### ५. देशभक्ती दिन की रोज देशभक्ती :

आपल्या देशामध्ये प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. आपण त्या दिनाच्या दिवशी सुद्धा त्या असलेल्या आपल्या ठिकाणच्या कार्यक्रमात उत्साहाने सहभागी होणं हे सुद्धा आवश्यक आहे. हा फक्त प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन या दिवसापुरता देशभक्तीचा विचार प्रदर्शित करणे, दाखवणे असे नाही तर आपल्या दैनिक जीवनाच्या व्यवहारांमध्ये, वर्तनामध्ये आपल्या देशासंदर्भातली कर्तव्य आपण तेवढ्याच निष्ठेने, आपल्या आई-वडिलांच्या किंवा कुटुंबाप्रती असलेल्या कर्तव्याप्रमाणे पूर्ण करणे हे सुद्धा एक मोठं कर्तव्य आहे.

### ६. सार्वजनिक मालमत्ता – आंदोलने किंवा मोर्चे संदर्भात

अनेक सामाजिक आंदोलन या देशभरात चालत असतात. या सामाजिक आंदोलनामध्ये, कुठल्यातरी निषेध मोर्चामध्ये आपण भाग घेताना सुद्धा सार्वजनिक ठिकाणची मालमत्ता किंवा सार्वजनिक व्यवस्था या संदर्भातलं आपलं वर्तन कसं आहे? आपल्या प्रवासात सुद्धा किंवा अनेक ठिकाणी सार्वजनिक आंदोलनात वावरताना, भाग घेताना आपण सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करत नाही ना? या संदर्भात आपण काही दिवसांपूर्वी एक लेख वाचला असेल किंवा एखादी बातमी सुद्धा आपल्या

समोर आली असेल. भारतीय रेल्वेचं स्वच्छता राखण्याचं जो वर्षभराचा खर्च आहे हा जवळजवळ १२०० कोटी रुपये इतपत हा खर्च आहे. हा खर्च स्वच्छतेतला सगळ्यात मोठा खर्च हा सार्वजनिक मालमत्तेच्या ठिकाणी नुकसान करणे त्याच्यावर थुंकणे या संदर्भात करावा लागतो. म्हणजे यावर विचार करू शकतो की आपल्या फक्त छोट्याश्या चुकीमुळे, वर्तनामुळे आपण किती मोठ्या प्रकारे आपणच भरत असलेला कर वाया घालवताना दिसत आहोत.

या संदर्भात जपानमधल्या एका नागरिकाची गोष्ट वाचण्यात आली होती. कुठल्यातरी सोशल मिडीयावर आली होती. आपला एक भारतीय नागरिक आणि जपानचा नागरिक जपानमध्ये रेल्वे प्रवास करत असतात. हा जपानी नागरिक रेल्वे मधल्या त्या प्रवास तो ज्या सीटावर बसला असतो ते सीट तो तिथे शिवताना दिसतो. भारतीय नागरिकांने विचारले की तू असं का करतो? रेल्वे करेल ना? ते शिवेल नां? असं अताना सुद्धा जपानी नागरिक म्हणतो ते शिवतील तेव्हा शिवतील पण तोपर्यंत हे शिवून ठेवलं पाहिजे हे माझं कर्तव्य आहे. अशा छोट्या छोट्या ज्या गोष्टी आहेत त्या या जर का आपण अशा प्रकारे केल्या तर आपल्या देशामधलं वातावरण बदलायला मदत होईल.

## ७. नागरी संपत्ती :

कुठल्याही देशाची संपत्ती तेथील नागरिकांचं सार्वजनिक ठिकाणी असलेलं वर्तन ही त्या देशाची सगळ्यात मोठी संपत्ती असते. एखादा देश प्रगती करतो म्हणजे काय? तर त्या देशामधील नागरिक त्यांच्या देशासंदर्भातली असलेली कर्तव्य, त्या देशांमधले असलेले संविधान, कायदा याला कशाप्रकारे सन्मानाने वागवतो यावर ठरत असते. आपल्या देश ज्या वेळेला आम्ही प्रगती करत असू त्याच वेळेला या देशातल्या नागरिकांचं देशासाठी असलेलं नागरी शिष्टाचार, कर्तव्य हे जर का वाढलं नाही तर आपला देश किती चांगल्या पातळीवर प्रगती करत राहिला तर आपल्या लक्षात येईल की कुठेतरी आपल्याला नेहमी काही ना काही तरी नुकसान किंवा या देशाच्या प्रगतीमध्ये अडथळा ठरताना दिसतील. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यात सुद्धा आपण अनेक लोक अशी पाहिलेत की ज्यांनी देशाप्रती असलेलं कर्तव्य न ओळखता, स्वतःचा स्वार्थ छोट्या अमिषा पोटी त्यांनी हिंदवी स्वराज्यासाठी, आपलं देशासाठी असलेलं कर्तव्य विसरले. त्यासाठी अनेक वेळा महाराजांना त्रास, वाईट परिणाम सोसावे लागले.

## ८. भारतीय बांधव :

आपण सारे बांधव आहोत, हे आपण प्रतिज्ञा म्हणताना म्हणतो. नागरी शिष्टाचारामध्ये किंवा नागरी कर्तव्य यामध्ये अपाण अजून एक खूप चांगलं योगदान देऊ शकतो असं वाटतं. आपल्या देशामध्ये डोळ्यांनी अंध असलेले, किडनी विकार, अन्य त्रासांनी त्रस्त असलेले असे अनेक रुग्ण आपल्या आजूबाजूला दिसतात. अशा वेळेला या देशातले नागरिक, भारतमातेचे पुत्र म्हणून सुद्धा आपण विचार करायला हरकत नसावी. माझ्या जीवनाची इतीश्री झाल्यानंतर माझ्या देहाचे काही अवयव दान स्वरुपात इथल्या गरजू रुग्णांना जर का मिळाले तर त्यामुळे या देशाच्या बांधवांसाठी काही ना काहीतरी योगदानात नक्की भाग घेऊ शकतो. आपली संस्कृती, परंपरा ही दानाचं महत्त्व सांगणारी आहे. दैनंदिन ह्याच्यात काही ना काही तरी दान द्यावं आणि ते पूर्ण करावं अशी आपली संस्कृती, परंपरा ही दानाचं महत्त्व सांगणारी आहे. दैनंदिन ह्याच्यात काही ना काही तरी दान द्यावं आणि ते पूर्ण करावं अशी आपली संस्कृती, परंपरा शिकवते. हा सुद्धा भाग, एक नागरिक कर्तव्याचा भाग म्हणून मोठा चांगला ठरू शकतो. आपल्या मराठीमध्ये एक म्हण आहे 'मरावे परी कीर्ती रूपी उरावे' आपण असं ठरवू या की 'मरावे परी अवयव दानाने उरावे.'

या लेखाचा शेवट करताना संकर्षण कराडे यांची एक कविता ऐकण्यात आली आपणही कदाचित ऐकली असेल. त्यातील शेवटच्या ओळी फारच सुंदर आहेत. खरं तर ही कविता आई आणि मुलाच्या संवादामधली आहे. पण मी असं म्हणेन की ही कविता भारतमाता आणि भारतमातेचा पुत्र यांचा संवाद आहे. हा मुलगा बाहेरून खूप नाराज होऊन घरात येतो आणि म्हणतो...


लोक आई विचित्र झालेत फार,
सतत सगळे माझ्यावर खाऊन असतात खार,
त्यांच्या या अशांत अस्वस्थ नजरा मला कळतात,
जाणवतं ग मला माझ्यावर खूप खूप जळतात,
आई त्याला विचारते काय झालं बाळा?
तुला माझा प्रश्न नाही कळाला मी तुला म्हणाले,
तुला काय झालं?
तर तू त्यांचेच त्रास सांगत बसलास,

सोडून दे ना ते रुसतात का हसतात,
कारण तुला पूर्ण करायची स्वप्न,
ही तुझ्या डोळ्यांत दिसतात,
त्यामुळे घराघरात हा आता देण्यासारखा झालाय सल्ला,
तुझ्या अपयशाची लोक स्वप्ने पाहतात,
ती सगळी खोटी कर,
दुसऱ्यांची रेघ पुसण्यापेक्षा स्वतःची मोठी कर,
आणि हे केलस ना तुझे कधीच काही अडणार नाही,
आई आजही तेच म्हणेल माझ्या बाळाचं
वाईट काही घडणार नाही,
आईच्या तोंडी देवाचा साक्षात्कार घडला,
तिने लावलेल्या दिव्याचा लख्ख प्रकाश पडला.

मला असं वाटतं या भारतमातेचे सुपुत्र म्हणून आपण याचा नक्कीच विचार करावा आणि आपल्या जीवनात नागरिक शिष्टाचार आणि कर्तव्य यांचा अंतर्भाव करावा.

**निलेश प्रभाकर क्षीरसागर, चिंचवड, पुणे**

◈ ◈ ◈




## वेळेवर पूर्ण विश्वास ठेवा!

दैवी वेळेवर पूर्ण विश्वास ठेवा. जीवनात जे काही घडतंय, ते एका अदृश्य शक्तीच्या काळजीपूर्वक बनवलेल्या नियोजनाचा भाग आहे. त्यामुळे, सर्व काही आपल्या काबूत ठेऊन घडवायचा प्रयत्न करणं म्हणजे स्वतःला फसवण्यासारखं आहे. याचा अर्थ असा नाही की तुम्ही काहीही न करता शांत बसावं; फक्त असं आहे की गोष्टींना जबरदस्तीने घडवू नका.

**आयुष्याचा प्रवाह स्वीकारा – जसं घडतंय, तसंच ते स्वीकारा**

प्रवाहाच्या विरुद्ध संघर्ष करणं थांबवा आणि सहजतेने त्या प्रवाहासोबत वहात राहा. एकदा का तुम्ही दैवी वेळेवर विश्वास ठेवलात, की मग कळेल की त्या 'वाईट' वाटणाऱ्या गोष्टीच तुम्हाला खऱ्या अर्थाने मजबूत बनवतायत.

जेव्हा तुम्ही मागे वळून पाहता तेव्हा लक्षात येईल की काही अपयशी क्षण, कटू अनुभव हेच खरे गुरु ठरले आणि याच अनुभवांनी तुमच्यात ताकद भरली त्यामुळं धीर सोडू नका, धडपड करत राहा – पण मनात ठेवा सर्व काही योग्य वेळीच घडेल.

विश्वास ठेवा या अदृश्य धाग्याने बांधलेलं सगळं नियोजन तुमच्यासाठीच आहे.



# सज्जनशक्ती संपर्क

- **विविध क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींचा रा. स्व. संघाच्या उपक्रमांमध्ये सहभाग का आवश्यक?**

अनेक शतकांच्या गुलामगिरी आणि वसाहतवादी विचारसरणीनंतर, आपला देश पुन्हा एकदा उदयास येत आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आपल्याला पाश्चात्य संस्कृती आणि जागतिक संकुचित दृष्टिकोन स्वीकारण्यास शिकवले गेले, ज्यामुळे आपण अधिक कमकुवत झालो. आपण मागील दहा वर्षांपासून हिंदू म्हणून एकत्र आल्याने, आपण सर्व क्षेत्रात प्रगती करत आहोत आणि जागतिक स्तरावर सर्वोत्तम प्रतिष्ठा उपभोगत आहोत. आपल्याला अमृत काल मध्ये आणि २०४७ पर्यंत विश्वगुरु दर्जा असलेला विकसित देश बनवण्याची आकांक्षा आहे. एकटे सरकार हे घडवू शकत नाही; योग्य दिशेने जलद आणि अचूकपणे पुढे जाण्यासाठी संपूर्ण समाजाने देखील यात सहभागी होणे आवश्यक आहे.

मोठ्या आणि लहान अशा अनेक संस्था, संघटना समाज सुधारण्यासाठी आणि देश बांधण्यासाठी काम करत आहेत. यापैकी सर्वात मोठी संघटना म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, १९२५ मध्ये स्थापना झाली आणि यावर्षी शताब्दी साजरी करत आहे. त्यांचे ध्येय भारतीयत्व च्या आदर्शांचा वापर करून भारताला पुन्हा एकदा विश्वगुरु बनवणे आहे. हे घडवून आणण्यासाठी, संघाने अनेक कार्यक्रम आणि महत्त्वाचे मुद्दे हाती घेतले आहेत. हजारो स्वयंसेवक काम करत असले तरी, नजीकच्या भविष्यात संस्कृती, भाषा आणि सामाजिक-आर्थिक स्थितीत विविध लोकसंख्या असलेल्या १४० कोटी लोकांच्या देशात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी हे पुरेसे असेल का? जर समाज, विविध स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्यकर्ते, अनेक उद्योगांमधील सेलिब्रिटी आणि इतर सहभागी झाले तर आपण हा बदल जलद आणि अचूकपणे पाहू शकू.

- **संस्था, स्वयंसेवी संघटना, व्यवसाय आणि उद्योग नेते आणि सेलिब्रिटींसह समाजाने राष्ट्रीय कार्यात कशी मदत करावी?**

संघाने पंच परिवर्तन मुद्द्यांना आपला सर्वात महत्त्वाचा कार्यभाग म्हणून स्वीकारले आहे. ते आहेत १. स्वदेशी किंवा स्वबोध २. पर्यावरण ३. सामाजिक समरसता ४. नागरी शिष्टाचार ५. कुटुंब प्रबोधन. समाजातील प्रत्येक व्यक्तीने सर्व स्तरांवर परिवर्तन घडवून आणण्यासाठी प्रत्येक मुद्द्याचे नुसते समर्थन न करता प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे, म्हणूनच प्रभावशाली व्यक्ती त्यांच्या प्रभावाच्या क्षेत्रात अत्यंत महत्त्वाच्या आहेत. लष्करातील दिग्गज, शास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, व्यवसाय आणि उद्योग प्रमुख, मीडिया व्यक्तिमत्त्वे, डॉक्टर, अभियंते, कायदेशीर व्यावसायिक, प्रमाणित सार्वजनिक लेखापाल, क्रीडा, वाहिनी आणि चित्रपट क्षेत्रातील सेलिब्रिटी, पर्यावरणवादी, शिक्षक आणि इतर क्षेत्रातील मान्यवर हे सर्व प्रभावशाली मानले जातात.

या महत्त्वाच्या पाच मुद्द्यांव्यतिरिक्त, येत्या काही महिन्यांत संपूर्ण भारतात एक लाखाहून अधिक ठिकाणी हिंदू संमेलने आणि इतर अनेक कार्यक्रम आयोजित करण्याचा संघाचा मानस आहे. समाजाला एकत्र करणे आणि राष्ट्रीय ध्येयांसाठी एकत्र येऊन कार्य करणे हे ध्येय आहे. आयडिया ऑफ भारत बद्दलच्या बनावट विमर्षांवर मात करण्यासाठी एकता आवश्यक आहे, जी डीप स्टेट जागतिक बाजारपेठेतील टोळ्या आणि देशांतर्गत शत्रूंचा वापर करून सतत तयार केली जातात.

या बिंदूवर काम करणे इतके महत्त्वाचे का आहे?

- **सामाजिक समरसता**

परदेशी आक्रमकांनी हिंदूंच्या कमकुवतपणा आणि दोषांचे सखोल संशोधन आणि विश्लेषण केले. हिंदू समाजाचे विभाजन करण्यासाठी आणि त्यांची सत्ता जास्त काळ टिकवून ठेवण्यासाठी त्यांनी विषारी युक्त्या वापरल्या. त्यांची मुख्य रणनीती म्हणजे

हिंदूंना जातीच्या आधारावर विभागणे, जे ते करण्यात यशस्वी झाले, जेणेकरून हिंदू एकमेकांचा द्वेष करू लागतील. एक महान राष्ट्र म्हणून, आपण सामाजिक, आर्थिक आणि आध्यात्मिक अधोगती मोठ्या प्रमाणात सहन केली आहे. या मानसिकतेमुळे आपण समाज म्हणून आणि राष्ट्र म्हणून अजूनही दुःख भोगत आहोत. अँगस मॅडिसनच्या पुस्तकानुसार, ब्रिटिश आक्रमणापूर्वी जीडीपीच्या बाबतीत सर्वात मोठी अर्थव्यवस्था ब्रिटिश राजवटीत उद्ध्वस्त झाली होती आणि त्यांनी भारत सोडल्यानंतर जीडीपी ३% पेक्षा कमी होता. म्हणूनच सामाजिक समरसता या विषयाला प्राधान्य देणं महत्वाचं ठरेलं.

## ● स्वबोध आणि स्वदेशी

स्वावलंबी भारत हे एकविसाव्या शतकात विकसित भारत घडवण्याचे साधन आहे. भारताचे स्वावलंबन जागतिक ख़ुशी, सहकार्य आणि शांतीवर केंद्रित आहे. 'जय जगत'वर विश्वास ठेवणारी, मानवजातीच्या कल्याणाची काळजी घेणारी, संपूर्ण जगाला एक कुटुंब मानणारी, 'माता भूमीः पुत्र अहं पृथ्वीयाह' या विचाराला आपल्या श्रद्धेत प्राधान्य देणारी, पृथ्वीला माता मानणारी, भारत भूमी जेव्हा स्वयंपूर्ण होते तेव्हा सुखी–समृद्ध जगाची शक्यता सुनिश्चित करणारी संस्कृती. भारताची प्रगती नेहमीच जागतिक प्रगतीशी जोडली गेली आहे.

रशिया आणि युक्रेनमधील अलीकडील परिस्थिती स्वयंपूर्णतेची गरज अधोरेखित करते; आयात केलेल्या इंधन आणि इतर महत्त्वाच्या वस्तूंवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणे धोकादायक आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, आपण शतकांपूर्वी भारतात मूळतः शोधलेल्या असंख्य गोष्टी आता आयात करतो. तथापि, भारतात सहजपणे विकसित करता येणारे उद्योजक आणि रोजगार चीनवर अवलंबून आहेत. आरएसएस आणि संलग्न संघटना आपल्या तरुणांना आवश्यक ज्ञान आणि कौशल्यांनी सुसज्ज करण्यासाठी सरकार आणि इतर संस्थांसोबत काम करत आहेत.

## ● पर्यावरण

भारताला निसर्गासोबत शांततेत आणि एकरूप राहण्याचा समृद्ध इतिहास आणि प्रथा आहे. आपल्या राष्ट्राच्या मूल्य व्यवस्थेत निसर्गाबद्दल तीव्र आदर आहे. ऐतिहासिकदृष्ट्या, निसर्ग आणि वन्यजीवांचे संरक्षण करणे हे सनातन धर्माचे एक मूलभूत अंग होते, जे लोकांच्या दैनंदिन जीवनात व्यक्त होते आणि वैदिक साहित्य, लोककथा, धार्मिक श्रद्धा, कला आणि संस्कृती यांनी त्याला पाठिंबा दिला होता. २००० वर्षांपूर्वी, भारतीय नीतिमत्तेने पर्यावरणशास्त्राच्या काही आवश्यक कल्पना मांडल्या, जसे की सर्व जीवनातील परस्परसंबंध, आणि त्यांचे प्रतिनिधित्व एका प्राचीन ग्रंथ, ईशावास्योपनिषदात केले. त्यात म्हटले आहेः सर्वोच्च शक्तीने हे विश्व त्याच्या सर्व सृष्टीच्या कल्याणासाठी निर्माण केले आहे. परिणामी, प्रत्येक वैयक्तिक सजीवाने इतर प्रजातींशी निकट संबंधात या प्रणालीचा भाग असण्याचे फायदे कसे मिळवायचे ते शिकले पाहिजे. कोणतीही प्रजाती इतरांच्या हक्कांचे उल्लंघन करू शकत नाही. हे शाश्वत विकासाचे एक प्रमुख तत्व आहे. बेजबाबदार उपभोगाचा अवलंब न करता आपण प्रगती, संपत्ती आणि कल्याणाच्या समान पातळी गाठू शकतो. या दृष्टिकोनातून, भारत हानिकारक पर्यावरणीय परिणाम कमी करत त्याच्या समृद्ध पारंपारिक भूतकाळ आणि आधुनिकतेमध्ये समन्वय समन्वय राखू शकतो.

जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असलेला भारत एका वळणावर आहे. एकीकडे, आर्थिक विकासाची तातडीची गरज आहे, कारण लाखो लोक त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी विकासावर अवलंबून आहेत. दुसरीकडे, प्रदूषण, हवामान बदल आणि संसाधनांचा ऱ्हास यासारख्या पर्यावरणीय समस्यांना तोंड देण्याची निकड आहे. भारतातील आणि एकूणच जगभरातील पर्यावरणीय समस्या चिंताजनक वेगाने वाढत आहेत. पर्यावरणीय समस्या गहन आणि व्यापक आहेत, ज्यामध्ये शहरी वायू प्रदूषणापासून ते व्यापक जल प्रदूषण आणि मातीची वाढती धूप यांचा समावेश आहे.

हे ही आव्हाने केवळ लाखो भारतीयांच्या आरोग्य आणि उपजीविकेलाच धोक्यात आणत नाहीत तर दीर्घकालीन विकास आणि आर्थिक वाढीलाही अडथळा आणतात. विविध सरकारे, समाज आणि नागरिकांनी पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्यासाठी अधिक निर्णायक पावले उचलली पाहिजेत.

## ● नागरी शिष्टाचार

भारताला सांस्कृतिकदृष्ट्या सर्वात समृद्ध वारसा आहे आणि भारतीय लोक स्वच्छ, निरोगी वातावरणात आणि चांगल्या शिष्टाचारात राहत होते. म्हणून, सर्वात आधी, आपण अशा समस्यांना तोंड दिले पाहिजे ज्यामुळे बहुसंख्य भारतीयांनी या गुणांना गमावले आहे. तथापि, आजचे सुशिक्षित तरुण त्यांच्या

वर्तनासाठी त्यांना जबाबदार धरले पाहिजे असे मानत नाहीत ही वस्तुस्थिती काहीशी निराशाजनक आहे. त्यांच्या वर्तनाचा त्यांच्या सभोवतालच्या लोकांवर कसा परिणाम होतो याची त्यांना पर्वा नाही. आम्ही दावा करतो की नियम तोडण्यासाठी डिझाइन केलेले आहेत आणि आम्ही ते मोडतो. तथापि, नियम बनवणाऱ्यांवर याचा काय परिणाम होतो? जे खरोखर नियमांचे पालन करण्याचा प्रयत्न करतात त्यांच्यावर याचा काय परिणाम होतो? आम्हाला माहिती आहे की आमच्या क्रियाकलापांचा या प्रभावांवर थेट परिणाम होतो, जे आम्ही दररोज पाहतो. तथापि, आम्ही स्वतःला जबाबदार धरत नाही. आम्हाला काळजी नाही आणि आम्ही ते गृहीत धरतो.

या अद्भुत राष्ट्राचे रहिवासी म्हणून, भारतीय संविधानाने स्थापित केलेल्या सर्व कायदे, नियम आणि नियमांचे पालन करणे आपले कर्तव्य आहे. आपण करत असलेली प्रत्येक कृती ही कायद्याचे उल्लंघन करणार नाही किंवा पर्यावरण, समाज किंवा राष्ट्रावर नकारात्मक परिणाम करणार नाही हे समजून घेऊन केली पाहिजे. सर्व सरकारी मालमत्ता ही माझी मालमत्ता आहे आणि मी तिचे संरक्षण आणि काळजी घेतली पाहिजे असा दृष्टिकोन असावा.

- **कुटुंब प्रबोधन**

आनंदी आणि निरोगी कुटुंबे ही शांत आणि समृद्ध समाजाचा पाया आहेत. कालांतराने, भारताने एक वेगळी कुटुंब व्यवस्था निर्माण केली. इतर देशांच्या तुलनेत, भारतीय कुटुंबांमध्ये अनुपालन आणि लवचिकता जास्त आहे. सामायिकरण आणि काळजी घेणे हे कुटुंब आरोग्य आणि स्थिरतेचे केंद्रबिंदू आहे. एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक यावर केंद्रित असलेली व्यवस्था भारतीय कुटुंबांमध्ये यशाची प्राथमिक प्रेरणा असल्याचे दिसून येते.


आज, कुटुंब व्यवस्थेत प्रचंड उलथापालथ झाली आहे. आधुनिक हिंदू कुटुंबांसमोर विविध समस्या आहेत. आधुनिक युगात कुटुंबांना एकत्र, आनंदी आणि निरोगी ठेवताना आपण या समस्या कशा हाताळू शकतो? आपल्या संस्कृतीतून आपण काय बोध घेऊ शकतो आणि आपल्या कुटुंबांना बळकट करण्यासाठी सध्याच्या परिस्थितीत सांस्कृतिक मूल्यांचा वापर कसा करू शकतो? घटस्फोट, लिव इन नातं, लव्ह जिहाद, नातेसंबंधात कठीण काळ अनुभवणाऱ्या पुरुष आणि महिलांचे दुःख कमी करण्यासाठी आपण विविध स्तरांवर हस्तक्षेप करू शकतो का? योग्य कुटुंब व्यवस्था पुनर्जिवीत केल्याशिवाय समृद्ध समाज होणं शक्य नाही म्हणून यावर कार्य करणे आवश्यक आहे.

- **निष्कर्ष**

विविध क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तिमत्व समाजात जलद गतीने सकारात्मक बदल घडवून आणू शकतात, म्हणूनच राष्ट्र प्रथम कार्यक्रमांमध्ये त्यांचा उत्स्फूर्त सहभाग महत्त्वाचा आहे आणि जलद प्रभाव घडवून आणण्यासाठी रा. स्व. संघ या प्रभावकांना सोबत घेण्याचा प्रयत्न करत आहे, समाजातील या मान्यवरांनी स्वतः पुढाकार घेऊन संघाच्या या वेगवेगळ्या कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष भाग घेतला पाहिजे.

**पंकज जगन्नाथ जयस्वाल**

◈ ◈ ◈



# संघ शताब्दीनिमित्त सरसंघचालकांची व्याख्याने

भारत विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे संघ शताब्दीनिमित्त नवी दिल्लीत त्रिदिवसीय संवाद व्याख्यानाचे आयोजन

- **पहिला दिवस २६ ऑगस्ट**

सोबत घेऊन चालण्याची ज्यांची परंपरा आहे, ते हिंदू आहेत आणि हिंदूंचा स्वाभाविक धर्म समन्वय आहे, संघर्ष नाही, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी येथे केले. भारत जेव्हा विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल झाले, असे आपल्याला मानता येईल, असे ते म्हणाले.

रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित्त समाजाच्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांसाठी '१०० वर्षांची संघयात्रा, नवे क्षितिज' या शीर्षकाखाली राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय संवाद कार्यक्रमाला डॉ. भागवत संबोधित करीत होते. व्यासपीठावर सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, उत्तरक्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते.

४० हजार वर्षांपासून भारतातील, अखंड भारतातील लोकांचा डीएनए एकच आहे, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, आपली संस्कृती आणि दृष्टी एकच आहे, ती म्हणजे समन्वयाने राहण्याची. नेता, धोरण आणि पक्ष हे सगळे सहायक असते, मुख्य कार्य तर समाज परिवर्तनाचे असते, राष्ट्राच्या उन्नतीसाठी आवश्यक असलेले गुण विकसित करण्याचे असते. संघाची स्थापना आणि संघ चालवण्याचा उद्देश भारत आहे. भारत जेव्हा विश्वगुरू बनेल, तेव्हाच संघाचे कार्य सफल झाले, असे आपल्याला मानता येईल. भारताला जगात आपले योगदान द्यायचे आणि ती वेळ आता आली आहे, असे नमूद करीत डॉ. भागवत म्हणाले की, विविधतेत एकता हीच भारताची खरी ताकद आहे. एक उदाहरण देत आपला मुद्दा स्पष्ट करताना डॉ. भागवत म्हणाले की, एका परीक्षेत चार प्रश्न आहे, त्यात दोन सोपे तर दोन कठीण आहेत. अशा वेळी आपण पहिले दोन सोपे प्रश्न सोडवायला घेऊ. त्याचप्रमाणे जे लोक स्वतःला हिंदू मानतात, त्यांचे जीवन आपल्याला आधी चांगले करायचे आहे. त्यामुळे काही कारणाने जे लोक स्वतःला हिंदू मानत नाही, ते म्हणतील, असे होऊ लागले आहे, ज्यांना आपल्या हिंदुत्वाचा विसर पडला, त्यांनाही आठवेल की असेही होईल. त्यामुळे संपूर्ण हिंदू समाजाचे संघटन आवश्यक आहे. जे स्वतःला हिंदू म्हणवतात, त्यांचे जीवन आपण चांगले केले, तर त्यापासून बाकीच्यांना प्रेरणा मिळेल. जे लोक हिंदूसमाजापासून दूर झाले, ते परत येतील. त्यामुळे हिंदू समाजाची एकजूट आवश्यक आहे. हिंदू धर्माच्या लोकांची एकजूट म्हणजे दुसऱ्या धर्माच्या लोकांचा विरोध नाही.

आपल्या ७० मिनिटांच्या भाषणात डॉ.भागवत यांनी स्वातंत्र्य आंदोलन, त्यातील संघसंस्थापक डॉ. हेडगेवार यांची भूमिका आणि संघाची स्थापना याचा सविस्तर आढावा घेतला.

- **राष्ट्राच्या प्रगतीत समाजाचा सहभाग असावा**

समाजातील दुर्गुण दूर केले नाही तर आमचे प्रयत्न अपयशी ठरतील, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, देशाला मोठे करायचे असेल, स्वतंत्र करायचे असेल तर नेत्यांवर वा संघटनेवर अवलंबून राहता येणार नाही. ते मदत जरूर करू शकतील, पण त्यासाठी सर्वांना कामाला लागावे लागेल. संपूर्ण समाजाने प्रयत्न केले तरच परिवर्तन येऊ शकते. आपल्या देशाला जुने वैभव मिळवून द्यायचे असेल, महान बनवायचे असेल तर समाजाचा गुणात्मक विकास झाला पाहिजे. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्रगतीत संपूर्ण समाजाचा सहभाग असला पाहिजे, असेही सरसंघचालक म्हणाले.

**सत्र २ रे**

- **हिंदूंचे एकीकरण हेच हंघाचे लक्ष्य पंच; परिवर्तनाचा आग्रह – सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचा त्रिदिवसीय संवाद कार्यक्रम**

संपूर्ण हिंदू समाजाला एक करण्याचे लक्ष्य आम्ही गाठत नाही, तोपर्यंत आम्हाला चालत राहायचे आहे आणि हे मैत्री,

उपेक्षा, आनंद आणि करुणा चार मार्गदर्शक सिद्धांताच्या आधारेच शक्य आहे, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी आज येथे केले. दैनंदिन जीवनात देशभक्तीचा अवलंब करत देशासाठी जगण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित्त समाजाच्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांसाठी म१०० वर्षांची संघयात्रा, नवे क्षितिजफ या शीर्षकाखाली राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय संवाद कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी डॉ. मोहनजी भागवत संबोधित करत होते. व्यासपीठावर सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे, उत्तरक्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते.

महात्मा गांधींनी ज्या सात पापांच्या शाश्वत धोक्यांचा इशारा दिला होता, त्याचा उल्लेख करत डॉ. भागवत म्हणाले की, आजच्या परिस्थितीत हा इशारा अधिक प्रासंगिक ठरू लागला आहे.

- **पंचपरिवर्तनाचा केला आग्रही पुरस्कार**

संघाच्या भविष्यातील वाटचालीची रूपरेषा विशद करताना डॉ. भागवत यांनी पंचपरिवर्तनाचा तपशीलवार आढावा घेतला. कुटुंबप्रबोधन, पर्यावरणाचे रक्षण, सामाजिक समरसता, आत्मनिर्भरता आणि संविधान तसेच कायद्याचे पालन करण्याचा आग्रह धरला. सगळ्या मानवी जिवांसाठी पाणी, मंदिर आणि स्मशान एकच असले पाहिजे. आज देशासाठी मरण्याची नाही तर २४ तास जगण्याची गरज आहे, असे हितोपदेश करत ते म्हणाले की, घरात पूजाघर चांगल्या ठिकाणी बनवले गेले पाहिजे. अडचणीच्या आणि गैरसोयीच्या ठिकाणी नाही. आम्ही राहू अथवा न राहू पण भारत देश राहिला पाहिजे, त्यानुसार सर्वांनी आपली वागणूक ठेवली पाहिजे. विश्वगुरुपदाचा अत्यंत नम्रपणे स्वीकार करत आपल्या आचरणातून त्याची प्रचीती आणून दिली पाहिजे, असे ते म्हणाले.

- **जागतिक व्यापार स्वेच्छेने व्हावा, दबावाने नाही**

आंतरराष्ट्रीय व्यापार हा स्वेच्छेने झाला पाहिजे, दबावाने नाही, असे नमूद करत डॉ. मोहनजी भागवत म्हणाले की, शेजारी देशांशी आम्ही आपले संबंध सौहार्दपूर्ण केले पाहिजे. त्यांच्याही विकासाचा विचार केला पाहिजे, कल्याणाचा आणि सुरक्षितेचा आग्रह धरला पाहिजे. भारताची शेजारी देशांशी वागणूक ही मोठ्या भावासारखी राहिली पाहिजे.

- **हिंदू हा विश्वाला शांती देणारा धर्म**

जगात पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धानंतर तिसऱ्या जण महायुद्धाची स्थिती निर्माण झाली आहे, मात्र आंतरराष्ट्रीय संस्था शांततेचा तोडगा काढू शकल्या नाहीत, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, या जागतिक समस्यांतून धर्मसंतुलन आणि भारतीय दृष्टिकोन यातूनच तोडगा निघू शकतो. सर्व उपभोगवादाच्या मागे धावत असल्यामुळे स्पर्धा होते, त्यामुळे आपसात भांडणे होतात, त्यातून जग नष्ट होण्याची भीती निर्माण होते. मात्र आमची विचारधारा ही सर्वांच्या कल्याणाची आहे, धर्म हा सार्वभौमिक आहे आणि सृष्टीच्या उत्पत्तीपासून अस्तित्वात आहे. तुम्ही विश्वास ठेवा वा ठेवू नका, पण हिंदू धर्म विश्वाला शांती देणारा धर्महोय आहे. अनियंत्रित उपभोक्तावाद आणि भौतिकवादाने आमचा संयम आणि पारंपरिक मूल्यांवर घाला घातला आहे.

**३ रा समारोप दिवस**

- **भारत हिंदू राष्ट्रच; घोषणेची गरज नाही**

**सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांचे संघ शताब्दी निमित्त त्रिदिवसीय व्याख्यानमालेचा समारोप**

व्यक्तीनिर्माण आणि चारित्र्यनिर्माण, समाजसंघटित झाला तर परिवर्तन आपोआप येईल आणि हिंदुस्थान हे हिंद राष्ट्र आहे, या तीन अढळ सिद्धांतावर संघाचे काम सुरू असून अन्य, भूमिकांत कालानुरूप बदल झाला, तरी या भूमिकांत कधीच बदल होणार नाही, असे प्रतिपादन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले. भारत हिंदूराष्ट्र घोषित करण्याचे कारण नाही, ते हिंदूराष्ट्रच आहेच असा आश्वासक निर्वाळाही त्यांनी दिला.

रा. स्व. संघाच्या शताब्दीनिमित राजधानी दिल्लीतील विज्ञान भवनात आयोजित त्रिदिवसीय व्याख्यानमालेचे तिसऱ्या आणि अंतिम सत्रात जिज्ञासूच्या विविध शंकाचे समाधान करताना डॉ. भागवत बोलत होते. व्यासपीठावर संरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उत्तर क्षेत्र संघचालक पवन जिंदल आणि दिल्ली प्रांत संघचालक डॉ. अनिल अग्रवाल उपस्थित होते. संघावर होत असलेले आरोप आणि आक्षेप यांचे मुद्देसूद निराकरण डॉ. भागवत यांनी अडीच तासांच्या आपल्या उद्बोधनात केले.

भारत हे हिंदू राष्ट्र आहेच, त्यामुळे ते घोषित करण्याचे कारण नाही. हे जो मान्य करेल त्याचा फायदा होईल आणि जो मान्य करणार नाही, त्यांचे नुकसान होईल.

संविधानसंमत आरक्षणाला संघाचा पाठिंबा आहे. तसा प्रस्तावही संघाने पारित केला आहे, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, आरक्षणाचा

वर्ष की राधे यात्रा विचार तर्कातून नाही, तर संवेदनेतून केला पाहिजे. तरच आम्ही आरक्षणाची गरज आणि महत्त्व समजू शकू, त्या लोकांनी हजार वर्षे अन्याय सहन केला आहे, त्यामुळे त्या लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण आणखी काही वर्षे थोडा त्रास सहन करायला हरकत नाही. आपल्याला आता आरक्षण नको, असे त्या समाजातील शेवटची व्यक्ती म्हणत नाही, तोपर्यंत आरक्षण कायम राहिले पाहिजे.

भारतात बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषा या राष्ट्रभाषा आहेत, असे एका प्रश्नावर स्पष्ट करीत डॉ. भागवत म्हणाले की, आपल्या देशातील सर्व भाषा या राष्ट्रभाषा असल्या तरी त्यातील एक भाषा ही व्यवहारभाषा असली पाहिजे. मातृभाषा चांगली आली पाहिजे, सोबतच आपल्या प्रांतातील भाषाही आपण शिकली पाहिजे. मात्र, भाषेच्या मुद्यावरून संघर्ष होणे योग्य नाही.

भारत हा बुद्धाचा देश असला, तरी इतर देश बुद्धाचे नाहीत. त्यामुळे भारत हा शांततेला प्राधान्य देत आला आहे. संरक्षणासाठी शस्त्रसज्ज असणे गरजेचे आहे. आरक्षणावर बोलताना मोहनजी म्हणाले की, आता आपल्याला आरक्षणाची गरज नाही, असे लाभार्थ्यांना वाटत नाही तोपर्यंत आरक्षण असण्याला हरकत नाही. आरक्षण हा खरे तर एक संवेदनशील मुद्दा आहे. तळागाळातील घटकांचा विकास व्हावा, असा दृष्टिकोन दीनदयालजी यांचा होता. त्यामुळे वरच्या घटकांनी त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करायला काहीच हरकत नाही. घटनेने जे आरक्षण दिले आहे त्याला संघाचा सदैव पाठिंबा राहिलेला आहे. कधीतरी जाती आधारित व्यवस्था समाजात होती, पण आज ती अस्तित्त्वात नाही. जाती व्यवस्थेबाबत पुराणातील दाखल्यांचा हवाला दिला जातो, पण पुराण अथवा शास्त्रांमध्ये जे लिहिले जाते त्यानुसार लोक वागतात, असे नाही.

आज धर्मपरिवर्तन आणि घुसखोरीमुळे लोकसंख्येच्या रचनेत बदल होताना दिसून येत आहे. हा गंभीर धोका असून त्यावर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. देशातील नोकऱ्या घुसखोरांना मिळता कामा नये ही केवळ सरकारची जबाबदारी नसून नागरिकांनीही सजग राहणे आवश्यक असल्याचे सांगत डॉ. मोहनजी पुढे म्हणाले की, धर्म हा आपआपल्या आवडीचा विषय आहे. आपण सर्व भारतीय आहोत. त्यामुळे हिंदू-मुस्लिम एकतेबाबतच का बोलले जाते? या देशात राहणारे सर्वजण एक आहोत. या देशात इस्लाम राहू नये, अशी शिकवण हिंदू देत नाही. अखंड भारत हे आपल्या जीवनाचे सत्य आहे आणि आपली संस्कृती आणि आपले पूर्वज एकच आहेत, हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे.

## ● काशी आणि मथुरेसाठी हिंदू समाजाचा आग्रह

संघ कोणत्याही आंदोलनात सहभागी होत नाही. याला अपवाद फक्त रामजन्मभूमी आंदोलनाचा होता, संघ पूर्ण ताकदीने त्या आंदोलनात सहभागी झाला, आणि त्यामुळेच ते आंदोलन यशस्वी झाले, याकडे लक्ष वेधत डॉ. भागवत म्हणाले की, अयोध्येनंतर काशी आणि मथुरा मंदिरांच्या मुक्तीचा हिंदू समाजाचा आग्रह आहे. काशी आणि मथुरेच्या आंदोलनात संघ सहभागी होणार नाही, पण संघाचे स्वयंसेवक सहभागी होऊ शकतात. अयोध्या, मथुरा आणि काशी यातील दोन जन्मभूमी तर एक निवासभूमी आहे.

## ● मुस्लिमांच्या नावांनाही हरकत नाही

रस्ते आणि ठिकाणांना मुस्लिमांची नावे असण्याला कुणाचीही हरकत नाही. पण, परकीय आक्रमकांची नावे नकोत. माजी राष्ट्रपती एपीजे अब्दुल कलाम, रामप्रसाद बिस्मिल यांच्या नावाला कुणाचाही विरोध असण्याचे मुळीच कारण नाही.

## ● ...तरच संस्कृती वाचेल

प्रत्येक कुटुंबात तीन अपत्य हवे आहेत. यामुळे देशाची लोकसंख्या नियंत्रणात राहील आणि संस्कृतीचे रक्षणही होईल. तसेच लोकसंख्येचा विचार करताना आपल्याला संसाधनाचाही विचार करावा लागणार आहे, असे डॉ. मोहनजी म्हणाले.

**वार्तांकन: विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री**

◈ ◈ ◈

# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित् वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) २ ते ४ सप्टेंबर मध्ये दिल्लीत झालेल्या सेमीकॉन इंडिया २५ चे उद्घाटन आपले पंतप्रधान श्री मोदीजी यांनी केले. या कार्यशाळेत जवळपास ५० देशातील तज्ञ, कारखानदार, गुंतवणूकदार असे २,५०० प्रतिनिधी उपस्थित आहेत. तसेच ३५० स्टॉल आहेत. व जागतिक स्तरावरील ५० तज्ञांनी विचार मांडले.

केंद्रीय मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी भारतात बनलेली पहिली सेमीकंडक्टर चिप आपले पंतप्रधान श्री मोदीजी यांना भेट दिली. तसेच इस्रो च्या सेमीकंडक्टर लॅब ने बनवलेला विक्रम ३२ बिट्स प्रोसेसर व चार कंपनीच्या टेस्ट चिप्स ही भेट दिल्या.

२०२१ मध्ये केंद्र सरकारने आपली सेमीकंडक्टर योजना जाहीर केली. यामध्ये प्रामुख्याने ७६,००० कोटी रुपयांची पीएल्आय योजना, तसेच आवश्यक पायाभूत सुविधा उभारणी होत्या. आणि त्यानंतर फक्त ३.५ वर्षात आपल्या कडे चिप्सचे उत्पादन ही सुरू झाले. २८ ऑगस्ट रोजी सीजी-सेमी कंपनीने गुजरात मधील कारखान्यात OSAT Pilot लाईन सुरू केली. जिथे चिप्स बनू लागतील. भारताने अनेक संधी गमावल्यावर आता मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आहे

फेअर चाईल्ड जे अमेरिकेतील सिलिकॉन व्हॅली चे जनक आहेत. त्यांनी १९६० साली भारतात सेमीकंडक्टर कारखान्याचा प्रस्ताव दिला. इंटेल ने १९६९ साली. त्यानंतर १० वर्षांनी AMD कंपनीने ३०० कोटी डॉलर गुंतवणूकीचा प्रस्ताव दिला तर कोरिया च्या इंटलेक्ट कंपनीने १६० कोटी डॉलर गुंतवणूकीचा. जवळपास ५० वर्षे भारताने या क्षेत्रातील अशा अनेक संधी घालवल्या. आणि त्यामुळे चीन, कोरिया, तैवान, मलेशिया वगैरे आपल्या खूप पुढे गेले. पण आता २०२१ पासून केंद्र सरकारने घेतलेल्या पुढाकाराने, सध्या भारतात २३ चिप्स डिझाईन कंपन्या व १० चिप्स उत्पादन कंपन्या कार्यरत झाल्या आहेत. आणि फक्त ३.५ वर्षात पहिली भारतीय चिप्स ही बनली आहे.

२) केंद्रिय मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की दिल्लीतील सेमिकॉन परिषदेत १२ करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. ज्यामुळे कॅमेरा मोड्यूल्स, मायक्रो फोन बडस्, वगैरे सारख्या गोष्टी भारतात डिझाईन करून बनवल्या जातील. तसेच १०० कोटी डॉलर ची गुंतवणूक क्लिन एनर्जी, क्वांटम्, वगैरे साठी लागणाऱ्या सेमीकंडक्टर साठी केली जाईल.

सेमीकंडक्टर मिशन १ च्या यशानंतर, केंद्र सरकार आता मिशन २ लवकरच जाहीर करत आहे. ज्यामध्ये केंद्र सरकार आवश्यक इको सिस्टीम उभी करेल. पीआय्एल जाहीर करेल. तसेच गुंतवणूकदार व कंपन्यांना पूर्ण सहकार्य करेल. ज्यामुळे भारतीय चिप्स जागतिक किंमतीपेक्षा १५% ते ३०% तरी स्वस्त मिळतील. तसेच सिलिकॉन कार्बाईड वेफर्स बनवण्यासाठी जास्त प्रोत्साहन दिले जाईल.

३) २३ऑगस्ट रोजी इकॉनोमिक टाइम्सच्या जागतिक फोरम मध्ये आपल्या पंतप्रधानांनी सांगितले की भारत या वर्षात आपल्या चिप्स चे उत्पादन सुरू करेल. आणि जगाच्या चौथ्या इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन (जी २०११ मध्ये सुरू झाली.) मध्ये सहभागी होईल.

तिसऱ्या जागतिक इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन मध्ये (जी१९५० ते ७० दरम्यान झाली) कॉम्प्युटर, टोमेशन, टेलिकम्युनिकेशन, इंटरनेट, आणि सेमीकंडक्टरचा मोठा वाटा होता. भारत तिसऱ्या व चौथ्या ही रिव्होल्यूशन मध्ये जगात खूपच मागे होता.

पण आता नवीन AI, Robotics, Quantum Computing च्या युगात, या क्षेत्राबरोबर चिप्स ही बनवून भारत जागतिक चौथ्या रिव्होल्यूशन मध्ये सहभागी होईल.

४) डीआरडीओ ने २६ ऑगस्ट रोजी हाय-पॉवर लेझर-बेस्ड इंटिग्रेटेड एअर डिफेन्स सिस्टीम ची यशस्वी चाचणी घेतली. या एकत्रित सिस्टीम मध्ये रडार ने शत्रूचे विमान, ड्रोन शोधल्यावर QRSAM[2] हे ३० किमी अंतरावरील, तर

VSHORADS हे ६ किमी अंतरावरील आणि लेझर सिस्टीम असलेले DEW हे २ किमी अंतरा वरील विमाने, ड्रोन वगैरे उध्वस्त करतील. अशी लेझर सिस्टीम सध्या अमेरिका, रशिया, चीन, जर्मनी, युके व इस्त्रायल कडेच आहे. आणि आता भारत त्यामध्ये सामील झाला.

५) २० ऑगस्ट रोजी भारताने अग्नी ५ या क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. याचा टप्पा ५,००० किमी पेक्षा जास्त आहे. तसेच अनेक टॉमिक वॉर हेड्स त्याच्यावर बसवता येतात. व एकाच वेळी अनेक लक्षावर ती डागली जातात.

तसेच यांचा पुढील प्रगत टप्पा जो बंकर ब्लस्टर आहे, तो लवकरच बनत आहे. याचा टप्पा ७,५०० किमी व वेग ८ ते १० मॅक (१०,००० ते १२,००० किमी प्रति तास)असेल. तसेच ३००फ जाडीचे कॉंक्रीट किंवा दगड फोडून मग लक्षावर मारा करेल. यांची किंमत अंदाजे ८३ कोटी असेल. बंकर ब्लस्टर, १४ टन वजनाचा बॉम्ब वाहून नेण्यासाठी अमेरिका इ५२, (६,००० किमी चा टप्पा) सारखे विमान वापरते. भारताला अशा मोठ्या विमानाची गरज नाही.

६) २९,३० ऑगस्ट रोजी झालेल्या दुसऱ्या अंतरिक्ष प्रदर्शनात इस्त्रो ने ल्यूनार मॉड्यूल लॉन्च व्हेईकल चे प्रोटो टाईप सादर केले. हे क्षेपणास्त्र ११६ मीटर उंचीचे आणि २,५०० टन वजनाचे असेल. ते पृथ्वीच्या जवळील कक्षेत ७० टन तर चंद्राच्या कक्षेत २७ टन वजनाचे यान पाठवू शकेल. २०३५ पर्यंत हे क्षेपणास्त्र तयार होईल. त्याच प्रदर्शनात इस्त्रो ने अवकाश स्थानकाची ही प्रतिकृती सादर केली. हे स्थानक १० टन वजनाचे असून ३.८ मीटर रुंद आणि ८ मीटर लांब असेल. पृथ्वी पासून ४५० किमी कक्षेत ते स्थापन केले जाईल.

७) २६ ऑगस्ट रोजी आय एन् एस हिमगिरी व उदयगिरी या दोन युद्ध नौका नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्या. या प्रत्येक नौकेवर अन्य क्षेपणास्त्रा बरोबर ८ ब्रह्मोस क्षेपणास्त्रे ही आहेत उदयगिरी ही नौदलाच्या वॉरशिप डिझाईन ब्यूरो ने तयार केलेली १०० वी युद्धनौका आहे.

८) भारतात इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणात सुरू झाले आहे. पण अजूनही त्यासाठी लागणारे सेल हे चीन, जपान, कोरिया मधून आयत केले जातात. बॅटरी साठी लागणारी खनिजे ही सध्या आपल्या कडे नाहीत. पण केंद्र सरकारच्या पीएल‌आय् व अन्य सुविधा मुळे ही खनिजे आता भारतात उपलब्ध होत आहेत. नुकतेच सेलचे उत्पादन ही ओला कंपनीने सुरू केले आहे. व एक्साईड, अमारा राजा आणि टाटा मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून सेल चे उत्पादन सुरू करत आहेत. सोडियम अयान बॅटरी ही बनवली जात आहे. २६ ऑगस्ट रोजी आपल्या पंतप्रधानांनी मारुती सुझुकीच्या ई व्हिटारा या पहिल्या इलेक्ट्रिक कारचे उद्घाटन केले. भारतात निर्यात हब बनवून या इलेक्ट्रिक गाड्या जवळपास १०० देशांत निर्यात केल्या जाणार आहेत. त्याच दिवशी पंतप्रधानांनी तीन जपानी कंपन्यांच्या गुजरात मधील इलेक्ट्रिक वाहनांच्या बॅटरीचे सेल बनवण्याच्या कारखान्याचे उद्घाटन केले.

९) कॅनडामध्ये २० ते २४ ऑगस्ट मध्ये जागतिक युवा तिरंदाजी स्पर्धा झाली. १९ व्या या स्पर्धेत ६३ देशातील ५७० स्पर्धकांनी भाग घेतला. भारताने ४ सुवर्ण, २ रौप्य व २ कांस्य पदके मिळवली व जागतिक क्रमवारीत दुसरे स्थान मिळवले. दक्षिण कोरिया ७ सुवर्ण ६ रौप्य व ४ कांस्यपदके मिळवून पहिल्या क्रमांकावर राहिला. पुण्याच्या १६ वर्षीय शर्वरी शेंडेला १८ वर्षाखालील गटात सुवर्णपदक मिळाले. या वयोगटातील सुवर्णपदक मिळवणारी ती तिसरी भारतीय महिला. (२०११ मध्ये दिपिका कुमारी, २०२१ मध्ये कोमालिका बारी.आणि आता शर्वरी. २१ वर्षाखालील गटात चिकिता तानिपात्री हिने ही सुवर्णपदक पटकावले. या गटात सुवर्णपदक मिळवणारी ती पहिलीच भारतीय महिला.

१०) एकेकाळी दहशतवादी कारवाया होणाऱ्या (१४ फेब्रुवारी २०१९ रोजी सीआरपीएफ च्या ४० जवानांची हत्या) काश्मीरमधील पुलवामा येथे २५ ऑगस्ट पासून ढ २० दिवस–रात्रीचे प्रीमियर लीग क्रिकेट सामने झाले. काश्मीरमधील १२ संघांनी भाग घेतला होता. २५,००० पेक्षा जास्त प्रेक्षकांनी पहाटे २ पर्यंत क्रिकेटचा आनंद घेतला.

तसेच २१ ते २३ ऑगस्ट खेलो भारत अंतर्गत पहिल्या राष्ट्रीय पाण्यातील स्पर्धा श्रीनगर मधील दल सरोवरात झाल्या. २४ सुवर्ण पदकासाठी ३६ प्रांतातील ४०० पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेतला. त्यामध्ये अर्ध्या महिला होत्या. पहिले सुवर्णपदक १,००० मीटर च्या कैनोईंग स्पर्धेत काश्मीर च्या श्री मोहसीन अली ने पटकावले.

**कुमार आठवले**





## मा. मीनाक्षीताई पिशवे (केंद्रीय मातृशक्ती संयोजिका) यांचा प्रवास

दुर्गा वाहिनी वि. हिं. प.

दि. ९.९.२५ रोजी संध्याकाळी ४.३० वा. सौ. मीनाक्षी ताई पिशवे केंद्रीय मातृशक्ती संयोजिका, सौ. माधवीताई संशी महाराष्ट्र प्रांत उपाध्यक्षा, सौ. शारदाताई रिकामे प. महा. प्रांत मातृशक्ती सहसंयोजिका, सौ. तेजस्विनीताई ढोमसे पिं. चिं. जिल्हा उपाध्यश्रा यांनी श्री मोरया गोसावी मंदिर, चिंचवडगाव येथील वि.हिं.प. संचालित धर्मगंगा ग्रंथालयाला भेट दिली. या मान्यवरांचा सत्कार सौ. शारदा ताई रिकामे यांनी केला.

श्री. विजय देशपांडे प. महा. प्रांत पालक व श्री. गोविंदराव देशपांडे पि.चि. जिल्हा मातृशक्ती व दुर्गा वाहिनी पालक याप्रसंगी उपस्थित होते. त्यानंतर ५ वा. पिं.चिं. जिल्हा मातृशक्तीची बैठक घेतली. मातृशक्ती सौ. वैशालीताई कोरके यांनी वैयक्तिक गीत म्हणून आचार पद्धतीनुसार सुरुवात केली. दीपप्रज्वलन करुन बैठकीची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. मीराताई कुलकर्णी जिल्हा संयोजिका आणि प्रस्तावना व प्रमुख पाहुण्यांचा परिचय सौ. अपर्णाताई सावंत पि.चिं. जिल्हा दुर्गावाहिनी संयोजिका यांनी केला.

सौ. मीनाक्षी ताई पिशवे यांनी 'संघ शताब्दी वर्षानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमातून संघ आणि त्याचे कार्य याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवावे' असा संदेश दिला. जसे रांगोळीसाठी पंच परिवर्तन विषय द्यावा. संस्कार वर्गातील मुलांना संघाच्या गणवेशात संचलनात न्यावे इत्यादी. जी लोकं संघाशी जोडलेले नाहीत त्यांच्यामध्ये व्यक्तिगत परिवर्तन करुन समाजातील लोकांची सर्जन शक्ती वाढवावी. त्यांचे विचार ज्या माध्यमांमुळे प्रभावित होतात तशी त्यांची प्रवृत्ती होते. त्यातून विरोधी विचार, भांडण, तंटा होतो. म्हणून सजामातील बुद्धिवंत, ज्ञानी लोकांपर्यंत पंच परिवर्तन संदेश द्यावा.

१. स्व बोध २. कुटुंब प्रबोधन ३. समाज परिवर्तन करावे. सुसंस्कारित, राष्ट्राभिमान जागृती करावी ४. आपले नागरिकत्व समाज उपयोगी असावे. ५. पर्यावरण संरक्षण करावे. वृक्ष लागवड करणे. प्लॅस्टिक वस्तू वापरू नयेत. प्रत्येकाने १० घरात जाऊन संघाची माहिती द्यावी. व्यापक दृष्टिकोनातून समाजासाठी कामे करावी. आपल्या कार्यक्रमात नगरसेविका/राजकीय पार्टी कार्यकर्त्यांना बोलवावे. कन्या पूजन, दुर्गाष्टमी, दुर्गा दौड इ. कार्यक्रम घ्यावेत याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रम घेताना अष्टभुजा, दुर्गा देवी, महिषासुर मर्दिनी अशा देवीच्या प्रतिमेची पूजा करावी. सप्तश्लोकी, दुर्गा पाठ करावा. आपल्या आयोजक टोळीने कामाचे वाटप करावे. कुटुंब प्रबोधन, नशामुक्ती यासाठी बॅनर लावावे. असे विचार मांडून मा. मीनाक्षी ताई पिशवे यांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केले. दुर्गा सौ. ज्योती ताई खुंटे यांनी शांती मंत्र व उद्‌घोष म्हणून बैठकीची सांगता झाली. या बैठकीस १६ मातृशक्ती अधिक दुर्गा उपस्थिती होत्या. धर्मगंगा ग्रंथालयाच्या सेवकांनी चांगली बैठक व्यवस्था केली.

वृत्तांकन – डॉ. शर्वरी यरगट्टीवार

---

मंगळवार दिनांक २/९/२०२५ रोजी गणेश पेठ पांगुळ आळी ट्रस्ट मंडळ गणेश पेठ येथे विहिंप दुर्गा वाहिनी तर्फे गणपती अथर्वशीर्ष पठणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अथर्वशीर्ष पाच वेळा पठण करण्यात आले. सौ कार्तिकीताई परदेशी व सुकन्या ताई काची महात्मा फुले प्रखंड दुर्गा संयोजिका आणि महात्मा फुले प्रखंडातील दुर्गा, तसेच पांगुळ मित्र मंडळातील मातृशक्ती यांनी मोठ्या प्रमाणात भाग घेतला. त्रिवार ओंकार आणि विजय मंत्र यांनी कार्यक्रमाची सुरुवात करून अथर्वशीर्षाचे पठण करण्यात आले. त्यानंतर दुर्गा वाहिनीची माहिती सौ कार्तिकीताई यांनी सांगितली. श्री विजय कांबळे यांनी विहिंपच्या ६१ व्या वर्धापन दिनानिमित्त परिषदेची उपलब्धी याविषयी माहिती मांडली. सुकांचनताई दोडे यांनी महिलांनी स्वसंरक्षण कसे करावे, त्यांचे आचरण कसे असावे, याच्याविषयी सांगितले. सदर कार्यक्रमाला एकूण अडीचशे एवढी संख्या होती. महिलांची संख्या २०० होती. सदर कार्यक्रम दुर्गा वाहिनी कसबा भाग संयोजिका सौ कार्तिकीताई परदेशी यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आला. श्री शैलेश ताठे व दत्ता बडदे यांनी कार्यक्रमाचे व्यवस्थापन व नियोजन केले.

सौ कार्तिकीताई परदेशी कसबा दुर्गा वाहिनी संयोजिका
सौ सुकन्या ताई कांची सह संयोजिका







# दुर्गा वाहिनी गणपती मंडळ कार्यक्रम

विश्व हिंदू परिषद दुर्गा वाहिनी यांच्यावतीने गणेश उत्सवामध्ये आपण काही मंडळांमध्ये दुर्गा वाहिनीचे कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये आपल्या दुर्गा लाठीकाठी व नियुद्ध याचे प्रात्यक्षिक सदर करण्यात आले. त्या सर्व मंडळांची माहिती तपशील खालील प्रमाणे

दि. २८/०८/२०२५ : १.अखिल मित्र मंडळ चव्हाण नगर वेळ सायं. ७.०० २. निर्मल विणकर सोसायटी मित्र मंडळ पद्मावती – सायं ८.००, दि. २९/०८/२०२५ : १.एकता मित्र मंडळ,अरणेश्वर, सायं ७. ०० २. श्रीकृष्ण मित्र मंडळ, सिद्धकला सोसायटी, पद्मावती, सायं ८ दि. ३०/०८/२०२५ निर्मल विणकर सोसायटी मित्र मंडळ पद्मावती – सायं ८.००

संस्कार केंद्र मधील मुलांचा कार्यक्रम – दि. ३१/०८/२०२५, विकासनगर मित्र मंडळ, वानवाडी, दि. ०२/०९/२०२५ १. क्रांती तरुण मित्र मंडळ पर्वती संध्या ७.००, २. नागराज मित्र मंडळ पर्वती, संध्याकाळी ८.००, दिनांक ०३/९/२०२५, श्री साई मित्र मंडळ ट्रस्ट कोथरूड यांना मोहोळ यांचे मंडळ.

गणेशोत्सव महाराष्ट्रातील प्रमुख उत्सव, जो लोकमान्य टिळकांनी स्वातंत्र्यपूर्व काळात जनजागृतीसाठी सुरू केला. यावर्षी तर महाराष्ट्र सरकारने तो राज्याचा उत्सव म्हणून घोषित केला. पर्वती भाग दूर्गा वाहिनींनी खूपच उत्साहात साजरा केला हा सण. ५/६महिन्यात लाठीकाठी व नियुद्ध शिक्षण घेऊन; त्यांचे प्रात्यक्षिक नवदूर्गांनी वेगवेगळ्या भागातील गणेशमंडळासमोर केले. काही मंडळांमध्ये दुर्गांच्या हस्ते आरती घेण्यात आली. अनेक मंडळाजवळील नागरिक ती प्रात्यक्षिके कौतुकाने पहात होते. कारण हे चित्र पूर्वी नव्हते।दूर्गांचा आत्मविश्वास या शिक्षणामुळे वाढला आहे.

सर्व मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये सौ आरती भारती दुर्गा वाहिनी प्रांत सहसंयोजिका, सौ अक्षता चिल्लाळ पर्वती भाग दुर्गा वहिनी सहसंयोजिका, पद्मावती सौ. सारिका कड, सह–सौ. उषा जाधव, पद्मावती प्रखंड दुर्गा वाहिनी संयोजिका सौ. प्राजक्ता जैन, सह– सौ. निशा पोटे, सत्संग प्रमुख सौ. ऋतुजा दास, सह सौ. राजश्री सपार, पद्मावती खंड दुर्गा वाहिनी खंड संयोजिका सई पवार, साप्ताहिक मिलन प्रमुख अर्पिता पोटे, खंड बाल संस्कार प्रमुख अक्षता मद्दी, सह सौ गीता चिंता, सौ आरती पवार,चव्हाण नगर खंड दुर्गा वाहिनी संयोजिका सानिया चव्हाण,सह– नेहा डाडर, साप्ताहिक मिलन प्रमुख अनुष्का पाटोळे, सह –कार्तिकी चव्हाण, बालसंस्कार प्रमुख देविका कुडले, सह–प्रणाली तुपे,चव्हाण नगर खंड सौ कविता रावडे, दुर्गा वैष्णवी, सायली, कोमल, सिद्धी डाडर, ओवी, भक्ती कदम, भूमी कदम या सर्व दुर्गा उपस्थित होते.

**शांत डोक्याचे शस्त्र आणि स्थिर मनाचे अस्त्र हे ज्यांच्या स्वभावात आहे, त्यांच्याकडे जीवनात येणा-या प्रत्येक लढाईसाठी सज्ज असलेले ब्रह्मास्त्र आहे.**

VRJ







# विहिंपतर्फे कारसेवकांचा जगद्गुरूंच्या हस्ते गौरव

## घटनेत धर्मनिरपेक्ष नको, हिंदू राष्ट्र धर्म आहे

काशी जगद्गुरू म्हणाले, केवळ शांतीमंत्र म्हटलो तर देश पुन्हा संकटात, त्यासाठी क्रांतीच हवी.

सोलापूरः जनगणमन राष्ट्रगीत म्हणतो, पण या राष्ट्रगीताचा अर्थ कधी विद्यार्थ्यांना सांगितला गेला का? भारत भाग्य विधाता कोण, अधिनायक कोण? हे विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून दिले पाहिजेत. आपल्या घटनेत धर्मनिरपेक्ष शब्द आहे, तो तिथे नको होता, विविधतेत एकता हे योग्य आहे, याचा अर्थ धर्मनिरपेक्ष नव्हे. धर्मनिरपेक्षतेमुळे देशाचे विभाजन झाले, ते संकट अजूनही संपलेले नाही. त्यासाठी सतर्क राहिले पाहिजे. देशात विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाज जागरणाचे काम करतात, त्यांच्या कार्यात संपूर्ण समाजाने जोडून घ्यायला हवे,असे आशीवर्चन काशी पीठाचे जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी यांनी केले.

सोलापूर येथील होटगी मठात विश्व हिंदू परिषदेच्या वतीने रामजन्मभूमी अयोध्या कारसेवा केलेल्या रामभक्तांचा सन्मान गौरव सोहळा श्री श्री श्री १००८ काशीपीठ जगद्गुरू ज्ञानसिंहासनाधिश्वर डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या शुभ हस्ते करण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी व्यासपीठावर विहिंप जिल्हाध्यक्ष हभप अभिमन्यू डोंगरे महाराज, हभप सुधाकर इंगळे महाराज, तालुका संघचालक रवी जोशी, चंद्रकांत गडेकर सर उपस्थित होते.

रामजन्मूभी आंदोलनात तीन वेळा कारसेवा झाली. यात सहभागी कारसेवकांचा तसेच विहिंपचे पूर्व जिल्हामंत्री, सहमंत्री तसेच संयोजक यांचा सन्मान काशी पीठ जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य महास्वामीजी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. प्रारंभी जिल्हामंत्री संजयकुमार जमादार प्रास्ताविकात सन्मान गौरव सोहळ्याची भूमिका विषद केली.

विहिंप विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे (संपादक) यांनी विहिंपच्या कार्याची उपलब्धी सांगितली. संघ शताब्दी आणि विहिंप एकसष्ठी असा योग यावर्षी २०२५ मध्ये आला आहे. पंचपरिवर्तनच्या माध्यमातून २०२९ मध्ये समग्र परिवर्तन संपूर्ण देशात घडवून आणायचे आहे. या परिवर्तनात सर्व संत, महंत, धर्माचार्य, शंकराचार्य, जगद्गुरू यांचे आशीर्वाद आहेत. हिंदू समाजाने एक है, तो सेफ या भूमिकेतून सहभाग घ्यावा असे आवाहन विजयकुमार पिसे यांनी आपल्या मनोगतामधून केले. अक्कलकोट तालुका संघचालक रवी जोशी, हभप इंगळे महाराज यांनी कारसेवेतील प्रसंग, अनुभव आणि हिंदू समाजाचे जागरणामुळे कसे शक्य झाले, हे सांगितले.

काशीपीठ जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामी आपल्या आशीवर्चनात म्हणाले, शांतीमंत्रासोबत क्रांतीही हवी. ती सांगितली पाहिजे. केवळ शांती नको, राष्ट्र वाचवण्यासाठी क्रांती करावीच लागेल. क्रांती म्हणजे एकजूट, शिस्त असा त्याचा अर्थ आहे. केवळ शांतीमंत्र जपलो तर पुन्हा देश संकटात येईल. तिथे क्रांती करण्यासाठी हिंदू समाजाची पुढची पिढी सज्ज असली पाहिजे. आम्ही देखील तरुण असतो तर आमचाही कारसेवेत निश्चित सहभाग असता. तेव्हा लहान असल्यामुळे हे भाग्य मला मिळाले नाही. पण कारसेवक रामभक्तांचा सन्मान आपल्या हातून होतो, हे मी माझे भाग्य समजतो, या शब्दात जगद्गुरू डॉ.मल्लिकार्जुन शिवाचार्य महास्वामीजी यांनी कारसेवकांचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण जिल्ला, आभार सहमंत्री बापूसाहेब कदम यांनी मानले.

या कार्यक्रमास बृहन्मठ होटगी मठाचे मुख्य सचिव शांतय्या स्वामी, मल्लिनाथ पाटील, राजेंद्र गंगदे, पुरुषोत्तम उडता, जयदेव सुरवसे, बाबू गिरगल, विष्णू जगताप, चंद्रकांत कुलकर्णी, सिद्राम चरकुपल्ली, अविनाश माने, अमित सारोळकर, महेश भंडारी, महेश हेले, राजेश यनगंटी, संजीव चिप्पा, अक्षय कनकुंटला, बालाजी रजपूत, रवी बोल्ली, राजेंद्र सैनी, नंदीनी अक्कल, श्रेया चव्हाण, लक्ष्मी चरकूपल्ली, वैष्णवी पवार, स्वाती बोल्ली, वंदना बोल्ली, सिध्देश्वर गोकावी, चन्नबसव सोलापुरे, ऋषी भुजबळ, दीपक ढगे, श्रीधर झांबरे, समाधान ताटे, किसन कापसे, कुमार हिरेमठ आदी प्रमुख मंडळी व विहिंप, बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

**विजयकुमार पिसे, विभाग सहमंत्री**





## छत्रपती संभाजी महाराज भाग : वर्धापन दिन

विश्व हिंदू परिषदेचा वर्धापन दिन : पुणे शहरातील छत्रपती संभाजी महाराज भागात ६८ पेक्षा अधिक ठिकाणी प्रखंड व खंड स्तरावर पार पडला. मुख्यतः शाळा, मठ, मंदिरे, व्यायाम शाळा, भजन केंद्रे, सांप्रदायिक संस्थांचे एकत्रीकरण केंद्र, सर्व सोसायटी, बाल संस्कार केंद्र, शक्ती साधना केंद्र, बलोपासना केंद्र, साप्ताहिक मिलन केंद्र, अभ्यासिका, क्लासेस, युद्ध कलेची शिबिरे अशा विविध ठिकाणी कार्यक्रम झाले. प्रतिमापूजन, संघटनेचे प्रबोधन, श्रीकृष्ण जन्माष्टमी, भजन, कीर्तन आरती, सत्संग, विविध स्पर्धा, प्रवचनमाला, सत्यनारायण महापूजा, शिवलीलामृत कथा व इतर कार्यक्रम यानिमित्त १९६९ नागरिकांपर्यंत पोहोचण्यात यश आले.

शालेय दशेत नैतिक शिक्षण, सांप्रदायिक ठिकाणी अध्यात्मिक क्षेत्रात विश्व हिंदू परिषदेचे योगदान, मठ मंदिरे हिंदू एकत्रिकरणाची केंद्र व त्यासाठी योगदान. ग्रामीण भागात सेंद्रिय–गोआधारीत शेती, गोरक्षण, आयाम, गोसंवर्धन आयाम कार्यपद्धती. व्यायामशाळा बलोपासनेचे महत्व. बजरंग दल बलोपासना आयाम. सोसायटी–सोशल मीडिया अपप्रचार, हिंदू संघटनांचे बळकटीकरण, देव, देश धर्मप्रति जागृतता आणि कार्यात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी केले.

गणेश मंडळ, मंदिरे, युवा कार्यकर्त्यांचे राष्ट्रासाठी योगदान, बजरंग दल आयाम ओळख व कार्य प्रबोधन. कथा – दुर्गम संवेदनशील प्रखंडाच्या कथा व सप्ताहाच्या माध्यमातून हिंदू समाजाचे एकत्रिकरण. आशा अनेक विविध ठिकाणी विविध संघटनात्मक विषयांची मांडणी करून समाजापर्यंत संघटना पोहोचवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. याची फलप्राप्ती म्हणून ग्रामीण खंडात ३ साप्ताहिक मिलन केंद्र सुरू होण्याची शक्यता आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न सुरू आहेत.

**वृत्तांकन – शुभम हरिभाऊ मुळूक**

**जिल्हा मंत्री – छत्रपती संभाजी महाराज भाग पश्चिम पुणे**



## विहिंप सोलापूर मातोश्री गोशाळेत गोमातेचा पाळणा

राधाष्टमीच्या पावन मुहूर्तावर सोलापूर जुने विडी घरकुल येथील मातोश्री गोशाळेत विश्व हिंदु परिषद आणि मातोश्री गो शाळा यांचेवतीने शहर व जिल्ह्यात प्रथमच ३१ ऑगस्ट २०२५ रोजी गोमातेचा पाळणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी श्री सत्यनारायण महापूज व होमहवन झाले. राधाष्टमीच्या पवित्र मुहूर्तावर दुपारी १२.३० वा. गोमातेचा पाळणा सोहळा मंत्रोच्चारात पार पडला. माजी नगरसेवक प्रथमेश कोठे यांनी विश्व हिंदू परिषद आणि गोरक्षकांसोबत सदैव उभे राहण्याचा संकल्प व्यक्त केला. जिल्हामंत्री संजय जमादार यांनी गोमातेचे महत्त्व सांगितले. प्रांत गोरक्षा व संवर्धन प्रमुख संतोष खामकर यांनी गो संवर्धनाचे महत्व आणि गरज याविषयी माहिती दिली याप्रसंगी बजरंग दल जिल्हा संयोजक सिद्राम चरकुपल्ली, जिल्हा सहमंत्री बाबू गिरगल, रवी बोल्ली आणि असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. विशेष उपस्थिती मानद पशुकल्याण अधिकारी केतन शहा, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, ज्येष्ठ कार्यकर्ते प्रल्हाद आडम, अंबादास गोरंटला, पुरोहित गणेश आडम व अन्य मान्यवर उपस्थित होते.ड कार्यक्रम पार पाडण्यासाठी मातोश्री गोशाळेचे संचालक श्रीनिवास बडगंची, दीपक बंदगी, उमाकांत बुधाराम, नरेश धुंपेटी,राजू गुंडला, विशाल बुगडे, सिद्धेश्वर गुर्रम तसेच विश्व हिंदु परिषद बजरंग दलाचे कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

**जिभेला झालेली इजा सगळ्यात लवकर बरी होते असं शास्त्र सांगते. जिभेने झालेली इजा आयुष्यभर बरी होत नाही असं अनुभव म्हणतो..**



# विश्व हिंदू परिषद कात्रज जिल्हा

विश्व हिंदू परिषदेच्या ६१ व्या वर्धापन दीना निमित्त विविध कार्यक्रम करण्यात आले. हिंदूंच्या पवित्र श्रावणी सोमवार च्या दिवशी भाविकांना ५०१ रुद्राक्ष वितरण. दि. १८ ऑगस्ट रोजी श्रावणी सोमवारी कात्रज येथील काशी विश्वेश्वर मंदिर व भारती विद्यापीठ येथील नर्मदेश्वर मंदिर दोन्ही ठिकाणी ५०१ भाविकांना रुद्राक्ष वितरित करण्यात आले.

धनकवडी प्रखंडात मोफत महा आरोग्य शिबीर : दि. २३ ऑगस्ट रोजी धनकवडी मधील वस्ती भागात मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आले शिबिराची सुरवात बजरंग दल प्रांत संयोजक श्री . नितीन जी महाजन यांच्या हस्ते गणेशाची आरती करून करण्यात आले. या शिबिराच्या माध्यमातून एकूण १८० नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीचा लाभ मिळाला.

आंबेगाव प्रखंडात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर : दि. २४ ऑगस्ट रोजी आंबेगाव येथील हनुमान नगर या वस्ती भागात मोफत नेत्र तपासणी शिबीर व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करन्यात आले या शिबिराची सुरवात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शरद झिने साहेब यांच्या हस्ते भारत मातेचे पूजन करून करण्यात आली , नंतर आपल्या पश्चिम महा. प्रांत मंत्री श्री किशोर भाऊ चव्हाण यांनी ही शिबीर स्थळी भेट दिली व मार्गदर्शन केले. या शिबिराचा १३३ नागरिकांनी लाभ घेतला.

कात्रज प्रखंडात मातृशक्ती, दुर्गावाहिनी मार्फत हळदी कुंकू

दि. २२ तारखेला मातृशक्ती व दुर्गावाहिनी तर्फे महिलांचे एकत्रीकरण व हळदी कुंकवाचा कार्यक्रम करण्यात आला या कार्यक्रमाला ५० ते ६० महिलांनी सहभाग घेतला.

**जिल्हा मंत्री, शार्दूल ठाकूर**



**विचारधन...**

व्यक्तिमत्व विकारांमध्ये वर्तन, विचार आणि भावना यांच्या अस्वास्थ्यकर पद्धतींचा समावेश असतो, व्यक्तिमत्व विकार आपल्या लोकांना अनेकदा तीव्र अविश्वास, सहानुभूतीचा अभाव, कमकुवत आत्म-नियंत्रण किंवा सामाजिक टाळणे यांसारख्या अतिरेकी व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्ट्वाशी झुंजावे लागते, प्रत्येक बाबतीत, हे व्यक्तिमत्त्व गुण तुमच्या कल्याणावर आणि नातेसंबंधावर परिणाम करू शकतात.

उच्च न्यूरोटिसिझम हा व्यक्तिमत्त्व विकारांशी संबंधित आहे. ज्यामध्ये आवेगपूर्ण वर्तन, तीव्र नकारात्मक भावना आणि इतरांशी संबंध राखण्यात अडचण येते. यामध्ये पैरानॉइड, असामाजिक आणि सीमावली व्यक्तिमत्व विकारांचा समावेश आहे. काही संशोधक ऑब्सेसिक कंपल्सिव्ह पर्सनॅलिटी डिसऑर्डर हा विवेकीपणाचा एक अस्वास्थ्यकर प्रकार मानतात, जिये तुम्हाला सुव्यवस्था, नीटनेटकेपणा आणि परिपूर्णतेबद्दल वेड लागते. त्याचप्रमाणे, कमी विवेकपणा, अनिश्चितता आणि आवेगपूर्णता हे असामाजिक आणि सीमावर्ती व्याक्तिमत्य विकारांशी संबंधित आहेत. सहानुभूती आणि सहमती. कमी सहमती म्हणजे इतरांवर खूप अविश्वास असतो. म्हणून ते पॅरानॉइड व्यक्तिमत्व विकाराशी जोडलेले आहे.

**माणूस चुका करतो कारण**
**माणूस आहे तो, चुका तर करणारच**
**पण तो चुकीचा तेव्हा ठरतो**
**जेव्हा तो त्याच्या चुका मान्य करत नाही.**


स्वत:च्या कुटुंबासाठी हवे
स्वत:चे घर,
ठेवा विश्वास जनसेवेच्या
'घरकुल' कर्जावर !
जनसेवा घरकुल कर्ज
रो हाऊस, बंगला, फ्लॅट
खरेदीसाठी किफायतशीर कर्ज उपलब्ध.
(सिबिल स्कोरनुसार व्याजदर)
* अटी लागू
आकर्षक व्याजदर
तत्पर सेवा
अल्प प्रोसेसिंग फी
रु. 2 कोटींपर्यंत कर्ज
संपर्क क्र. - 84 85 87 12 52
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
मुख्य कार्यालय : प्लॉट क्र. १४, हडपसर इंडस्ट्रिअल इस्टेट, हडपसर, पुणे ४११०१३.
www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रू. २००/– फक्त

Date of Publication : 26/09/2025 and
Date of Posting : 28/09/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

● मासिक मुल्य रु. २०/– ● वार्षिक वर्गणी रु. २००/– ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/–

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

००००

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

- रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख
- साधे पान रु. १ लाख
- साधे अर्धे पान रु. ५०,०००/–
- साधे १/४ पान रु. २५,०००/–
- साधे १/८ पान रु. १२,०००/–
- साधे १/१६ पान रु. ६,०००/–
- सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/–
- हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/–
- वार्षिक वर्गणी रु. २००/–
- त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/–

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार–नारायण पेठ शाखा, पुणे – ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे – ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**

व्दारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे – ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०–२४४७१७०१